पिंपरी चिंचवड

# अंतरंग

**दीपावली विशेषांक २०२०**

पृष्ठ संख्या ८४ । मूल्य ₹१००/-



mpc news.in

राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!


आपणांस हि दिपावली आनंदाची, हर्षाची, सौख्याची, समाधानाची
आणि नूतन वर्ष सुख - समृद्धीचे, संकल्प - पूर्तीचे
आणि आरोग्य संपन्नतेचे जावो.
शुभ दिपावली
सर्व मावळवासियांना
दीपावलीच्या मंगलमय शुभेच्छा !
सुनिल शंकरराव शेळके
आमदार-मावळ


घेऊनी दिव्यांचा प्रकाश सोनेरी,
माळोनी गंध मधूर उटण्याचा...
करा संकल्प सुंदर जगण्याचा,
गाठूणी मुहूर्त दिवाळीच्या सणाचा...
शुभ दीपावली
सर्व नागरिकांना
मंगलमय दिपावलीच्या
तेजोमय शुभेच्छा...
हॉटेल
शिवराज
फॅमिली रेस्टॉरंट
व्हेज नॉनव्हेज
वडगांव-मावळ
HOTEL SHIVRAJ
श्री.अतुल खंडुजी वायकर
उपाध्यक्ष-पुणे जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस,
शिवराज ग्रुप-मावळ


दिवाळी
निमित्त सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा...!
श्री. रविंद्र आण्णासाहेब भेगडे
अध्यक्ष-भाजपा मावळ तालुका
पुणे पदवीधर मतदार नोंदणी प्रमुख
किरण राक्षे
संघटनमंत्री भाजपा
सुनिल चव्हाण
सरचिटणीस भाजपा
मच्छिंद्र केदारी
सरचिटणीस भाजपा
विश्वनाथ जाधव
सरचिटणीस भाजपा
सायलीताई बोत्रे
महिला मोर्चा अध्यक्ष
संदिप काकडे
युवा मोर्चा अध्यक्ष
अभिमन्यु शिंदे
विद्यार्थी आघाडी अध्यक्ष







दिवाळीच्या पणत्यांमध्ये आहे आनंदाचा साक्षात्कार,
मोठ्यांचं प्रेम आणि सर्वांचा आधार...
श्री. रणजित रामदास काकडे व आर.एम.के. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. आणि कुटुंबीयांकडून
आपणा सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

RMK



KSC
KAKADE STONE CRUSHER

श्री. रणजित रामदास काकडे

# आर. एम. के. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.

Plot No. 2992/1, RMK Square, Vishnupuri, Talegaon Dabhade (Station), Tal. Maval,
Dist. Pune - 410 507, Tel : +91 - 2214 - 226922, Fax : +91 - 2214 - 223240
E-mail : info@rmkinfrastructure.com

www.rmkinfrastructure.com




My **divine empire** of delight



Reveal yourself in the **lap of luxury**



This is my **super duper** home



A **perfect** balance between two edges




Namrata Construction | Omkar Group BUILDING TRUST | BHONDVE BROTHERS

Site: S. No. 76/2, Behind Water Tank, Near Mukai Chowk, Ravet, Pune 412 101
HO.: Omkar Group, Office No. 222, Laxmi Complex, Adj. Big Bazar, Chinchwad, Pune 19


**Contact : 98238 80606 | 90110 49260**


दिवाळीच्या पणत्यांमध्ये आहे आनंदाचा साक्षात्कार,
मोठ्यांचं प्रेम आणि सर्वांचा आधार...
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
संजय (बाळा) भेगडे
माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य


दीपावली अभिष्टचिंतन
पिंपरी- चिंचवड शहरातील सर्व वडीलधारी, माता, बंधु-भगिनी, युवक, विद्यार्थी मित्रांना
दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा
स्नेहाचा सुगंध दरवळला,
आनंदाचा क्षण आला
विनंती माझी परमेश्वराला,
सौख्य, समृध्दी लाभो आपणांस...
महेश किसनराव लांडगे
शहराध्यक्ष – भाजपा पिं.चिं. शहर(जिल्हा)
आमदार भोसरी विधानसभा



चांदण्यांचा सडा
अंगणभर पसरलेला
दारातला दिवा,
आकाशात खुललेला
अभ्यंग स्नानाने
करूया सुरुवात
लक्ष्मीची पाऊले
आज येतील दारात...
शुभ दीपावली
शिवसेना
श्रीरंग आप्पा बारणे
खासदार : मावळ लोकसभा
appabarne@gmail.com
shrirang-appa barne
@MPShrirangbarne


LEGACY OASIS
880 55 77 444
3 RLK | ₹42.64 Lacs*
+ Govt Taxes
Mauke pe Chauka
LEGACY KE SAATH
FREE STAMP DUTY
LEGACY GROUP
BEST FLOOR PLANS IN CHIKHALI
SHOW FLAT READY
www.legacypune.in
Maha RERA No.: P52100020904



LEGACY
RIVERSIDE
LIVE THE FLOW OF LIFE
2 & 3 RLK HOMES & SHOPS
+91 88055 44888
10gm GOLD COIN
SPOT BOOKING OFFER
FREE STAMP DUTY
LEGACY GROUP
3 RLK ₹44.95 LACS*
+ Govt Taxes
BEST FLOOR PLANS IN CHIKHALI
www.legacypune.in
Maha RERA No.: P52100025012



भगवती ज्वेलर्स
(मालपाठक एन्टरप्राईज)
सुवर्णभिशीचा घेऊ सहारा...
स्वप्नातील दागिना होईल खरा...
श्री गजानन महाराज मंदिरा जवळ, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे ४१०५०६
हमी शुद्धतेची
जोड विश्वासाची


दिवाळीचा पहिला दिवस
सुखाचे किरण येती घरी
पूर्ण होवोत तुमच्या सर्व इच्छा
काळोखे पाईप्स आणि
श्री अंबिका स्टोन क्रशर
तर्फे तुम्हा सर्वांना
दिवाळी
निमित्त हार्दिक शुभेच्छा
KALOKHE
PIPES & PRECAST INDUSTRIES
9665734466
DESIGNED BY TEAM MASCOT CREATION, PUNE
SHREE AMBICA STONE CRUSHER
WE ALSO WORK ON GOVERNMENT CONTRACT
INDUSTRIAL CONTRACT BUILDING CONTRACT
PRECAST PRODUCTS READY MIX PLANTS STONE CRUSHERS
ISO
IS 458
CM/L-7500195112
info@kalokhepipes.com
91-9607 422 525
91-9858 022 525
GAT NO. 44, JADHAVWADI VILLAGE, NAVLAKH UMBRE, TALEGAON DABHADE MIDC RD., TA. MAVAL, PUNE - 07



स्वामी समर्थ इंडस्ट्रीज
Swami Samarth Industries
We Save Our Planet
Our Best Quality Products
• Paper Plates (पेपर प्लेट्स) - 5" to 12"
• Paper Dish (पेपर डिश) - 4" to 9"
• Paper Cups (पेपर कप)- 55ml to 350 ml
• Paper Bowl (द्रोण)
स्मिता आदित्य रानभरे
संचालक
स्वामी समर्थ इंडस्ट्रीज
Happy Diwali
प्रदीप नाईक
संचालक
स्वामी समर्थ इंडस्ट्रीज
चिंचवड | सपंर्क-7057295367


SOCIAL RESPONSIBILITY
TEAM AS AN ASSET
HONESTY & TRANSPARENCY
TECHNOLOGY
TIME & QUALITY
PANELS
• Providers of services and products in the field of electrical engineering
• Design and manufacturer of HT/LT electrical and instrumentation control panels
SOLAR
• Diversification into Solar Power
• Focus areas: IT, Manufacturing, Automobiles, Process, Food & Pharma, Industrial & Commercial Projects
ORBITTAL
ORBITAL REPRESENTS AN ENERGY LEVEL, THAT EXISTS WITHIN ATOM INTO WHICH ELECTRON IS EXCITED
HENCE "ORBITTAL REPRESENTS ENERGY & SYNERGY !"
EMS & LIGHT
• Power electronic solutions & latest technologies
• Efficient handling of complete product life cycle
LED
• Developed a host of LED and Solar powered lighting solutions & Retrofit solutions
PROJECTS
• Professionally managed electrical engineering firm
• Specialized in medium and large scale project execution pan India
www.orbittal.com | info@orbittal.com | +91-9763717956
Happy Diwali
With Best Compliments From
Team ORBITTAL



Bulk SMS / Voice Call Services
Voter's Search Software
Social Media Daily Design
LED Screen Van
निवडणूक
मग वाट कशाची बघताय ?
आजच खरेदी करा
एक परिपूर्ण निवडणूक संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर)
Wet 'n Joy
WATER PARK, LONAVALA
ग्रुप बुकिंगवर मिळवा आकर्षक डिस्काऊंट
AR GROUP
९८२२०४२४८४
७८४०९४२४८४
महत्वाचे घटक :
• संपूर्ण मतदार यादी
• अल्फाबेटिकल यादी
• आडनाव, पत्ता, घर क्रं. वयानुसार
• दुबार मतदार यादी
• डेस्कटॉप व मोबाईल ॲप
• मतदार स्लीप
ऑफिस - AR ग्रुप, चावडी चौक, वडगांव मावळ.
आता आपल्या व्यवसायाची जाहिरात करा फिरत्या एल.ई.डी गाडीवर.
शुभ दिपावली
हि दिवाळी आपणांस
सुखाची समृध्दीची आणि
भरभराटीची जावो हिच सदिच्छा !
अतुल राऊत
अध्यक्ष मावळ तालुका रा.काँ.पा. ओबीसी सेल
प्रभारी महाराष्ट्र प्रदेश रा.काँ.पा.सोशल मिडिया ओबीसी सेल
दिपावलीच्या आपणा सर्वांना मन:पुर्वक हार्दिक शुभेच्छा !
Veetrag Property & Liaisoning Consultant
Everything About Land & Properties....
Farmer Certificate, Liaisoning, Buying & Selling Permission, N.A. & Plan Sectioning Docuementstions, Demarcations Etc.
भूषण सुभाषचंद्र मुथा
अध्यक्ष - व्यापारी आघाडी, भाजपा वडगांव
संचालक - मावळ फेस्टीवल, लायन्स क्लब ऑफ वडगांव
सदस्य - मावळ विचारमंच आयोजित सरस्वती व्याख्यानमाला
नमो एंटरप्रायझेस, वडगांव मावळ । संपर्क - ९८५०७२७३७२

नवा गंध,
नवा श्वास
नव्या रांगोळीची
नवी आरास
स्वप्नातलं रंग नवे,
आकाशातले
असंख्य दिवे!



शुभ दीपावली

शिवसेना

**राहुल कलाटे**

शिवसेना गटनेते
पिंपरी-चिंचवड महापालिका




आले सुख दाराशी, निमित्त दीपावलीचे करून,
उधळूया सभोवताली धन प्रेमाचे भरभरून...
शुभ दिपावली
शिवसेना
अमित राजेंद्र गावडे
शिवसेना नगरसेवक । विधी समिती सदस्य





mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!

# दीपावली शुभेच्छा!

मागील काही काळापासून सगळं जग कोविडचा भीषण प्रकोप झेलत आहे. साधारणपणे मार्चपासून कोविड विरोधात सुरु झालेला हा जीवघेणा लढा आता आपण आपल्या संयमामुळे जिंकत आलो आहोत. करोनाची लागण आपण आत्ता आटोक्यात आणली आहे. त्यामुळे आता असाच संयम कायम राखत आपण प्रकाशाच्या मंगलमय पर्वाचा हा उत्सव साजरा करु शकतो. पण यावेळी कुठेही कुचराई न करता, आवश्यक ती सगळी खबरदारी घेऊन दिवाळीचा सण मनापासून साजरा करुया.

हा पिंपरी चिंचवड अंतरंगचा आठवा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर दिवाळी अंक वाचकांपर्यंत पोचवणे हे एक मोठे आव्हान होते. तरीदेखील आवश्यक ती सगळी काळजी घेऊन तुलनेने थोडा छोटा पण दर्जेदार अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला मनापासून समाधान आहे. मागील वर्षी दिवाळीच्या आधी महाराष्ट्रात निवडणुकांची पार्श्वभूमी होती. त्यामुळे दिवाळी अंकाच्या सादरीकरणात एक वर्षाचा खंड पडला. त्यातच यंदा हे करोनाचे 'न भूतो, न भविष्यति' असे संकट येऊन ठेपले. आपल्या सगळ्यांनाच अशा प्रकारची परिस्थिती आयुष्यात पहिल्यांदाच अनुभवावी लागली. हा अत्यंत कसोटीचा काळ होता. पण आपण त्यातून देखील तावून सुलाखून बाहेर पडत आहोत. म्हणतात ना की, सोन्याला देखील कसोटीमधून जावे लागतेच. आपल्या जीवनात देखील ही कसोटीच आहे.

यंदाच्या या अंकात कथा, कविता, ललितलेख, व्यक्तीपरिचय, पुस्तकपरिचय असा दर्जेदार मजकूर थोड्या कालावधीत वाचकांना देण्याचा आम्ही पुरेपूर प्रयत्न केला आहे. दिवंगत संगीतकार खय्याम यांच्यावरील लेख, मराठी भाषेची महती सांगणारा लेख, भारतीय संगीताचा आढावा घेणारा लेख यासारख्या लेखांचा या अंकात समावेश करण्यात आला आहे. करोनाच्या संसर्गामुळे यंदाची पंढरीची वारी नेहमी प्रमाणे होऊ शकली नाही. पण मनोमन पांडुरंग जपणा-या सच्च्या वारक-याचे मनोगत या अंकात आहे.

या कसोटीच्या काळात खंबीरपणे आमची साथ देणा-या सर्व जाहिरातदारांचे मनापासून धन्यवाद. करोनारुपी नरकासुराचे कायमस्वरुपी दहन करुन आशेचा तेजस्वी किरण आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात सदैव तेवता राहो याच दीपावलीनिमित्त आमच्या सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा. ही दीपावली व नूतन वर्ष आमच्या सर्व वाचकांना, जाहिरातदार व हितचिंतकांना सुखसमृद्धीचे, आरोग्यसंपन्न आणि भरभराटीचे जावो याच सदिच्छा.

**विवेक इनामदार**

संपादक



mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!

पिंपरी चिंचवड
# अंतरंग
पिंपरी । चिंचवड । मावळ
नोंदणी क्रमांक : Decl.No.PHM/SR/260/VIII/2009 | RNI No. MAH MAR / 2009/31565
दिवाळी विशेषांक । वर्ष ९ वे । नोव्हेंबर २०२० । पृष्ठ संख्या ८४ । मूल्य रु. १००/- फक्त

संपादक
**विवेक इनामदार**
मालक, मुद्रक, प्रकाशक
**हृषीकेश तपशाळकर**
सहयोगी संपादक
**अनिल कातळे**
सहसंपादक
**स्मिता उपेंद्र जोशी**
मुखपृष्ठ छायाचित्रकार
**देवदत्त कशाळीकर**
मॉडेल अभिनेत्री
**चंदा शिंदे, पुणे**
मेकअप
**पल्लवी जाधव**
**प्रकाशन स्थळ**
३१ भक्ती कॉम्प्लेक्स,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
पुतळ्यामागे, खराळवाडी,
पिंपरी, पुणे - १८
मोबाईल : ९०११०५०००५
मुद्रण स्थळ
**नर्मदा ऑफसेट**, २१३,
नारायण पेठ,
रविराज अपार्टमेंट, पुणे - ३०
मांडणी, सजावट व
जाहिरात रचना
**आम्रपाली गायकवाड**
**आकांक्षा इनामदार**
जाहिरात संकलन
**प्रभाकर तुमकर । गणेश यादव**
**अनुप घुंगुर्डे । गोविंद बर्गे**

अनुक्रमणिका
साहित्य

## अनुक्रमणिका २०२०

आपत्ती का इष्टापत्ती । प्रदीप मधुकर वाघ । २२

ऑनलाईन शिक्षणाचा अट्टाहास । श्रीपाद शिंदे । २४

मराठी मायबोली । सुनील ओंजळे : २६

'लोकमान्य'तर्फे हॉस्पिटल फॉर स्पेशल सर्जरी । यशपाल सोनकांबळे । २८

तत्त्वनिष्ठ संगीतकार खय्याम । प्रदीप गांधलीकर । ३१

टीव्ही वरचा एक वेगळा अनुभव...। श्रीकांत चौगुले । ३४

येईल धावूनी विठुराया माझ्या दारी । प्रभाकर तुमकर। ४३

सत्य-आभास । महेश भालेराव । ४६

अंधश्रद्धा । भूषण सहदेव तांबे । ५३

हिंदु धर्माची महत्ता । सुनील ओंजळे । ५४

'प्रकाशवाटा एक आकलन' । प्रा.डॉ.अतुल चौरे। ५८

दुर्ग अभ्यासक, लेखक संदीप तापकीर... । श्रीकांत चौगुले।६७

कल्पवृक्ष कन्येसाठी... । रंजना बांदेकर। ६९

कोरोना नंतरचे बदलते शिक्षण क्षेत्र । भूषण तांबे । ७०

वार्षिक राशी भविष्य २०२०-२०२१ । उमेश स्वामी । ७१

या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!

## अनुक्रमणिका जाहिरात


अतुल खंडूजी वायकर । ३

रविंद्र आण्णासाहेब भेगडे । ४

आर.एम.के. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. । ५

संजय तथा बाळा भेगडे । ६

महेश किसनराव लांडगे । ७

श्रीरंग आप्पा बारणे । ८

लिजन्सी ओॲसिस । ९

लिजन्सी रिव्हर साईड । १०

भगवती ज्वेलर्स । ११

काळोखे पाईप्स ॲण्ड प्रीकास्ट इंडस्ट्रीज । १२

स्वामी समर्थ इंडस्ट्रिज । १३

टीम ऑरबिटल । १४

वेट-एन-जॉय। अतुल राऊत।भूषण मुथा । १५

राहुल कलाटे । १६

अमित राजेंद्र गावडे । १७

राजू मिसाळ । १८

बबनराव भेगडे । ३५

सरस्वती शिक्षण संस्था । ३६

नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ । ३७

कृष्णराव भेगडे इंग्लिश मिडियम स्कूल । ३८

उषा मुंढे । ३९

सर्च । ४०

तुषार कामठे । ४१

संतोष खांडगे । ४१

आर फिटनेस । ४२

दिनेश लालचंद यादव । ४२

कुंदाताई भिसे । संजय भिसे । ५९

विशाल यादव । मिनल यादव । ५९

पै. श्विनाथराव भेगडे नागरी सहकारी पतसंस्था मर्या.।६०

जय मल्हार ग्रुप । ६०

चंद्रजित वाघमारे । ६१

लायन्स क्लब आंफ पुणे अग्र सफायर । ६१

राहुल धामणकर । प्रदीप नाईक । ६२

गणेश वसंतराव खांडगे । ६२

प्रवीण सुरेश चव्हाण । ६३

आदित्य खंडूजी टकले । ६३

केदार भेगडे युवा मंच । ६३

सतीश मरळ-देशमुख । ६४

बशीर सुतार । ६४

सुभाषराव जाधव । ६४

सुनील गणेश अप्पा ढोरे । ६४

राजेंद्र बाळासाहेब तरस । ६५

विजय वामनराव सातकर। ६५

आशिष विलास खांडगे । ६५


ग्रेडेशन्स स्टुडिओ । ६५

एमपीसी न्यूज । ६६





mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!



**काही वर्षापूर्वी जेव्हा माझ्या वडिलांना हृदयविकाराचा झटका आला, पाठोपाठ माझ्या काकानाही, नंतर माझ्या मित्रालाही आला, त्यातून तो वाचला. परंतु माझे वडील व माझे काका मात्र गेले. पाठोपाठ झालेल्या कौटुंबिक हानीमुळे मला प्रचंड भीती वाटू लागली. त्यानंतर हॉस्पिटलमधे जायचे म्हटल्यावर माझ्या हातापायाला कंप सुटायचा.**

# आपत्ती का इष्टापत्ती

**प्रदीप मधुकर वाघ**

घरातील आजारी माणसाला घेऊन मी कसाबसा डॉक्टरांच्याकडे, हॉस्पिटलमध्ये, दवाखान्यामध्ये, जायचो पण आत जाण्याची माझी हिम्मत नसायची किंवा माझी घाबरगुंडी उडायची, नको त्या टेस्ट वाटायचं कारण काही त्यातून निष्पन्न झालं तर ते आपल्याला सहन होईल का, अगोदर आपली एवढी कौटुंबिक हानी झालेली आहे या विचाराने अंगाचा थरकाप उडायचा मनामध्ये प्रचंड भीती दाटून यायची. आता आपलं काय होईल , आपल्याला काय होईल, आपल्याला काही त्रास होईल का या विचाराने अंगाचा थरकाप उडायचा. मनामध्ये प्रचंड भीती दाटून यायची. कंपनी मेडिकलमधील ईसीजी, स्ट्रेस टेस्ट जेव्हा करायची असेल तेव्हाही मनामध्ये प्रचंड भीती दाटून यायची पण त्यानंतर मी सहजपणे मेडिकल्स टेस्ट करु लागलो, हे सगळं काय घडलं, याचा शोध मी माझ्या परीने घेण्याचा प्रयत्न केला ,तेव्हा माझ्या लक्षात आले की आपण त्या संकटास तोंड न देता,एखाद्या त्रासापासून, एखाद्या व्यक्तीपासून, संभाव्य धोक्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला, त्यापासून पळून जाण्याचा प्रयत्न केला, त्याला बगल देण्याचा प्रयत्न केला तर ते उलट

जास्त त्रासदायक ठरु शकते पण आपण अचानक आलेल्या संकटाला न घाबरता तोंड दिले तर आपण त्यास हरवू शकतो कारण काय असावे तर मग माझ्या लक्षात आले की आपले गुरु स्वामीमहाराज हेच सांगत आहेत घाबरू नको मी तुझ्या पाठीशी आहे. संकटास तोंड दे! ही सर्व संकट तुझी परीक्षा घेण्यासाठी पाठवलेली आहेत त्यांना तोंड देण्यास सज्ज हो.  मनाला विचलित होऊ देऊ नको माझ्यावर विश्वास ठेव.

पाच वर्षापूर्वी मलाही हृदयविकाराचा त्रास झाला पण त्या संकटातून मी स्वामी कृपेने वाचलो. हे संकट आपल्यावर येऊन कोसळले, त्याने इजा व्हायची ती एकदा झाली, आता त्याच्यासाठी भिणे कशाला. आपल्याला ज्या गोष्टीचा आनंद वाटतो की गोष्ट आठवून, वाईट किंवा मानसिकदृष्ट्या दुर्बल कमकुवत करणाऱ्या गोष्टी मनात येऊ द्यायचे नाही, वाईट किंवा मानसिकदृष्ट्या दुर्बल कमकुवत करणाऱ्या विचारास मनाचे



mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

दरवाजे पूर्णपणे बंद करायचे, भिण्याचे कारण उरणार नाही त्या विचारांमध्ये महत्व देऊ नकोस. आपल्याला

ज्या गोष्टीचा आधार वाटतो ना, त्याच गोष्टीला जवळ करावे, त्याच्या सानिध्यात रहावे म्हणजे योग्य होईल. कोणत्याही संकटात पडलो तरी उठता येईल. आपल्या ज्या आवडत्या गोष्टींचा, चांगल्या आठवणींचा, संत वचनांचा, अभंगाचा, भजनाचा किंवा गुरुने केलेल्या उपदेशाचा जर आपण विचार केला तर आपल्याला दुष्ट अनिष्ट त्रास देणाऱ्या विचारास दूर ठेवता येईल.

खरंच गेल्या काही वर्षामध्ये, माझ्यासारखे समाजामध्ये अशी कितीतरी व्यक्ती असतील किंवा होत्या की ज्यांच्यावर कौटुंबिक हानीचे संकट कोसळले असेल, ज्यांना वेगवेगळ्या संकटांनी घेरलेले आहे किंवा होत्या, त्यांच्या कुटुंबातील अनेक व्यक्ती अचानकपणे गेल्या असतील, कुटुंबामध्ये कोणीही पुरुष माणूस शिल्लक राहिलेले नसेल, कोणीही कुटुंबाचे नेतृत्व करणारा कमावता माणूस शिल्लक राहिला नसेल. अशा कितीतरी व्यक्ती संकटाला तोंड देण्याचा प्रयत्न करतात, त्यात पडतात, उठतात, यशस्वीही होतात, त्या संकटावर मात करतात व पुढील जीवनक्रम साधू लागतात पण अशाही काही व्यक्ती आहेत की ज्यांना एकापाठोपाठ आलेले संकट जमिनीवरून उठण्याची ही संधीही देत नाही, जमिनीवरून उठण्याआधी दुसऱ्या संकटाचा फटका बसतो व ती व्यक्ती पूर्णपणे नामोहरम होऊन जाते , होण्याची शक्यता असते .उध्वस्त, मानसिक दृष्ट्या कम कुवत होण्याची शक्यता असते व अशा व्यक्तीला पुढच्या आयुष्याच्या पुढच्या कालावधीमध्ये अशी छोटी छोटी संकटे सुद्धा त्रासदायक ठरू शकतात, त्याला मानसिकदृष्ट्या विकलांग करू शकतात आणि त्याचं भविष्य रोखू शकतात. अशा वेळेस पूर्णपणे ती व्यक्ती किंवा त्याचे कुटुंब पूर्णपणे उध्वस्त होण्याची शक्यता असते.

कोरोनासारख्या , जग व्यापलेल्या संकटाने कुटुंबेच्या कुटुंबे उध्वस्त झाली, करता माणूस, तरणीबांड मुले गेली. घरात म्हातारा म्हातारी शिल्लक राहिली. उद्योगधंदे बसले, कर्जबाजारी झाले, लोकांच्या नोकऱ्या गेल्या, खाण्यापिण्याची भ्रांत झाली, मुलांच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान झाले शाळा–कॉलेज ही बंद पडली, अर्थव्यवस्था डबघाईला आली. शहरातील राज्यातील आरोग्यव्यवस्था लोकांना मार्गदर्शन करता करता कोरोनाला तोंड देतादेता मेटाकुटीस आली. आता या आलेल्या संकटाचे काय करायचे. त्यास तोंड देतादेता माणसे थकली, कधीकधी घरातील धान्य, भाजीपाला,इंधन सारे काही संपले पण जो तो आपल्या परीने लढत राहीला, तोंड देत राहिला. कोरोनासारख्या आलेल्या



संकटाला तोंड देता देता आपल्याला अतिरेकी पावसाला तोंड द्यावे लागले. शेतकऱ्यांच्या शेतातले पीक वाहून गेले, महापुराचे संकट आले, उभी पिके आडवी झाली, शेतातली माती वाहून गेली, पुरामुळे जनावरे ,गुरेढोरे वाहून गेले, घरांची पडझड झाली म्हणजे एका संकटाला तोंड देतादेता, दुसरे अस्मानी संकटांनी नुकसानीत टाकले पण यातून उभे राहण्यासाठी मनाचा भक्कमपणा राहणे जरुरीचे होते. संतयोगयांनी सांगितल्याप्रमाणे संकटाला तोंड दिले तरच देव मदत करेल. हात–पाय तर हलवले पाहिजे,गळून गेले नाही पाहीजे . हतबल होऊन कसे चालेल, मदत मिळेल तेव्हा मिळेल. कोणी तरी मदत देईल या आशेवर विसंबून राहणे गैर होईल. आपल्याला आपल्या कुटुंबाचा भार उचलावा लागेल हे एकदा आपल्या मनाला पटले की, बाकीचे काम सोपे झाले.

दुःख विसरणे, त्यास बाजूला सारणे, माझ्या कुटुंबास माझ्याशिवाय कोणीही नाही, मला कुटुंबास सावरले पाहिजे ही भावना जेव्हा मनात येते ना, तेव्हा कोणतेही संकट सोपे वाटते. त्या आपत्तीस कधीकधी इष्टापत्तीच म्हणावे लागते कारण त्यातूनच नवीन, नवजीवन उभे राहणारे असते, नवा समाज उभा राहणार असतो . नवीन उद्योग, नवीन धंदे, नवीन रोजगार उभे राहणार असतात, झालेले मनुष्यहानी भरून कधीच येणार नसली तरी भविष्यातील पिढीला घडवण्यासाठी कष्ट उपसावे लागतात,दुःख बाजूला ठेवावे लागते. कित्येकदा वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून कुटुंबासाठी ,आपल्या समाजासाठी दिवसरात्र एक करावे लागते आणि असा प्रयत्न करणाऱ्याला ईश्वर साथ देतोच म्हणूनच वाटते कधीकधी करून कोरोना सारखी पुर महापुरा सारखी आपत्ती पुर–महापुराचे थैमान, अतिरेकी पावसाचे संकट यांना या इष्टापत्तीच मानावे काय?


mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!



# ऑनलाईन शिक्षणाचा अट्टाहास

**शिक्षण हा विद्यार्थ्यांचा मुलभूत हक्क आहे. सर्व विद्यार्थ्यांना समान शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक बदल हा विद्यार्थी केंद्रित असायला हवा. कोरोना सारख्या महामारीच्या काळात अथवा तत्सम अडचणींच्या काळात ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय समोर येतो. पर्याय तसा गैर नाही. पण ज्या विद्यार्थ्यांसाठी हा अट्टाहास केला जातोय, त्यांच्या पर्यत ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारी संसाधने पोहोचली आहेत का? त्याचा वापर विद्यार्थी कितपत करू शकतात? याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे.**

**श्रीपाद शिंदे**

ऑनलाईन शिक्षणासाठी केवळ मोबाईल फोन, संगणक सर्वत्र पोहोचले म्हणजे झालं, असं नाही. तर प्रथम सर्वत्र वीज आणि इंटरनेट पोहोचणं हे देखील तितकच महत्वाचं आहे. आजही अनेक गावं अंधारात आहेत. मतांचा जोगवा मागितल्यानंतर पुढची पाच वर्ष न फिरकणारे लोकप्रतिनिधी आणि कामाप्रती जराही आत्मीयता नसलेले गेंड्याची कातडी पांघरलेले काही अधिकारी हेच यासाठी कारणीभूत ठरतील.

पाच जी, सहा जी हे इंटरनेट व्हर्जन आणण्याचे विचार देशात सुरु आहेत. त्याचे प्रयोगही काही ठिकाणी सुरु झाले आहेत. कित्येक एमबीपीएसचा नेटवर्क स्पीड केवळ शहरांमध्येच मिळतोय. पण अजूनही अनेक गावांमध्ये फोन लागण्याएवढी साधी रेंजही आलेली नाही. अडचणींच्या काळात काही किलोमीटर अंतर पायी तुडवून फोन करावा आणि मग मदत मिळावी, अशी परिस्थिती सध्या अनेक ठिकाणी आहे.

नांदेड मधील हदगाव तालुक्यात डाक्याचीवाडी नावाचे एक गाव आहे. या गावात मागच्या काही वर्षात बल्ब लागले. पण मोबईल फोनची रेंज मात्र अजूनही आलेली नाही. गावातल्या लोकांना काही किलोमीटर लांब जाऊन जगाशी संपर्क करावा लागतो. गाव फार जंगलात, दूर आहे असंही नाही. नांदेड शहरापासून अवघ्या ६० किलोमीटर अंतरावर हे गाव वसलेलं आहे. रायगड जिल्ह्यातील काही आदिवासी पाड्यांवर स्वातंत्र्याच्या सत्तरीनंतर वीज पोहोचली. अशाप्रकारे ऑनलाईन शिक्षणासाठी मुलभूत सुविधा नसलेल्या अनेक गावांच्या व्यथा मांडता येतील.

ऑनलाईन शिक्षणासाठी लागणा-या मुलभूत बाबी उपलब्ध करून देणं ही सरकारची प्राथमिकता असायला हवी. हे सगळं आज निर्णय घेतला अन उद्या उपलब्ध झालं, असंही होण्यासारखं नाही. पण व्यवस्थेने सर्वसामान्यांकडे मानवीयतेने पाहण्याची गरज आहे.

कोरोना काळात ऑनलाईन शिक्षणाने जोर धरला. येत्या काळात हीच शिक्षण पद्धती आत्मसात करावी लागणार, तेच योग्य कसं याबाबत अनेक चर्चा झाल्या. सध्या परिस्थिती फार विदारक आहे. सहा तासांच्या शाळेत सुमारे आठ ते नऊ वेगवेगळ्या तासिका होतात. पण आता ऑनलाईन शिक्षण पद्धतीत एक ते दोन तासात सगळं उरकलं जातंय. यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता टांगणीला लागलीय.

एकाग्रतेचा अभाव सर्रास विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत आहे. प्रत्येकाच्या घरात अभ्यासासाठी स्वतंत्र खोली अथवा वातावरण उपलब्ध नाही. प्रत्येक शहरात लाखो मुले झोपडपट्ट्या आणि दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत. अशा वातावरणात विद्यार्थी एकाग्र होणं केवळ अशक्य आहे. त्यामुळे इथे ऑनलाईन शिक्षणपद्धती फोल ठरण्याचा धोका आहे.

'मुलांच्या हातात मोबईल देऊ नका, मुलं बिघडतील' असा सूर आवळणारे शिक्षक आणि पालक आता मुलांच्या हातात अधिकृतपणे मोबईलचे सारथ्य देत आहेत. अधिकृतपणे मोबईल, संगणक वापरताना मुले इंटरनेटच्या माध्यमातून कुठच्या कुठे पोहोचत आहेत. त्यामुळे समस्त पालक आणि शिक्षक वर्गावर मुलांची मानसिकता सकारात्मक आणि सदृढ ठेवणे हा मोठा टास्क आहे. शिक्षित पालक मुलांच्या मोबाईल आणि संगणकाला पासवर्ड ठेऊन काही वेबसाईटस बंद करून नियंत्रण ठेऊ शकतील. पण



mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!



जे पालक अशिक्षित आहेत, त्याचं काय? असे एक ना अनेक प्रश्न या ऑनलाईन शिक्षण पद्धतीसमोर आ वासून उभे आहेत. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात इंटरनेटने आकलन क्षमतेच्या पलिकडचे बदल घडवून आणले. ज्ञानार्जन करण्यासाठी इंटरनेट एवढा जवळचा मित्र, शिक्षक कोणीच नाही. जे हवं ते इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिलं जातं. स्टॅटीस्टा या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार, भारतात २०१५ साली २४ कोटी २९ लाख २० हजार मोबईल फोन धारक होते. त्यात पाच वर्षात वाढ होऊन ही संख्या २०२० साली ४४ कोटी ८२ लाख एवढी झाली आहे. सोशल मिडीया वापरणारे २०१५ साली १४ कोटी २२ लाख ३० हजार होते. तर २०२० साली सोशल मिडीया वापरकर्त्यांचा आकडा ३७ कोटी ६१ लाख एवढा झाला आहे. मागील पाच वर्षात सोशल मिडियाचा वापर अडीच पटींहून अधिक वाढला आहे. भारतात इंटरनेट वापरकर्त्यांची संख्याही लक्षणीय आहे. २०१५ मध्ये ३० कोटी २३ लाख ६० हजार असलेली संख्या २०२० मध्ये ६९ कोटी ६७ लाख ७० हजार एवढी झाली आहे.

मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मिडियाचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. यात आपली मुले कुठे आहेत. त्यात अडकून भरकटत आहेत की ज्ञानार्जन करण्यासाठी इंटरनेटचा मर्यादित वापर करत आहेत, हे पाहणं महत्वाचं आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मिडीयाचा वापर करणे गैर नाही. पण केवळ अटेन्शन मिळविण्यासाठी अनेकजण नको त्या पातळीवर जातात. व्हाटसअपवर स्टेटस ठेऊन ते वारंवार किती जणांनी पाहिलं, हे पाहणं. फेसबुक, इंस्टाग्रामवर एखादी पोस्ट करून त्याला किती लाईक्स मिळाल्या, कुणी काय कमेंट केल्या, हे वारंवार तपासात राहणं हे देखील एक प्रकारचं व्यसनच आहे. सोशल मिडिया हे व्यक्त होण्याचे, विचार शेअर करण्याचे माध्यम आहे. त्यात अडकून जाणं म्हणजे स्वतःच स्वतःच्या व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा आणल्यासारखं आहे.

युजर्स ज्याप्रमाणे अनेकांचे अटेन्शन मिळविण्यासाठी वेगवेगळ्या पोस्ट टाकतात. तसच सोशल साईटच्या कंपन्या नवनवीन फीचर्स आणून युजर्सचे अटेन्शन मिळवत आहेत. आता त्यात किती गुरफटायचं हे ज्याचं त्यानं ठरवायला हवं. पण हे गुरफटून जाणं विद्यार्थी दशेला परवडणारे नाही. ऑनलाईन शिक्षण व्यवस्था सुरु करताना या बाबी देखील लक्षात घ्यायला हव्यात.

तंत्रज्ञान, त्याची ओळख आणि वापर या बाबतीत ग्रामीण आणि शहरी असे दोन गट तयार करून त्यावर मार्ग काढता येईल. कारण ग्रामीण भागात अगदी शून्यापासून सुरुवात करायची आहे. ती परिस्थिती अपवाद वगळता शहरी भागात नक्कीच नाही. शहरी भागात जिथे इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळा आहेत, त्या शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांच्या वेगळ्याच अडचणी आहेत. फी न भरल्यामुळे तसेच फी भरण्यास विलंब झाल्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन वर्गात जॉईन करून घेतले जात नाही. जरी जॉईन करून घेतले तरी या ना त्या कारणाने संबंधित विद्यार्थ्याचे म नसिक खच्चीकरण करण्याचे प्रकार केले जात आहेत. अशा अनेक तक्रारी शिक्षण विभागाकडे आल्या आहेत.

कोरोना काळात सगळ्यांनाच जमिनीवर यावे लागले आहे. सर्वजण आर्थिक अडचणींना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत शाळेच्या कोणत्याही सुविधेचा वापर न करता विद्यार्थ्यांची १०० टक्के फी वसूल करण्याचा सपाटा काही शाळांनी लावला आहे. पालक संघटना याचा विरोधही करत आहेत. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण ही काळाची गरज असली तरी त्यात अनेक सुधारणा अपेक्षित आहेत. सुधारणांचा सकारात्मक विचार न झाल्यास ही नावापुरती ऑनलाईन शिक्षण पद्धती मुलांचे आरोग्य आणि भविष्य बिघडविण्यासाठी सर्वाधिक कारणीभूत असेल, यात शंकाच नाही.



mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

# माझा मराठाचि बोलु कौतुकें ।
# परि अमृतातेंही पैजां जिंके ।

**- ज्ञानेश्वरी, अध्याय ६, ओवी १४ (अर्थ) :**

**माझे बोल निवळ मराठीत आहेत, हे त्याचे कौतुक खरे; परंतु ते प्रतिज्ञेने सहज अमृतालाही जिंकतील. असे संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचे वर्णन करतांना सांगितले आहे. मराठी भाषा संस्कृतनंतर जगातील सर्वात सात्त्विक भाषा आहे. नादब्रह्माची अनुभूती देणाऱ्या मराठी भाषेच्या अंगभूत सात्त्विकतेचा लाभ आपण स्वतःच्या आचरणातून घ्यायला हवा. यासाठी प्रत्येकानेच शुद्ध मराठीतून बोलण्याचा प्रयत्न करायला हवा; कारण जेथे उच्चारांची शुद्धता असते, तेथे पावित्र्य असते आणि तेथेच ईश्वरी तत्त्व आकृष्ट होते.**

# सौंदर्य, माधुर्य विविधतेने नटलेली मराठी मायबोली

सुनील ओंजळे

मराठी भाषा सर्वसमावेशक असून तिच्यात अन्य भाषांतील शब्द सहजतेने सामावले आहेत. त्यामुळे ती व्यापक आहे', असे काही आंग्लाळलेल्या विद्वानांचे म्हणणे आहे; परंतु भाषाभिमानाचा संबंध थेट राष्ट्राभिमानाशी आहे', हे लक्षात घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्राप्रमाणेच मराठी भाषेवरही यवनी सत्तेकडून करण्यात आलेली आक्रमणे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांनी परतवून लावली. त्यानंतर भाषेवर झालेल्या इंग्रजीच्या आक्रमणाला परतवून लावण्याचे कार्य निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी केले आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी अन्य सर्व आंदोलने सांभाळून भाषाशुद्धीचे कार्य अनेक वर्षे चालवून ते नेटाने पुढे नेले. दैनंदिन व्यवहारात अनेक स्वकीय शब्द वापरायची सवय महाराष्ट्राला झाली ती सावरकरांमुळेच ! येथेही दैनंदिन व्यवहारातील काही स्वकीय शब्द दिले आहेत.

मराठी भाषा अप्रतिम सौंदर्याने नटलेली आहे. शब्दांच्या विविध छटा असलेल्या मराठी भाषेत एकाच शब्दाचे अनेक अर्थ होऊ शकतात. ऱ्हस्व आणि दीर्घ योग्य प्रकारे न लिहिल्यास अर्थात होणारे पालट, चिन्हांचे (एकेरी अवतरण चिन्हे, स्वल्पविराम यांचे) स्थान पालटल्यामुळे वाक्याच्या अर्थावर होणारा परिणाम, अक्षरावर अनुस्वार दिल्यामुळे होणारे दोन अर्थ, वाक्यरचना आणि व्याकरण न पालटता दोन अर्थ होणारी वाक्ये या लेखात दिली आहेत. तसेच मराठी भाषेतील काही गंमती आणि विनोदही येथे दिले आहेत. अर्थाने परिपूर्ण नटलेले शब्द असणारी ही एकमेव भाषा असावी.

मराठी भाषा देवाने दिलेली एक अमूल्य देणगीच आहे. समृद्धता, परिपूर्णता आणि मधुरता यांनी वैभव संपन्नता प्राप्त झालेल्या या भाषेतील शब्द भांडाराचा आनंद सर्वांनाच घेता यावा, यासाठी त्यातील अनमोल रत्नांपैकी काही तुरळक (शब्द) रत्ने आम्ही येथे दिली आहेत. स्वतःसमवेत अर्थाचा प्रकाश घेऊन येणारी ही शब्दरत्ने आनंद तर प्रदान करतातच, तसेच समृद्धही करतात. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, समर्थ रामदासस्वामी आदी संतांनी विविध प्रकारचे गद्य आणि पद्य यांच्या सुंदरतेने आभूषित केलेल्या आणि जगभर गौरवलेल्या या मायबोलीची अवीट गोडी खऱ्या अर्थाने अनुभवण्यासाठी तिच्या निकटतम सहवासाची (अभ्यासाची) आवश्यकता आहे. तरच सांदी कोपऱ्यात पडलेल्या (टाकलेल्या) आपल्या मायबोलीला पुन्हा ऊर्जितावस्था प्राप्त होईल आणि खऱ्या अर्थाने तिचा तो सन्मान होईल.

हा लेख वाचून सर्वांनाच मराठी भाषेचे सौंदर्य, माधुर्य आणि विविधता लक्षात येईल. अत्यंत अवीट गोडी असलेल्या या मायबोलीचे जतन आणि जोपासना करण्यासाठी सर्वांनाच स्फूर्ती मिळो आणि त्याप्रमाणे त्यांच्याकडून प्रयत्न होवोत, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !'

**भाषाशुद्धीचे महत्त्व :** तांदूळ नीट निवडलेले नसले, तर जेवतांना खडा लागतो आणि जेवणातला आनंद न्यून होतो. त्याप्रमाणे लिखाणात किंवा बोलण्यात इतर भाषांतील शब्द आल्यास त्यातील आनंद न्यून



mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

होतो.'

**व्याकरणाचे महत्त्व :** मराठी भाषेत शब्दांना लागणाऱ्या काना,मात्रा, अनुस्वार, स्वल्पविराम, संधी, विभक्ती, प्रत्यय इत्यादींच्या वापराला महत्त्व आहे; कारण त्यांच्या अनाठायी वापराने शब्दाचा अर्थ पालटतो. छोट्याशा स्वल्पविरामानेही अर्थाचा अनर्थ होतो. याची काही उदाहरणे दिली आहेत. (अ.) शत्रूको रोको, मत जाने दो' याऐवजी शत्रूको रोको मत, जाने दो', असे लिहिल्यास भलताच गोंधळ होईल. (आ.) अनसूया' (अन् +असूया) म्हणजे द्वेष नसणारी' हे नाव अनसुया' असे चुकीचे लिहितात. (इ.) दूरदर्शनवरमनापासून' (?) हार्दिक अभिनंदन', दुर्दशन (दूरदर्शन)', माझी मदत करा',इत्यादी अनेक विषयांत मराठीचे व्याकरणरहित आधुनिकीकरणझाले आहे !

व्याकरण अशुद्ध लिहिल्यास एकाच वाक्याचे दोन वेगवेगळे अर्थ होतात.

र्हस्व, दीर्घ योग्य प्रकारे न लिहिल्यास अर्थात पालट होतात. उदाहरण म्हणून रवि – सूर्य , उदाहरण म्हणून रवी – . ताक घुसळण्याची रवी,

विरामचिन्हांचे स्थान पालटल्यामुळे वाक्याच्या अर्थावर कसा परिणाम होऊ शकतो हे यातून सूचित होते.

लिखाण वाचतांना कोठे आणि किती थांबावे, कोठे प्रश्नचिन्ह किंवा उद्गार काढावा, आवाजात कोठे चढ–उतार करावा, तसेच पूर्ण आणि अपूर्ण विधान कोणते, हे विरामचिन्हांमुळेच कळणे शक्य होते. या चिन्हांमुळे बोलणाऱ्या व्यक्तीचे तिच्या बोलण्यामागील भाव समजतात, म्हणजेच तिच्या बोलण्याचा खरा आशय समजतो. लिखाणात विरामचिन्हांचा वापर चुकीच्या ठिकाणी केल्यास संबंधित वाक्याचा अर्थच पालटून (बदलून) जातो, तर या चिन्हांचा वापर न केल्यामुळे वाक्याचा अर्थबोधच होत नाही. विरामचिन्हांचा अचूक वापर करण्याचे महत्त्व लक्षात येण्यासाठी पुढे काही उदाहरणे दिली आहेत.

स्वल्पविरामाचा उपयोग योग्य ठिकाणी न केल्यामुळे वाक्याचा अर्थ पालटतो. उदाहरण म्हणून बाबा तुम्हाला मारतील' मूळ वाक्य : बाबा, तुम्हाला (ते) मारतील.

स्वल्पविराम योग्य ठिकाणी न लिहिल्यामुळे अर्थात झालेला पालट : (माझे) बाबा तुम्हाला मारतील.

अर्थहीन शब्दाला आणखी एक शब्द जोडला जाऊन तो भाषेत वापरला जात आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

(कडेवर) : एरव्ही त्याच्यावर', वस्तूवर', ग्रंथावर' अशा शब्दांमध्ये त्याच्या', वस्तू', ग्रंथ' अशा कुठल्यातरी अर्थ असलेल्या शब्दाला वर' हा शब्द जोडला जातो आणि पूर्ण शब्द सिद्ध होतो. हे शब्द सिद्ध होतांनाही त्याच्या', वस्तू', ग्रंथ' या शब्दांच्या अर्थांना महत्त्व असते; परंतु कडे' या शब्दाला कडेवर' या शब्दाच्या अर्थाच्या दृष्टीने काहीच अर्थ नाही. तरीही त्याला वर' हा शब्द जोडला जाऊन कडेवर' हा शब्द सिद्ध झाला आहे आणि तो कटीवर' या अर्थाने भाषेत वापरला जात आहे.

(करकर) : कर' म्हणजे हात' आणि कर' म्हणजे एखादी गोष्ट कर' असे दोन अर्थ आहेत. मग करकर' म्हणजे काय ? (मराठीतील नादानुकारी; पण अर्थहीन शब्द) + कर' म्हणजे इंग्रजी टॅक्स' या अर्थानेही हा शब्द वापरला जातो.

खालील दोन्ही वाक्ये व्याकरणदृष्ट्या योग्य अशी आहेत उदाहरण म्हणून दिले आहे.

वाक्यात तिने' व ती' हे दोन्ही शब्द योग्य असल्याची उदाहरणे

१. तिने लाल रंगाची रेशमी साडी नेसली होती. २. ती लाल रंगाची रेशमी साडी नेसली होती. वाक्यात पुरुषांनी' व पुरुषांना' हे दोन्ही शब्द योग्य असल्याची उदाहरणे

१. पुरुषांनी अलंकार आणि फुले घालण्याची आवश्यकता नसते. २. पुरुषांना अलंकार आणि फुले घालण्याची आवश्यकता नसते.

अन्य भाषांच्या तुलनेत मराठी भाषेची संपन्नता ! – इतर भाषांची तुलना मराठीशी केली, तर यातून मराठीची संपन्नता दिसून येते. प्रत्येक भाषेची काही वैशिष्ट्ये असतात. शेर–शायरी, कवाली, गझल इत्यादी उर्दू भाषेचे वैशिष्ट्य आहे.हायकू हे जपानी भाषेचे वैशिष्ट्य आहे. सॉनेट हे इंग्रजी भाषेचे वैशिष्ट्य आहे. पण मराठीत कितीतरी वैशिष्ट्ये दिसतात. ओव्या, ऋचा, श्लोक, अभंग, ठुमरी, भावगीत, भक्तीगीत, वात्रटिका, चारोळ्या, लावणी, पोवाडा, अंगाई गीत, जात्यावरच्या ओव्या, भूपाळी, पाळणा, येळकोट, अष्टक, स्तवन असे कितीतरी प्रकार आहेत याची खूप मोठी सूची तयार होईल तथापि या संक्षिप्त तुलनेवरून कोणती भाषा श्रेष्ठ वाटते, ते आपणच ठरवावे.

**आजची प्रचलीत असणारी मराठी भाषा यातून होणारी मराठीची गळचेपी**

१.ए, तू जरा जल्दीच निघून ये बरका ! मी तुझ्यासाठी वेट (wait) करीन

२. माझ्या टीचर्सनी चांगलं टीच केलं; म्हणूनच मी हे सक्सेस गेन (सरळप) करू शकलो! कसे वाटते ऐकायला ? हे मराठी बोलणे आहे का हा विचार करायला हवा.

मराठी मधील घुसलेले शब्द त्यातून बाहेर काढून शुद्ध मराठी उपयोगात आणले पाहिजे. मराठी भाषेची अवस्था दिवसेंदिवस विदारक होत चालली आहे. मराठी भाषेतील शब्दांची जागा इंग्रजी, उर्दू,पारशी आदी भाषांतील शब्दांनी घेतली आहे. मराठीमध्ये त्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जात आहे. त्यामुळे मराठी भाषेतील शुद्धत्व, सोज्वळता हरपत चालली आहे. सौंदर्य लोपवणारे स्वरूप तिला येत चालले आहे. ती तेजोहीन झाली आहे आणि काही तुरळक भाषाभिमानी वगळता याला कोणीही विरोध करत नाहीत. मराठी भाषेचे असणारे वैभव टिकविण्यासाठी प्रयत्न करणे हि भावी काळाची आवश्यकता आहे . ॐ

संकलक – श्री. सुनील ओजाळे,
संपर्क – ९२२५६३९१७०



mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

**पिंपरी चिंचवड येथे लोकांच्या आरोग्य सेवेमध्ये नावाजलेले, नामांकित लोकमान्य हॉस्पिटल. पुणेकरांच्या सेवेसाठी गोखलेनगर येथे हॉस्पिटल फॉर स्पेशल सर्जरी या नव्या हॉस्पिटलच्या उभारणीमागील भूमिका स्पष्ट करणारी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. नरेंद्र वैद्य यांची विशेष मुलाखत.**



# ‘लोकमान्य’

## तर्फे पुण्यात प्रथमच हॉस्पिटल फॉर स्पेशल सर्जरीची उभारणी

यशपाल सोनकांबळे

**प्रश्न : सांधेरोपण शस्त्रक्रिया म्हणजे नेमके काय आणि यामध्ये कोणकोणत्या सर्जरी केल्या जातात ?**

माणूस हा दोन पायावर चालणारा एकमेव प्राणी आहे. त्याम ुळे सांध्याची सतत झीज होत असते, त्यामुळे त्याची देखभाल दुरूस्ती देखील करावी लागते. सांध्यामधील कुर्च्या कार्टिलेज झिजायला लागतात आणि मग हाडे एकमेकांना घासायला लागली की अतीव वेदना व्हायला लागतात.

त्यामुळे हळू हळू चालायला येत नाही लंगडणं चालू होतं. पायाला बाक येतो, पायाला वाकडेपणा येतो. वेदना असह्य झाल्या की आयुष्य नकोसं वाटंत. त्यामुळे क्वालिटी ऑफ लाईफ प्रचंड प्रमाणात हॅंपर होते. त्यामुळे सांधेरोपण शस्त्रक्रिया म्हणजे सांध्यामधील कुर्च्या म्हणजे कार्टिलेज बदलणं.

पुर्वी शस्त्रक्रिया करत असताना हाड चांगलं कापावं लागायचं पण आता सांध्यांम धील लिगामेंट कायम ठेवून मूळ रचना तशीच ठेवून शस्त्रक्रिया केली जाते. त्यामुळे आपलं गुणवत्तापूर्ण जीवन सुधारतं.

**प्रश्न : साधारण कोणकोणत्या सांध्यांमध्ये सांधेरोपण शस्त्रक्रिया करू शकतो ?**

शरीरातील प्रत्येक सांध्यांमध्ये सांधेरोपण शस्त्रक्रिया करू शकतो. त्यामध्ये शरीरातील सर्व चार महत्त्वाचे सांधे आहेत. खांदा, कोपरा, हिप जॉईंट आणि मणक्यातील गादी बदलणे अशा सर्व सांध्यांमध्ये शस्त्रक्रिया केली जाऊ शकते.

पुण्यामध्ये कृत्रिम सांधेरोपण करणारा मी पहिला सर्जन होतो. गेली २८ वर्षे सांधेरोपण करण्याची प्रक्टिस मी करत आहे. आता जवळपास २० हजाराहून जास्त गुडघ्यांचे सांधेरोपण केले आहेत. आपल्या देशात सर्वाधिक गुडघ्याचे सांधेरोपण होतात. कारण गुडघ्याचे सर्वात जास्त विकार आपल्या समाजात दिसतात.

**प्रश्न : गेल्या ४० ते ४५ वर्षापासून पिंपरी चिंचवड येथे लोकमान्य हॉस्पिटल लोकांच्या सेवेत आहे. लोकांचा विश्वास आहे आणि नाव आहे. परंतु पुण्यात गोखलेनगर येथे नवीन लोकमान्य एचएसएस हे नवीन रुग्णालय उभारलं आहे. त्याम ागील भूमिका काय ?**

लोकमान्य हॉस्पिटलची स्थापना माझे वडील डॉ.व्ही.जी. वैद्य यांनी १९७२-७३ साली केली होती. पिंपरी चिंचवड हा ग्रामीण भाग समजला जायचा. त्यामध्ये हळूहळू सुधारणा होत गेली. आता ते शहर म्हणून विकसीत होत आहे. त्यामुळे त्याम ध्ये जसजशी वाढ झाली त्याप्रमाणे वेगवेगळ्या रुग्णांची वाढ होत गेली.

त्यांच्या गरजा वाढू लागल्या. त्यामुळे नव तंत्रज्ञान आम्ही पहिल्यांदा पिंपरी चिंचवड येथील रुग्णालयात सर्वप्रथम आणलं. देशातील पहिला एक्स्प्रेस हायवे पुणे मुंबई झाल्यानंतर पहिली इमर्जन्सी मेडिकल सर्विस – इएमएस लोकमान्य हॉस्पिटलमध्येच सुरू झाली.

त्यामुळे त्या महामार्गावर जे अपघात होत होते. त्या अपघातामध्ये फरक असायचे. साध्या रस्त्यावरील अपघात, घरगुती पडल्यामुळे झालेले अपघात आणि एक्सप्रेस हायवेवरील भयंकर अपघात यामध्ये प्रचंड तफावत आहे.

त्यामुळे १९९६ साली इएमएस आणि गोल्डन अवर प्रोजेक्टमध्ये आम्ही चालू केली. त्यानंतर आजतागायत जवळपास पावणे दोन लाख लोकांना आम्ही वाचवू शकलो. नवनवीन गोष्टी तंत्रज्ञान पिंपरी चिंचवड भागालाच नाही तर संपूर्ण देशाला देऊ शकलो.



mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!



अस्थि शस्त्रक्रियेमध्ये सर्वप्रथम लेझरचा वापर आम्ही केला. नेविगेशन म्हणजे कम्प्युटर असिस्टेड रिप्लेसमेंट २००१ साली पहिल्यांदा पिंपरी चिंचवड भागात आम्ही केलं.

१९७२ साली प्राथमिक स्वरुपातील लोकमान्य हॉस्पिटल आज जगभरातील लंडन युरोपच्या धर्तीवर शस्त्रक्रिया करणारं पहिलं हॉस्पिटल बनलं. जगात कुठेही जाण्याची गरज भासणार नाही अशी व्यवस्था लोकमान्यमध्ये आम्ही निर्माण केली.

पिंपरी चिंचवड शहरात सर्वसामान्य लोकांना स्वस्त आणि परवडणाऱ्या दरात आरोग्य सेवा देता आली पाहीजे या उद्देशाने आम्ही तंत्रज्ञान आणत गेलो.

त्यानंतर २०१६ साली देशातील नव्हे तर आशिया खंडातील सर्वात पहिलं रोबोटीक नी रिप्लेसमेंट तंत्रज्ञान पिंपरी चिंचवड येथे आम्ही आणू शकलो. ज्यावेळी निगडीमध्ये आम्ही लोकमान्य हॉस्पिटलमध्ये हे नव तंत्रज्ञान आणलं.

त्यावेळी आमच्या लक्षात आलं की लोकमान्यमध्ये केवळ पिंपरी चिंचवड, पुणे शहर किंवा जिल्ह्यातून येणारे रुग्ण नाहीत. तर संपूर्ण राज्यभरातून देशातून परदेशातून देखील रुग्ण उपचार घेण्यासाठी येत होते.

जगातील तब्बल १६ देशांमधील रुग्ण लोकमान्य मध्ये आले आहेत. लॉकडाऊन नंतर बिहार, उत्तर प्रदेशमधील रुग्णांवर देखील आम्ही शस्त्रक्रिया केल्या आहेत. लोकमान्य मधील नव तंत्रज्ञान आणि त्याचे फायदे लक्षात आल्यानंतर देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक येतायत आणि शस्त्रक्रिया करून घेत आहेत.

ही गरज लक्षात घेऊनच आम्ही शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असणारं सर्वसामान्य रुग्णांना उपचार देणारं रुग्णालय असावं. स्वस्त आणि परवडणाऱ्या दरात आरोग्यसेवा देण्याच्या उद्देशाने स्पेशालिटी सर्जिकल सेंटर उपलब्ध करून दिलं आहे. त्यातून गोखले नगर येथे हॉस्पिटल फॉर स्पेशल सर्जरी उभारण्यात आलं. लोकांना रेल्वे स्टेशन, एयरपोर्ट जवळ असल्यामुळे १२५ बेडचे अत्युच्च तंत्रज्ञानावर आधारीत सर्जरी करणारे हॉस्पिटल म्हणून हे उभारलं आहे.

जेणेकरून राज्य नव्हे तर देशातील सर्वांसाठी शस्त्रक्रिया करणारे हॉस्पिटल बनावे हा उद्देश आहे. आता नवीन रोझा रोबोटीक हे नव तंत्रज्ञान आम्ही याठिकाणी लाँच केलं आहे. देशात कुठेही ही टेक्नॉलॉजी आलेली नाही. ऑर्थोपेडीक, न्यूरोसर्जरी, प्लॅस्टिक सर्जरी, लॅप्रोस्कोपीक सर्जरी आहे अशा सर्व सर्जरी देखील या ठिकाणी होऊ शकणार आहे.

कारण रुग्णालयांमध्ये मल्टिस्पेशालिटी असतात त्यामुळे त्यांचा फोकस हरवतो असं मला वाटतं. म्हणून नवतंत्रज्ञानावर आधारीत फोकस केयर दिली पाहीजे या उद्देशाने हे हॉस्पिटल उभारलं गेलं आहे. त्यामध्ये जागतिक दर्जाचे ऑपरेशन थिएटर आहेत.

तसेच अनुभवी सर्जन, उपकरणांसह रुग्णांना ग्रुप फिजीओ थेरपी देखील केली जाते. रुग्ण पूर्ण बरा व्हावा यासाठी डे केयर सर्जरी, पेनलेस सर्जरी करण्यासाठी हे रुग्णालय नक्की मदतशीर ठरेल. पुण्यातील नव्हे तर देशातील रुग्णांसाठी हे महत्त्वाचे केंद्र बनेल याचा आम्हाला नक्की विश्वास वाटतो.

**प्रश्न : पुणे हे मेडिकल टुरिझम केंद्र म्हणून जगाच्या नकाशावर येत आहे. त्यामुळे या हॉस्पिटलमध्ये अशा कोणत्या सर्जरीज आहेत की जेणेकरून मेडिकल टुरिझम वाढू शकेल ?**

ऑर्थोपेडीक मधील सर्वात आधुनिक तंत्रज्ञान आम्ही लोकमान्य एचएसएसमध्ये आणलं आहे. उदाहरणार्थ नी रिप्लेसमेंटसाठी नेवियो रोबोटिक्स, रोझा रोबोटिक्स अशा तीन अत्याधुनिक तंत्रज्ञान आम्ही आणलं आहेच. लॉकडाऊन नंतर शंभरहून जास्त नी रिप्लेसमेंट सर्जरी झाल्या आहेत.

की होल सर्जरी, मणक्यावरील सर्जरी, दुर्बिणीद्वारे केल्या जाणाऱ्या सर्जरी यासाठी तज्ज्ञ, सर्जन आणि उपकरणं इन्स्टॉल केली आहेत. प्लॅस्टिक सर्जरी करीता देखील सर्व तंत्रज्ञान आहे.


mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!




आजकाल आपण कसे दिसतो किंवा दिसायला हवे यासाठी जागरुक असतात. भुवई, नाक, हनुवटी यासाठी लायपोसक्शन, बॉडी शेपिंग शस्त्रक्रिया साठी देशातून मागणी वाढत आहे. त्याम ध्ये नामांकित सर्जन आमच्याशी सलंग्न आहेत.

**प्रश्न : शस्त्रक्रिया करत असताना मधुमेह, हृदयरोग, रक्तदाबाचे पेशंट असतात त्यांच्यासाठी समातंर आरोग्यसेवा देखील दिली जाते का ?**

हो, आमच्या कडे डयग्नॉस्टिक बॅकअप आहे. हिमोग्लोबिन, एक्सरे, टु डी इको, सोनोग्राफी, इसीजी, सीटी स्कॅन वाजवी दरांमध्ये संलग्न आहेत. कृष्णा डायग्नॉस्टिकसोबत टायअप केले आहेत. गुणवत्तेमध्ये कुठल्याही प्रकारची तडजोड न करता वाजवी दरामध्ये सर्व सुविधा एचएसएस मध्ये उपलब्ध आहेत.

**प्रश्न : लोकमान्य एचएसएस हे लोकांच्या सेवेत पुर्ण क्षमतेने केव्हा पासून सुरू होईल ?**

मुळात औपचारीक उद्घाटनापुर्वीच आम्ही सेवेत दाखल झालो आहोत. जगावर कोरोनाचे संकट आले त्यामुळे आम्हाल उद्घाटन करण्यासाठी उशीर झाला. परंतु तत्पुर्वीच आम्ही शस्त्रक्रिया करायला सुरूवात केली आहे. लोकांसाठी हॉस्पिटल सुरू झालेलं आहे.

कोविड साठी ५०० च्यावर रुग्णांना सेवा देऊन डिस्चार्ज केलेले आहे. सर्जिकल आयसीयू, डायग्नॉस्टिक सेंटर, फिजीकल आयसीयू, ओपीडी सुरू झाले आहेत.

**प्रश्न : रोबोटिक सर्जरी म्हटले की पूर्वी परदेशात लोक जात होते. त्यामुळे प्रवास खर्च आणि प्रत्यक्ष सर्जरीचा खर्च**





**अफाट होत असे. त्या तुलनेने कशा प्रकारच्या सुविधा लोकम ान्य एचएसएस मध्ये असणार आहेत. सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यात या सुविधा असतील का ?**

साधारण गुडघे प्रत्यारोपण म्हणजे नी रिप्लेसमेंटसाठी जो खर्च लागतो. त्यापेक्षा फार खर्च रोबोटिक सर्जरीसाठी लागत नाही. वाजवी आणि स्वस्त दरात सर्व सर्जरी केली जाते. सर्व स्कीम, इंश्योरन्समध्ये या सर्जरी केल्या जातात.

कोणत्याही रुग्णांना वाजवी दरात रोबोटीक, लेझर, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियांचे दर नियंत्रित दरात उपलब्ध करून देतो. त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यात, खिशाला परवडेल अशा दरात सर्व सर्जरी लोकमान्य एचएसएसमध्ये उपलब्ध करून दिल्या आहेत. ഩ


mpc news.in राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!



**चित्रपटसृष्टी ही मायावीनगरी आहे. सातत्यानं लोकांपुढं तुमचं काम येत राहिलं तरच इथं तग धरून राहता येतं. तसेच तुम्हाला यशासाठी अनेक तडजोडी कराव्या लागतात; परंतु खय्यामसारखी प्रतिभावान आणि तत्त्वनिष्ठ माणसं आपल्या मनाप्रमाणे मोजकंच काम करून लोकप्रिय होतात. इतकंच नव्हे तर सुमारे पाऊणशे वर्षे आपली कारकिर्द गाजवितात.**

# तत्त्वनिष्ठ संगीतकार खय्याम

प्रदीप गांधलीकर

खय्याम यांचा जन्म १८ फेब्रुवारी १९२७ रोजी झाला. जालंधर जिल्ह्यातील राहो या गावी हाश्मी कुटुंबातील दुसरं अपत्य म्हणजे मोहंमद जहूर खय्याम हाश्मी होय. खय्याम यांचे वडील हाश्मीसाहेब मशिदीत इमाम होते. त्यांचा आवाज भारदस्त पण गोड होता. हाश्मीसाहेब अजान द्यायचे, ती छोटा खय्याम लक्षपूर्वक ऐकत असे.

खय्याम सरकारी हायस्कूलमध्ये असताना त्याला मास्टर बुटाराम नावाचे शिक्षक होते. खय्याम त्यांचा आवडता विद्यार्थी होता. ते रोज संध्याकाळी खय्यामला मंदिरात घेऊन जात. मंदिरात आरती व्हायची... 'ओम जय जगदीश हरे!' वडिलांची अजान आणि गुरुजींची आरती यामुळे अगदी लहान वयातच त्याच्या मनावर सर्वधर्मसमभाव हे मौलिक संस्कार झाले.

हाश्मीसाहेब हे व्यासंगी व्यक्तिमत्त्व होतं. त्यांच्याकडं अनेक नामवंत शायरांची पुस्तकं होती. याशिवाय त्यांच्याकडं ग्रामोफोन होता; आणि उत्तमोत्तम गझलांच्या तबकड्या होत्या. त्यामुळे बालवयात खय्यामला गझल, शायरी अन् साहित्याची गोडी लागली.

खय्यामच्या मोठ्या भावाचा जालंधर येथे वाहतुकीचा व्यवसाय होता. त्यामुळे शनिवारची सकाळची शाळा सुटली, की खय्याम तडक जालंधरला रवाना व्हायचा. शनिवार–रविवार दोन–तीन चित्रपट पाहून तो राहोला परत यायचा.



mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

सातत्यानं दर आठवड्याला चित्रपट पाहत असल्यानं खय्यामच्या मनात अभिनेता होण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली. त्या काळात अभिनेत्याला गाणं म्हणता येणं अनिवार्य होतं म्हणून कुटुंबीयांचा विरोध पत्करून खय्यामनं घर सोडलं आणि तो पंडित अमरनाथ यांच्याकडे; तसेच त्या काळातील प्रसिद्ध संगीतकार हुस्नलाल– भगतराम या जोडीकडं संगीताचं शिक्षण घेऊ लागला. पाच वर्षे त्यानं संगीत शिक्षण घेतलं.

या दरम्यान दुसरं महायुद्ध सुरू झालं; आणि ब्रिटिश सरकारनं फौजेत भरती होण्याच्या प्रचारासाठी खेडोपाडी नाटकं दाखवायला सुरुवात केली. नट होण्याची खुमखुमी असलेला किशोरवयीन खय्याम या अशा एका नाटक कंपनीत अभिनय करू लागला.

त्या काळात लाहोर हे सिनेमानिर्मितीचं मोठं केंद्र होतं. खय्यामच्या नाटक कंपनीचा लाहोर येथे मुक्काम होता. तिथं गुलाम अहमद चिश्ती नावाचे संगीतकार राहतात, हे कळल्यावर खय्यामनं त्यांचा पत्ता शोधून काढला.

चिश्तीसाहेब रागीट स्वभावाचे होते; पण खय्याम या मुलाची संगीतावर मनापासून निष्ठा आहे, असं काही प्रसंगांमधून त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी आपला सहाय्यक म्हणून त्याला नेमलं. अशा प्रकारे वयाच्या सोळाव्या वर्षी म्हणजे १९४३ साली खय्यामची बिनपगारी संगीत सहाय्यक म्हणून कारकिर्द सुरू झाली.

त्या काळात आपल्या मोठ्या भावाला खूप मोठं कंत्राट मिळाल्याची बातमी खय्यामला समजली. भावाकडून थोडीफार आर्थिक मदत मिळेल या आशेनं खय्याम त्याच्याकडं गेला. खय्याम कोणताही कामधंदा न करता पूर्णवेळ संगीताच्या नादाला लागला आहे, हे कळताच भावानं त्याला चांगलंच खडसावलं, थोडी मारहाणदेखील केली. त्यामुळे रागाच्या भरात खय्याम तिथून निघाला आणि लष्करात दाखल झाला. त्यानं दोन वर्षे फौजी म्हणून नोकरी केली. नाशिकजवळ देवळाली कॅम्प, लाहोर, क्वेट्टा, पेशावर इत्यादी ठिकाणी त्यानं लष्करी छावणीत काम केलं. १९४५ साली अमेरिकेनं जपानवर बॉम्बहल्ला केला. संवेदनशील मनाच्या खय्यामला या गोष्टीचं खूप दुःख झालं; आणि त्याचा निषेध म्हणून त्यानं नोकरी सोडून दिली.

पुनश्च एकदा तो गुलाम चिश्तीसाहेबांचा सहाय्यक संगीतकार म्हणून काम करू लागला. सहाय्यक संगीतकार म्हणून त्यानं 'झुटी कस्मे' आणि 'यही है जिंदगी' या चित्रपटांना संगीत दिलं. तसेच हिंदी चित्रपटसृष्टीतील पहिली संगीतकार जोडी हुस्नलाल– भगतराम यांच्याशी त्याचे संबंध प्रस्थापित झाले.

१९४७ साली अभिनेत्री नर्गिसची आई जद्दनबाई हिनं निम र्माण केलेल्या 'रोमिओ–ज्युलिएट' या सिनेमात खय्याम आणि जोहराबाई अंबालेवाली यांनी एक युगुलगीत म्हटलं आणि ते खूप लोकप्रिय झालं म्हणून जद्दनबाईंनी खय्यामचं खूप कौतुक केलं. तरीही खय्याम यांनी आपल्या संपूर्ण चित्रपट कारकिर्दीत अभिनय करून गायन केलेलं ते एकमेव गाणं होतं.

पुढे रेहमान वर्मा यांच्या बरोबर खय्याम यांची जोडी जमली. हुस्नलाल– भगतराम यांच्यानंतर हिंदी चित्रपटसृष्टीतील ही दुसरी संगीतकार जोडी मानली जाते. या दोघांनी 'शर्माजी– वर्माजी' या नावानं १९४७ साली 'हीर रांझा' या चित्रपटाला संगीत दिलं. या जोडीनं संगीतकार म्हणून संगीत दिलेलं पहिलं गाणं अभिनेत्री उमादेवी अर्थात टुणटुण यांनी गायलं होतं.

या संगीतकार जोडीनं १९५० सालापर्यंत पाच चित्रपटांना संगीत दिलं. त्यामध्ये 'हीर रांझा' , 'परदा' , 'बिवी' इत्यादी चित्रपटांचा समावेश होता. त्यांनी संगीत दिलेल्या आणि मोहंमद रफी यांनी त्यांच्याकडे गायलेल्या 'बिवी' या चित्रपटातील पहिलं गाणं होतं...

**'अकेलेमें वो घबराते तो होंगे**
**मिटाके मुझको पछताते होंगे!'**

१९५३ साली दिग्दर्शक झिया सरहदी रणजित मुव्हीटोन या कंपनीसाठी 'फूटपाथ' हा चित्रपट दिग्दर्शित करत होते. त्यांनी संगीतकार म्हणून खय्याम यांना संधी द्यायचं ठरवलं. खय्याम यांचे जोडीदार रेहमान वर्मा लाहोरला गेले असल्यानं सरहदी यांनी खय्याम यांना रणजित मुव्हीटोनचे मालक आणि चित्रपटसृष्टीतील त्या काळातील खूप मोठं प्रस्थ सरदार चंदुलाल शाह यांच्या पुढं उभं केलं. चंदुलाल शाह यांनी त्यांना नाव विचारल्यावर खय्याम यांनी 'शर्माजी' हे उत्तर दिलं; परंतु त्यांनी खरं नाव काय आहे, असं विचारल्यावर 'मोहंमद जहूर खय्याम हाश्मी' हे आपलं संपूर्ण नाव खय्याम यांनी सांगितलं. सरदार चंदुलाल शाह यांना 'खय्याम' हे नाव खूप आवडलं; आणि आपल्या चित्रपटासाठी त्यांनी संगीतकार म्हणून हेच नाव वापरावं अशी आज्ञा केली. अशारीतीनं 'फूटपाथ' या चित्रपटापासून खय्याम यांची स्वतंत्र संगीतकार म्हणून कारकिर्द सुरू झाली. 'फूटपाथ'मधील मजरूह सुलतानपुरी लिखित आणि तलत मेहमूद यांनी गायलेलं...

**श्याम–ए–गम की कसम...**
**आज ग़मग़ी है हम!**

हे दिलीपकुमारवर चित्रित झालेलं गाणं खूप लोकप्रिय झालं. पुढे खय्याम यांना आशा भोसले यांनी गायलेलं पहिलं कॅब्रे साँग स्वरबद्ध करण्याची संधी मिळाली.

१९५३ साली पंजाबी–शीख गायिका जगजित कौर हिच्याशी खय्याम यांनी प्रेमविवाह केला.

तुम अपना रंजोगम मुझे दे दो! हे 'शगुन' चित्रपटातील खय्याम यांनी संगीतबद्ध केलेलं आणि जगजित कौर यांनी गायलेलं लोकप्रिय गीत खय्याम यांच्याशी विवाह करून वेगळ्या अर्थानं खरं ठरलं; कारण तो खय्याम यांचा अतिशय संघर्षाचा काळ होता. खिशात अजिबात पैसे नसायचे. जेवणाची भ्रांत होती. गायक मुकेश हा खय्यामचा जिवलग मित्र होता. खय्यामची परिस्थिती लक्षात येताच काही न बोलता त्यानं एक तांदळाचं


mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

पोतं खय्यामच्या घरी पाठवून दिलं.

हळूहळू दिवस बदलत गेले. खय्याम यांना संगीतकार म्हणून यश मिळू लागलं. नावलौकिक वाढला, तसा पैसाही मिळू लागला. असं असलं तरी खय्याम हे खूप तत्त्ववादी होते. त्यांनी कधीही आपल्या कामाच्या बाबतीत तडजोडी केल्या नाहीत. पैसा मिळतो म्हणून कामाचा दर्जा घसरू दिला नाही.

**'शोला और शबनम' या चित्रपटातील...**
**जाने क्या ढुंढती रहती है ये आँखे मुझको...**

या गीतासाठी त्यांनी मोहंमद रफी यांचे एकवीस वेळा टेक घेतले. अंगात ताप असूनही रफीसाहेबांनी ते दिले. एका गैरफिल्मी भजनांच्या अल्बमसाठी त्यांनी रफीसाहेबांना अठरा वेळा टेक द्यायला लावले आणि महान गायक मोहंमद रफी यांनी खय्याम यांचं पूर्ण समाधान होईपर्यंत विनातक्रार सहकार्य केलं. अर्थातच तो अल्बम खूप लोकप्रिय झाला.

१९७६ साली आलेल्या 'कभी कभी' या चित्रपटानं खय्याम यांना खऱ्या अर्थानं ग्लॅमर मिळवून दिलं. 'कभी कभी'चं संगीत सुपरडुपर हिट झालं. तरीही खय्याम हे चित्रपट स्वीकारण्याबाबत खूप चोखंदळ होते. कितीही मोठे अन् प्रसिद्ध निर्माता, दिग्दर्शक असले तरी खय्याम आपल्या अटी-शर्तीनुसार संगीत देत असत. यामुळे काही वेळा चांगल्या संधीदेखील त्यांच्या हातातून निसटून गेल्या.

साहिर लुधियानवी, जाँ निसार अख्तर, कैफी आझमी, शकिल बदायुनी, निदा फाजली, सुदर्शन फाकीर, शहरयार, गुलजार... अशा नामवंत गीतकार-शायर यांची गाणी ते प्राधान्यानं घेत असत. संतूर आणि बासरी ही त्यांची आवडती वाद्ये होती; तसेच 'पहाडी' हा त्यांचा अत्यंत आवडता राग होता.

शंभर वादकांचा ताफा घेऊन त्यांनी 'रझिया सुलतान' या चित्रपटाला संगीत दिलं होतं. 'उमराव जान' हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीतील माईलस्टोन मानला जातो. तसेच 'बाजार' चित्रपटासाठी बशर नवाझ, मखदूम, मीर तकी मीर, मिर्झा शौक या शायरांची शायरी त्यांनी स्वरबद्ध केली.

१९९६ साली आशा भोसले यांच्या समवेत 'आशा और खय्याम' या नावाचा गझल अल्बम त्यांनी तयार केला. त्यासाठी त्यांना दोन वर्षे लागली. निदा फाजली, हसन कमाल, नक्श लायलपुरी, अहमद बसी या चार शायरांची शायरी त्यांनी वापरली. पॉलिग्राम या कंपनीनं त्या अल्बमसाठी एखाद्या चित्रपटासारखा खर्च केला; आणि अल्बम रिलीज झाल्यानंतर केवळ दोन म हिन्यांत त्याच्या दोन लाख कॅसेट्स खपल्या.

खय्याम यांनी आपल्या चित्रपट संगीतात अनेक हिंदी, उर्दू गझलांचा वापर केला. मल्लिका-ए-गझल बेगम अख्तर यांच्याकडून त्यांनी काही अजरामर गझला गाऊन घेतल्या.

ऐ मुहब्बत तेरे अंजाम पे रोना आया... अशा अप्रतिम गझलांचा त्यात समावेश होता.

अजून एक विशेष बाब म्हणजे जगदीश खेबुडकर लिखित आणि सुरेश वाडकर यांनी गायलेल्या मराठी भक्तिगीतांना खय्याम यांनी स्वरबद्ध केलं होतं. संजयखान यांच्या 'दी ग्रेट मराठा' या आणि इतर काही मोजक्या मालिकांना त्यांनी संगीत दिलं होतं.

खरं म्हणजे खय्याम यांनी संगीतबद्ध केलेली अनेक गाणी लोकप्रिय झाली. नमुन्यादाखल काही गाण्यांचा उल्लेख करायचा झाला तर...

**शाम-ए-गम की कसम (फूटपाथ),**
**बहारों मेरा जीवन भी सँवारों (आखरी खत),**
**ये दिल-ए-नादान (रझिया सुलतान),**
**ठहरिये होश में आलू (मुहब्बत इस को कहते है),**
**कभी कभी मेरे दिल में (कभी कभी),**
**दिल चीज क्या है (उमराव जान),**
**करोगे याद तो हर बात याद आयेगी (बाजार),**
**सिमटी हुई ये घडियाँ (चम्बल की कसम),**
**मोहब्बत बडे काम की चीज है (त्रिशूल)**

अशा अवीट गोडीची गाणी अजूनही रसिकांच्या ओठांवर आहेत.

खय्याम यांच्या वाट्याला अनेक पुरस्कार आणि मानसन्मान आलेत. १९७७ साली 'कभी कभी' या चित्रपटाला फिल्मफेअर वॉर्ड, १९८२ साली 'उमराव जान' या चित्रपटाला फिल्मफेअर वॉर्ड, १९८२ साली 'उमराव जान' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट संगीतकाराचा राष्ट्रीय पुरस्कार, २०१० साली फिल्मफेअर लाइफ टाइम अचिव्हमेंट वॉर्ड, २०११ साली राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मभूषण पुरस्कार, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद (पिंपरी-चिंचवड शाखा) या संस्थेचा आशा भोसले पुरस्कार, २०१८ साली हृदयनाथ मंगेशकर पुरस्कार इत्यादी; परंतु या पुरस्कारांच्या पलीकडे किमान अर्धशतक रसिकांनी त्यांच्या संगीताला हृदयात जे स्थान दिलं तो पुरस्कार खय्याम यांच्यासाठी जास्त महत्त्वाचा होता.

खय्याम हे जरी जन्मानं मुस्लीम असले तरी त्यांच्या म ुंबईतील जुहू-पार्ले येथील दक्षिणा अपार्टमेंटमधील घरात गणपती, लक्ष्मी यांच्या मूर्ती होत्या. ते अत्यंत कट्टर शिवभक्त होते. रोज संध्याकाळी शंकराची पूजा केल्यानंतरच ते अन्नग्रहण करीत असत. खय्याम यांचा ज्योतिष, जन्मपत्रिका या गोष्टींवर विश्वास होता.

खय्याम यांना एकुलता एक मुलगा होता. त्याचं नाव प्रदीप होतं. २५ मार्च २०१२ रोजी हृदयविकाराच्या झटक्यानं प्रदीपचं निधन झालं; आणि मनानं कणखर असलेले खय्याम मनोमन खचले. त्यांनी आपल्या संपत्तीचा ट्रस्ट केला. २०१६ साली आपल्या वयाच्या नव्वदाव्या वाढदिवशी त्यांनी करो


mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!

### सह्याद्री वाहिनीवरील कलारंग कार्यक्रम...

# टीव्ही वरचा एक वेगळा अनुभव...

**मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर काम करण्याची संधी मिळाली. काही कलाकारांच्या मुलाखती घेता आल्या. ही संधी योगायोगानेच आली म्हणायला हरकत नाही.**







**श्रीकांत चौगुले**

पैठणीचा कार्यक्रम २००६ मध्ये सुरू केला .२००७ मध्ये नगरसेविका मंगला कदम यांनी एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दूरदर्शनवर तेव्हा स्मार्ट सुनबाई हा महिलांसाठीचा कार्यक्रम होता. त्याचे शूटिंग साई गार्डन मध्ये होते. यामध्ये काही मोजक्याच महिलांचा सहभाग असणार होता म्हणून उपस्थित सर्व महिलांच्या सहभागासाठी छोटासा कार्यक्रम करण्यासाठी, खेळ घेण्यासाठी ,मला निमंत्रित केले होते. यादरम्यान दूरदर्शनच्या टीममधील कॅमेरामन नरसिंग यांचा परिचय झाला .मी महिलांसाठी कार्यक्रम करत असल्याने आणि दूरदर्शनचा स्मार्ट सुनबाई हा कार्यक्रम महिलांसाठीच असल्याने त्यांनी माझ्यावर एक जबाबदारी सोपवली. दूरदर्शनच्या स्मार्ट सुनबाई या कार्यक्रमासाठी पिंपरी–चिंचवडमध्ये समन्वयक म्हणून काम करायचे. यामध्ये ज्यांच्याकडे कार्यक्रम असेल तिथे पूर्वतयारी करणे, मुंबईवरून आलेल्या टीमला ज्या घरात शूटिंग ठरले आहे. तिथे घेऊन जाणे .अशी कामे करावी लागत. या कार्यक्रमाच्या निर्मात्या रत्ना चटर्जी या होत्या. त्यांच्याकडे दूरदर्शनचे इतरही कार्यक्रम होते. त्यामध्ये माझी माय, चालता–बोलता ,तसेच कलारंग हे कार्यक्रम होते.

माझी माय हा कार्यक्रम आई आणि कर्तुत्वान मुलगा किंवा मुलगी यांचा अनुबंध उलगडणारा कार्यक्रम होता. या कार्यक्रमात आई विषयी मुले किंवा मुलांविषयी आई आठवणी सांगत असे .फक्त सुरुवातीला निवेदन वजा दोघांची माहिती व आईची महती वंदना गुप्ते देत असत. त्यासाठी काही कार्यक्रमांचे लेखनही केले. मी लेखन करतो. नावावर काही पुस्तके आहेत. म्हणून ही लेखनाची संधी चटर्जी मॅडमनी दिली होती. तसेच मी कार्यक्रमाचे निवेदन करतो. सूत्रसंचालन करतो .हे माहीत झाल्यावर व चांगला परिचय झाल्यावर ,कलारंग या कार्यक्रमाविषयी सांगितले. त्यासाठी मुंबईला येण्यास सांगितले .आवाज व कॅमेरा फेस चाचणी घेतली .त्यानंतर काही दिवसांनी प्रत्यक्ष कार्यक्रम करण्याची संधी दिली. या कार्यक्रमाचे नाव होते कलारंग .या कार्यक्रमात वेगवेगळ्या कला प्रकारातील कलाकारांच्या मुलाखती केल्या.यामध्ये तोंडात ब्रश घेऊन पेंटिंग करणाऱ्या मुख चित्रकार एच.आर. कोहली यांच्यापासून लोककलाकार दत्तोबा पाचंगे यांच्यापर्यंत अनेक कलाकारांचा समावेश आहे.कलाकारांची कलेची झलक आणि त्या अनुषंगाने काही प्रश्न व सुरुवातीचे निवेदन करण्याची जबाबदारी या कार्यक्रमात होती. ही छोटेखानी मुलाखत असे. साधारण २२ मिनिटांचा कार्यक्रम असे. त्यामध्ये कलेचे प्रात्यक्षिक कलेविषयीची माहिती व जडणघडण दर्शविणारा हा कार्यक्रम होता .या कार्यक्रमासाठी कधीकधी मुंबईला जावे लागे. तर बरेचसे कार्यक्रम पुण्यात होत. मुंबईहून टिम येत असे व पुण्यातच शूटिंग होत असे. चित्रकार , काष्ठशिल्पकार विविध पारंपरिक वाद्य वादक, शास्त्रीय नृत्यांगना, लोककलाकार अशा अनेकांचे कार्यक्रम झाले .यामध्ये मला संधी मिळाली .शिकता आले .एकंदरीत मुंबई दूरदर्शन च्या स्मार्ट सुनबाई, माझी माय कलारंग या तीनही कार्यक्रमात काहीना काही सहभाग होता .या कार्यक्रमामुळे दृक–श्राव्य माध्यमाचा अधिक परिचय झाला. अनेक नवीन गोष्टी कळाल्या. तसेच यापूर्वी बालचित्रवाणीसाठी अनेक कार्यक्रम केले होते. त्यामुळे कॅमेऱ्याचा, शूटिंगचा काही अंशी अनुभव होता. त्याचाही येथे थोडाफार फायदा झाला .काम करता आले.

साधारणपणे २००७ ते २०११ या कालावधीत सलगपणे नाही पण अधून–मधून कलारंग कार्यक्रम करता आला. टीव्हीवर जाण्याचे, दिसण्याचे अनेकांचे स्वप्न असते. माझे ते अनपेक्षितपणे पूर्ण झाले. नवीन काही करता आले .याचा विशेष आनंद वाटतो. ॐ



mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

रांगोळीच्या सप्तरंगात सुखाचे दीप उजळू दे...
लक्ष्मीच्या पावलांनी घर सुख समृध्दीने भरू दे...



# शुभदिपावली



# बबनराव भेगडे

**अध्यक्ष**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, मावळ विधानसभा मतदार संघ
**मा. अध्यक्ष व विद्यमान संचालक**
पुणे पिपल्स् को. ऑप. बँक लि. पुणे (मल्टीस्टेट बँक)
**संचालक**
पुणे जिल्हा सहकारी बोर्ड
**मा. अध्यक्ष**
पुणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. पुणे
**मा. सभापती**
कृषी उत्पन्न बाजार समिती - मावळ

**कार्यालय :** शुभम कॉम्प्लेक्स, तळेगांव-चाकण रोड, तळेगांव दाभाडे (स्टेशन), ता. मावळ, जि. पुणे.
**फोन :** ०२११४-२२२५३५
**निवास :** प्लॉट क्र. ३१, 'अंजनीसुत', हरणेश्वर सहकारी गृहरचना,
संस्था तळेगांव दाभाडे (स्टेशन), ता.मावळ, जि.पुणे.
**मोबाईल :** ९३७२०७९४०७ / ९९२२१६११२२ **ई-मेल :** babanbhegadencp@gmail.com



स्थापना १४ जून १९८४

|| विद्या विनयेन शोभते ||



# सरस्वती शिक्षण संस्था

(रजि. क्र. एफ. / २८९३ / पुणे )

१३८ तपोधाम कॉलनी, तळेगाव स्टेशन, ता. मावळ, जि. पुणे, ४१० ५०७

फोन - (०२११४)२२३२५०

भारतीय संस्कृतीच्या आधारावर मावळ तालुक्यातील मराठी माध्यमाची दर्जेदार शिक्षण देणारी...

उपक्रमशील शैक्षणिक संस्था...

इयत्ता १०वीच्या यशस्वी निकालाचीपरंपरा कायम...

याही वर्षी इयत्ता १० वीचा निकाल १००% मावळ तालुक्यात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक...

संस्कृतमध्येही १०० पैकी १०० गुण प्राप्त करणारी परंपरा कायम...

**श्री.सुरेश बळवंत झेंड**
अध्यक्ष

**श्री.दिलीप एकनाथ कुलकर्णी**
उपाध्यक्ष

**श्री.प्रमोद मधुकर देशक**
कार्यवाह

**सौ.सुचित्रा शेखर चौधरी**
खजिनदार

**श्री.सुनील एकनाथ आगळे**
सदस्य

**श्री.प्रमोद नीलकंठ चोळकर**
सदस्य

**श्रीमती अनुराधा दामोदर तापीकर**
सदस्य

**श्री.चंद्रशेखर सदानंद साठे**
सदस्य

**ॲड.राजश्री अभय ठकार**
सदस्य

**श्री.श्रीनिवास वामन कुलकर्णी**
सदस्य

**श्री.अनंत त्र्यंबक भोपळे**
अंमलबजावणी अधिकारी, शि. मंडळ

**डॉ.सौ.ज्योती प्रमोद चोळकर**
सदस्या, शि. मंडळ

**श्री.विश्वास मधुकर देशपांडे**
विशेष निमंत्रित सदस्य शि. मंडळ

**श्री.मंदार अरुण देशपांडे**
अंतर्गत लेखापरीक्षक

**सौ.रेखा परदेशी**
मुख्याध्यापिका माध्यमिक विभाग
तळेगाव दाभाडे

**सौ.विद्या अडसूळे**
मुख्याध्यापिका प्राथमिक विभाग
तळेगाव दाभाडे

**सौ.नीता दहितुले**
मुख्याध्यापिका प्राथमिक विभाग
इंदोरी

**सौ.सोनाली काशिद**
विभाग प्रमुख बालवाडी विभाग
तळेगाव दाभाडे

**सौ.अनुराधा बेळणेकर**
विभाग प्रमुख बालवाडी विभाग
इंदोरी



## दीपावली अभीष्टचिंतन!

शुभेच्छुक - सरस्वती शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारी मंडळ व सदस्य

नोंदणी क्रमांक : एफ – २३

# नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ

शुभदीपावली







## ∗ पदाधिकारी ∗



**मा.श्री.कृष्णराव भेगडे**
माजी आमदार
आधारस्तंभ

**श्री. संजय (बाळा) भेगडे**
मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
(अध्यक्ष)

**श्री. गणेश खांडगे**
(उपाध्यक्ष)

**श्री. संतोष खांडगे**
(सचिव)

**श्री. राजेश म्हस्के**
(खजिनदार)

**श्री. नंदकुमार शेलार**
(सहसचिव)

## ∗ संचालक मंडळ ∗

श्री. रामदास काकडे, श्री. चंद्रकांत शेटे, श्री. महेशभाई शहा, श्री. यादवेंद्र खळदे, श्री. दामोदर शिंदे, श्री. वसंतराव भेगडे, श्री. सोनबा गोपाळे, श्री. शंकरराव नारखेडे, श्री. विनायक अभ्यंकर

## ∗ सल्लागार समिती ∗

मा. श्री. कृष्णराव भेगडे, श्री. सुरेशभाई शहा, श्री. वसंतराव खांडगे, श्रीमती रूपलेखाताई ढोरे (माजी आमदार), श्री. गणपतराव काळोखे

## ∗ कार्यकारी संचालक ∗

डॉ. गिरीष देसाई

## ∗ संस्थेचे शैक्षणिक उपक्रम ∗

∗ नवीन समर्थ विद्यालय, तळेगाव दाभाडे
∗ पैसाफंड प्राथमिक शाळा, तळेगाव दाभाडे क्र. १ व २
∗ ॲड्. पु. वा. परांजपे विद्या मंदिर, तळेगाव दाभाडे
∗ प्रगती विद्या मंदिर, इंदोरी
∗ पवना विद्या मंदिर, पवनानगर
∗ पवना प्राथमिक शाळा, पवनानगर
∗ श्री एकविरा विद्या मंदिर, कार्ला
∗ श्री छत्रपती शिवाजी विद्या मंदिर, कान्हे
∗ मामासाहेब खांडगे सी.बी.एस.सी. इंग्लिश मीडियम स्कूल, तळेगाव दाभाडे
∗ ला. शांतामाणेक पवना आर्टस, कॉमर्स ज्यूनियर कॉलेज, पवनानगर
∗ पवना टेक्निकल सायन्स ज्यूनियर कॉलेज, पवनानगर
∗ ह.भ.प.आनंदराव काशिद ज्यूनियर कॉलेज, इंदोरी
∗ श्रीमती लाजवंती हंसराज गुप्ता ज्यूनियर कॉलेज, कार्ला
∗ श्री छत्रपती शिवाजी कॉमर्स ज्यूनियर कॉलेज, कान्हे
∗ नवीन समर्थ विद्यालय टेक्निकल सायन्स ज्यूनियर कॉलेज
∗ नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, तळेगाव दाभाडे
∗ नूतन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड रीसर्च (एनसीईआर) तळेगाव दाभाडे
∗ नूतन बॅचलर ऑफ व्होकेशनल कोर्सेस (बी. व्होक.) तळेगाव दाभाडे

## नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ, तळेगाव दाभाडे

क्रांतीरत्न विष्णू गणेश पिंगळे पथ, विष्णुपुरी, समर्थ संकुल, तळेगाव दाभाडे (स्टेशन), ता. मावळ,
जि. पुणे ४१०५०७; फोन नं. ०२११४ – २२८१७५





mpc news.in राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!

*Best Compliments from...*



विद्या वीर्यवती भूयात



Mr. Chandrakant Kakade
Founder President

Talegaon Vidya Pratishthan's

# KRISHNARAO BHEGADE ENGLISH MEDIUM SCHOOL

Manohar Nagar, Talegaon-Chakan Road, Talegaon Dabhade (Station), Tal. Maval, Dist. Pune - 410 507
Regd. No. MAH. 595/2006, F-21006/PUNE, S.G.R.N0.1909/S.R.N0.431/P.E.-3,20/10/2009
E-mail : kbems2006@yahoo.in / kbems377@gmail.com; Phone : 02114 - 287773 Mob.: 9860558525
U dise no. 27250917128



## Happy Diwali!

## Serene & Ideal Scenario for Achieving Your Dreams !

# Nursery to Std. 10th

## Salient Features

- Spacious infrastructure and playground.
- Huge auditorium with 500 seating capacity.
- Qualified and experienced teachers.
- Syllabus based on Maharashtra state board pattern.
- Inculcation of moral values.
- Well equipped Computer & Science Laboratory
- Teaching through play-way method.
- Innovative teaching learning process.
- Activities & Practical based learning.
- Extra curricular activities.
- Health checkup.
- Regular interaction with parents.
- Participation in various competitive exam & inter-school competitions.
- Indoor & outdoor sports on State level
- Education tour and field trips.
- Multimedia based interactive learning
- Pollution free atmosphere
- Limited strength of students in each class.
- CCTV camera surveillence.

## Board of Directors

Mr. Sandeep Kakade
President

Mr. Madhav Bhegade
Vice President

Mr. Prashant Shah
Secretary

Prof. Anil Tankar
Treasurer

Mrs. Rajashree Mhaske

Mrs. Gauri Kakade

Mr. Subhash Dabhade

Mrs. Meena Iyer
Head Mistress

All Committee Members, Teachers & Staff



तुमच्या दारी सजो,
स्वर्ग सुखांची आरास...
लक्ष्मी नांदो सदनी,
धनधान्याची ओसंडो आरास...
सर्व नागरिक बंधू भगिनींना
दीपावली अभिष्टचिंतन
उषा मुंढे
प्रदेश उपाध्यक्ष
भारतीय जनता पार्टी
अनुसूचित जमाती मोर्चा
सभापती
जैव विविधता व्यवस्थापन
समिती (पर्यावरण),
नगरसेविका
पिंपरी-चिंचवड
महापालिका

# SEARCH

**SOCIETY FOR ENHANCEMENT AND RESEARCH IN CLASSICAL HOMEOPATHY**

## Advanced Homeopathic Care to put
## 'A Smile of Relief' on a Cancer Patient's Face

•SMILE OF RELIEF FOR CANCER PATIENTS•

## HOMEOPATHIC CONSULTING & CANCER CARE CENTER

## Dr. Shailesh Deshpande
M.D.(Homeopathy), Consulting Homeopath

**Pune Clinic :** Office No.102, First Floor, Ramsukh House, Thube Park,
Near Sancheti Hospital, Near Lokmangal - Bank of Maharashtra,Shivajinagar,
Pune 411005, Maharashtra (India)
**Timing : Mon., Wed., Fri. 3.30 p.m. to 8.30 p.m.**

**Pimpri Clinic :** Off 11A, Mahalaxmi Heights, Behind Central Mall,
behind Keys hotel, Morewadi, Pimpri Colony, Pimpri-Chinchwad, Maharashtra 411018
**Timing : Tue., Thu., Sat. 3.30 p.m. to 8.30 p.m.**

**E-mail :- sdesh14@gmail.com** **Contact : 79720 03719 | 9823065957**

*Happy Diwali*


With Best Compliments From
Team SEARCH



www.aimcure.com



गंध गहिवरला उटण्याचा
आला दिवाळी सण आनंद लुटण्याचा...
शुभ दीपावली
तुषार कामठे
नगरसेवक : पिंपरी चिंचवड पालिका

संतोष दत्तात्रय खांडगे
चिटणीस
नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ
संस्थापक अध्यक्ष - रोटरी क्लब ऑफ तळेगाव एमआयडीसी
संस्थापक अध्यक्ष - श्री डोळसनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, तळेगाव दाभाडे
संस्थापक अध्यक्ष - समाजप्रेमी आप्पा प्रतिष्ठान, तळेगाव दाभाडे
मुख्य प्रवर्तक - मावळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, तळेगाव स्टेशन
सचिव - इंद्रायणी महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना, तळेगाव दाभाडे
सचिव - मावळ तालुका इंग्लिश मीडियम स्कूल असोसिएशन
सचिव - घासवाले धर्मशाळा, आळंदी
अध्यक्ष - पवना विद्या मंदिर व ज्युनियर कॉलेज, पवनानगर
उपाध्यक्ष - महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टिंग असोसिएशन
संचालक - पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन, पुणे
मा. सभापती - नगर परिषद शिक्षण मंडळ, तळेगाव दाभाडे
निवास - शांताई नगरी, नगर परिषदसमोर, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे
ऑफिस - 02114-231231 मो.नं. 9423578500 | 9890675030
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा


R FITNESS
Be an Inspiration...
STOP WISHING START DOING
PERSONAL TRAINING
FITNESS PROGRAMS
SPECIAL COURSES
YOGA AND PILATES
AND MANY MORE...
14000/-
6999/-
For only First 100 Members
+
Free Gym kit
50% OFF
* Smart Digital Equipment
* Crossfit
* Cardio
* Zumba
* Yoga
* Aerobics
* Certified Trainers
* Personal Trainning
* Diet Nutrition
* Sport Nutrition
62 62 72 72 15 / 91 56 84 00 81 , rfitnessgyminfo@gmail.com, R Fitness Vadgaon Maval R_Fitness_Maval
Address-Jija Arcade,Mhalaskar Wadi,MIDC Road,Near Vishal Lowns ,Vadgaon Maval


रांगोळीच्या सप्तरंगात
सुखाचे दीप उजळू दे,
लक्ष्मीच्या पावलांनी
घर सुख समृद्धीने भरु दे..!
शुभ दिपावली
श्री.दिनेश लालचंद यादव
सरचिटणीस भाजपा युवा मोर्चा, स्वि.नगरसेवक पिं.चिं.मनपा.



# नाही झाली पंढरीची वारी जरी, येईल धावूनी विठुराया माझ्या दारी

**'अधीर मना ओढ विठुरायाची'... एकवेळ नदीचं मूळ नी ऋषीचं कूळ ओळखता येईल; परंतु मनाचं, ना मूळ ना कूळ कुणाला ओळखता आलंय, अगदी स्वतःच्या मनाचं देखील नाही... पण याला अपवाद आहेत ते संत महात्म्याचें! निस्सीम भक्तीच्या पुण्याईने त्यांनी भगवंताचं देखील मन जिंकलं. भोळा भाव, सिद्धीस जावा, अशी म्हण आहे. याचाच अर्थ, भक्ती व्यक्त करण्यासाठी कशाचीही गरज भासत नाही. आपल्या घराच्या अंगणात आलेल्या जगाच्या माऊलीला, साक्षात विठ्ठलालाही ...थांब. म्हणणारा भक्त... आणि भक्तासाठी विटेवर उभा राहिला तो देव! ...ही आहे परंपरा वारकरी संप्रदायाची! 'नाही झाली पंढरीची वारी जरी, येईल धावूनी विठुराया माझ्या दारी' हा आहे श्रद्धा, भक्ती आणि कृपाशीर्वादाचा संगम. तो भीमेच्या तीरावरच होतो असे नाही, तर अंतःकरणाच्या ठाव ना लागणाऱ्या तळाला होतो. म्हणून म्हणावसं वाटतं 'रिंगण वैष्णवजनांचे ध्यानीमनी, उधळता अश्व सारे; ऐसी संकटे झेलली किती, कृपा असता विठुरायाची,भीती कशाची?'**

प्रभाकर तुमकर

एकूणच आपल्या देशातील परिस्थिती बघता, आपण कोरोनाच्या सावटातून बाहेर पडलो, असे म्हणायला हरकत नाही. अर्थात याचा अर्थ ती विषाणूची साथ संपली असा अजिबात होत नाही. वेगळ्या अर्थाने आता ती साथ आपल्याला कायम ठेवून जगावं लागणार आहे. आणि त्यासाठी बहुतांश देशवासीयांची मानसिकता तयार झालेली दिसते.

दोन महिने लॉकडाऊन किंवा घरकोंडीच्या जाचाने तावून सुलाखून निघालेल्या प्रत्येक भारतीयांनी आता कोरोनाशी जुळवून घ्यायचे ठरवलेले दिसते; अन्यथा इतक्या वेगाने जनजीवन सुरळीत होताना दिसले नसते. आधी सरकार कधी लॉकडाऊन उठवणार म्हणून विचारले जात होते; पण आता कुठलेच निर्बंध उठण्याची प्रतीक्षाही न करता लोक जनजीवनाला पूर्वपदावर आणण्याच्या कामाला लागलेले आहेत.

सरकारने लोकांच्या कलानेच निर्बंध उठवलेले दिसले आहेत. कारण दोन महिन्यापूर्वी किंवा मार्च महिन्याच्या उत्तरार्धात अकस्मात लॉकडाऊन लागू करण्यात आला किंवा त्याची कठोर अंमलबजावणी सुरु झाली, तेव्हा जनमानसात आढळणारा भयगंड आता जवळपास अदृश्य झालेला दिसतो आहे. 'सदा मरे, त्याला कोण रडे,' अशी आपल्या मराठी माणसाची उक्ती आहे. तशीच काहीशी अवस्था कोरोनाबाबत झालेली आहे.

धोका निश्चितपणे आहे; पण भीतीने मरण्यापेक्षा धोक्याला सामोरे जाऊन भिडावे आणि त्याच्याशी दोन हात करुन मरावे किंवा जगावे असे एकूण वातावरण निर्माण झालेले आहे. अन्यथा सतत मृतांची वा बाधितांची संख्या वाढत असताना जनजीवन रुळावर येताना दिसलेच नसते. त्यातच 'निसर्ग' नावाचे चक्रीवादळ चाल करून आल्यावरही इतक्या सहजपणे सरकारने निर्णय घेतले नसते. पंचनामे किंवा नुकसानीची भरपाई अशा विषयाचा कारभार नित्यासारखाच चालला आहे आणि त्याविषयीच्या तक्रारीही नेहमी सारख्याच आहे.

सोशल डिस्टन्सिंग वा क्वारांटाइन असले शब्द आता विस्मृतीत जाऊ लागले असून सगळीकडे कोरोना आकड्यापुरता ऐकू येतो आहे. त्याचा साधा सरळ अर्थ कोरोना आपला 'सांगाती' म्हणून त्याच्या सोबत जगण्याची मनोभूमिका आता आलेली आहे.

काही दिवस शाळा, कारखाने सुरु होणार नाहीत वा गर्दीच्या जागी लोक आपणच जमणार नाहीत, पण जिथे अत्यावश्यक आहे, तिथे कोरोनाला झुगारुन लोक वागणार आहेत. कारण वाघ म्हटलं तरी खाणार आणि वाघोबा म्हटले तरी खाणार. त्यामुळे थेट वाघ्याच म्हणायची हिंमत नागरिक करीत आहेत. त्याचाच हा परिपाक आहे. हातपाय हलवायचे नसतील, तर रोगापेक्षा निष्क्रियतेनेच मरण्याचे भय मोठे असते. तिथून मग भयगंडाला लगाम लागत असतो.

बहुतांश लोकसंख्येची स्थिती तशी झाली आहे. नेमक्या शब्दांत सांगायचे तर रोगापेक्षाही त्याच्याविषयीचा समज-गैरसमज अधिक भयकारी असतो. त्याच्यावर मात करता आली तर रोगाला मुठीत



mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

आणता येत असते. तसेच काहीसे झालेले आहे. सर्व जनजीवन पूर्वपदावर येण्याची किमया तीच आहे.

हे जग कुणासाठी क्षणभरही थांबणार नाही. असं आपल्याकडे गमतीने म्हटलं जातं. पण हे गमतीचं म्हणणं खरं ठरलं. एवढं मोठं जग डोळ्यानेही न दिसणा–या अगदी लहान विषाणूने थांबवून ठेवलं. हे थांबणं क्षण–दोन क्षण, तास–दोन तास अथवा एखाद्या दिवसाचं किंवा आठवड्याचं नव्हतं. तर हे थांबणं तब्बल दोन महिन्यांचं होतं. दोन महिने कुणाला कुठेही जाता–येता येत नव्हतं. कारखान्यांची घरघर, कला–क्रीडा क्षेत्राची कलकल, वित्त, सहकार क्षेत्रातील मोठमोठ्या घडामोडी सगळं काही ठप्प झालं. कोरोना साथीच्या महामारीत शाळांची आणि मंदिरांची दारेही बंद करावी लागली. त्यामुळे भक्तीसाठी आसुसलेला भक्त निराश झाला.

**हेचि व्हावी माझी आस श्र जन्मोजन्मी तुझा दास**
**श्रश्र पंढरीचा वारकरी श्र वारी चुको नेदी हरी श्रश्र**
**संतसंग सर्वकाळ श्र अखंड प्रेमाचा सुकाळ**
**'श्रश्र चंद्रभागे स्नान श्र तुका मागे हेचि दान श्रश्र**

कोरोना नसता तर या वारीच्या काळात संत तुकाराम म हाराज व संत ज्ञानेश्वर महाराज हे दोन्ही पालखी सोहळे देहू आणि आळंदीहून पंढरपूरच्या दिशेने नाम भजनाच्या जय घोषात चालू लागले असते. पण यंदाची पायी वारी नाही, असा शासनाने निर्णय दिलेला आहे. या संताच्या पादुका थेट गरुडावर बैसोनि पंढरीला गेल्या. परंतु आपल्या परंपरेसाठी आग्रही असणा–या वारक–यांनी हे अगदी सहज कसं स्वीकारलं, असा प्रश्न अनेकांच्या समोर आल्याशिवाय राहत नाही.

पंढरीचा वारकरी, वारी चुको नेदी हरी! म्हणणारे वारकरी यंदा घरुनच पालखी सोहळा साजरा करीत आहेत. कोरोना हा साथीचा आजार आहे. या साथीचे संक्रमण रोखायचे असेल तर प्रत्येकाने एकमेकांपासून अंतर राखून राहणे हाच सध्या उपाय आहे. माउली म्हणून एकमेकांची सेवा, शुश्रुषा करणा–या वारक–यांनी सुद्धा यावर्षी अंतर राखण्याचा निर्णय घेतला. पालखी सोहळा रद्द झाला असला तरी मनातील भाव मात्र तोच आहे. पुढच्या वर्षी एकमेकांना आनंदाने, निरोगीपणे भेटायचे असेल तर यावर्षी अंतर राखणे गरजेचे आहे. एकमेकांच्या मृत्यूचे कारण आपण कसे बनणार, असाच काहीसा विचार यावर्षी सर्व वारक–यांनी केला आहे. माऊलीपणाची ही भावना वारकरी विचारांचा प्रमुख गाभा असून ती भावनाच ख–या अर्थाने जगणं सोपं करते. देवाला भेटायला कुणी मध्यस्थ लागत नाही. योग, याग, विधी हीच वायाची उपाधी बनून जाते. देवाशी आणि जगाशी प्रेमाचं नातं जुळलं की अहंकाराचा वारा लागून स्वतः बद्दल झालेल्या कल्पनेच्या बाधेवर तोडगा निघतो. द्वेष, इर्षा, वखवख संपून टाकते. अतिआत्मविश्वास, अतिमहत्त्वाकांक्षा, उद्याची काळजी यातून बाहेर पडण्याचा सोपा मार्ग दाखवते.

माऊली म्हणतात... 'जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत', आपल्या समोरील प्रत्येकजण हा देवच आहे, असं मानायचं. मग सगळे अमंगळ भेदाभेद आपोआप संपून जातात. मग कुणी मोठा उरत नाही आणि लहान ठरत नाही. जात, धर्म,भाषा, प्रदेश, लिंग, वर्ण, वर्ग यातून येणारे सगळे भेद संपून जातात. ... इथेच खरी समता येते. आध्यात्मिक लोकशाही येते. बंधुतेच्या पुढची माऊलीपणाची भावना दृढ होते. माऊली म्हणजे आईचं प्रेम देणारे संत... संत तर वारक–यांसाठी देवापेक्षाही मोठे. त्यामुळे वारीला जाऊन आपल्यामुळे दुस–याला कोरोना होऊ न देण्याचं खरं शहाणपण व मोठेपणा असणारच.

माऊलीपणाची ही माया एकदा कमावली की जादू आल्याची भावना होऊ लागते. संत नामदेव महाराज दगडाला थंडी वाजेल म्हणून त्यांच्यावर पांघरुण घालतात. माऊलींनी सांगताच रेडाही वेद बोलू लागतो. तर संत एकनाथ महाराजांनी हजारो मैलावरून काशीहून आणलेलं गंगेचे पाणी तहानलेल्या गाढवाला पाजतात.

.... वृक्षवल्ली ही संत तुकाराम महाराजांची सोयरे – धायरे होतात. खेळणारी पाखरं आपण आल्यामुळे उडाल्याचं तुकोबांना वाईट वाटतं. संताना जे साधलं, जे प्राप्त झालं ते आपल्यापैकी प्रत्येकाला जमू शकते, याचा दृढ विश्वास वारकरी परंपरेला आहे. अर्थातच हे प्रत्येकात देव बघणं सोपं नसतं... त्यासाठी कठोर साधना व भरपूर सराव करावा लागतो... त्या सरावासाठी नेमून दिलेला वेळ म्हणजेच वारी!

.... त्यातला पायी पालखी सोहळा म्हणजे संसारातून सुट्टी घेऊन स्वतःला दिलेला फार मौल्यवान वेळ... सगळे कलह–तंटे, राग, द्वेष घरी ठेवून अठरा ते वीस दिवस वारीत सोबत चालणा–या प्रत्येकात देव शोधायचा आणि नामस्मरणातून व भजनातून मनावरची विचारांची मांड पक्की करायची. चित्तातली घाण धुवून टाकायची. कुठे आपला नेम चुकला, तर संतांची पालखी आपल्या सोबतच असतेच. साक्षात संतच आपल्या सोबत चालत आहेत. हा प्रमुख आधार पुरेसा असतो.

वारीच्या वीस दिवसाच्या काळात परंपरेप्रमाणे दिवसभरात काय करायचं हे दिंड्यांचं वेळापत्रक आपापलं ठरलेलं असतं ... मंगलचरणातील अभंग, काकड आरतीचे अभंग, भूपाळ्याचे अभंग, वासुदेवाचे अभंग, जोगी, आंधळे, पांगूळ, गौळणी, ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ हे कधी कोणते अभंग कसे गायचे ठरलेलं असतं त्यातूनच संतांच्या शिकवणुकीवर विचार करायला लावणं आहे. संत विचारांत एकदा डुंबलं की, त्यातून होणारा देवाचा आणि पर्यायाने स्वतःचा शोध–बोध हा आनंद सोहळा बनतो. प्रेमसोहळा बनतो. त्याचं नाचणं, गाणं आपोआप येतं. खेळ येतात. रिंगण येतं, रिंगण वैष्णवजनांचे ध्यानीमनी, उधळता अश्व सारे; ऐसी संकटे झेलली किती, कृपा विठुरायाची असता आम्हा कशाची


mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

भीती! त्यामुळे आनंदाचे डोही, आनंद तरंग.... अशी स्थिती प्रत्येक वारक–याची होत असते. वारी हा स्वावलंबी जीवनातील फार मोठा स्वानुभव आहे. वारीत घरातील सुख सोयी नसल्यातरी त्याचं कुठलंच रडगाणं नसतं, ते पांडुरंगाच्या रंगात रंगून जाऊन त्या सुख सोयी विसरल्या जातात.... जीवनात कुठल्याही अडचणीच्या परिस्थितीत कसं जगावं, कसं वागावं ही वारी शिकवते.

अशा परिस्थितीत लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होतात, तेव्हा ते विठ्ठलाच्या दर्शनाचा हव्यास नसतोच, ते दर्शनाला जात नाहीत. कळसाचं नावापुरतं दर्शन घेतलं की, त्यातच खरी धन्यता मानतात. कारण त्यांना विठ्ठल आधीच भेटलेला असतो. ध्येयासाठी चालणंच ध्येय बनलेलं असतं. प्रवासच पोहोचण्याचं ठिकाण बनलेला असतो. कारण या सर्व पायी प्रवासात इतके दिवस पांडुरंग सोबतच चालत असतो. नाचत असतो, हातात हात घालून फुगडी घालतो, तोच मृदुंग वाजवत असतो, आणि टाळही वाजवत असतो, कीर्तन तोच करतो, सगळीकडे तोच असतो. मग त्याच्या दर्शनाचं काय कौतुक राहणार? घेतलं काय अन घेतलं तरी चालतं... इतर जत्रा– यात्रांत भक्त देवासाठी आतुर व आसुसलेला असतो, पण आमच्या वारीत देवच भक्तासाठी उतावळा होतो. त्यामुळे हा विटेवरचा जगावेगळा देव कुणाच्या नवसालाही पावत नाही आणि वारी केली नाही म्हणून कोपतही नाही. हो... मात्र भक्तासाठी हात कमरेवर ठेवून अठ्ठावीस युगे तिष्ठत उभा आहे. कोणत्याही वारक–याला विचारलं तर तो सांगेल, पंढरपुरात विठ्ठल दर्शनापेक्षाही नगर प्रदक्षिणेचं महत्त्व जास्त आहे. प्रदक्षिणा करताना अनेक दिंड्यांत पत्रिकेचे अभंग म्हणायचे असतात. त्याशिवाय प्रदक्षिणा पूर्ण होत नाही असा प्रघात आहे. त्याबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. एकदा काय झालं, तुकोबारायांना ताप आला. त्यांना वारीला येताच आलं नाही. मग त्यांनी विठुरायाला पत्र लिहिलं. ते पत्र म्हणजे हे पत्रिकेचे अभंग होय. त्यामुळे तब्येत बरी नसल्यामुळे तुकोबारायांची वारी चुकल्याचं वारक–यांना माहित आहेच. ... आता कोरोनामुळे अख्ख्या जगाचीच तब्येत बिघडलीय... त्यामुळे पंढरीला पायी जाता येणार नाही. हे शहाणपण वारकऱ्यांमध्ये अंगभूतच आहे. नाचू कीर्तनाचे रंगी श्र ज्ञानदीप लावूं जगी श्रश्र हा संकल्प करणारे संत नामदेव महाराज तर भारतभर फिरत होते, त्यांनी खूप वेळा भारत पिंजून काढला, असे अभ्यासक सांगतात, श्री क्षेत्र पंढरपूरला त्यांचा जन्म झाला. त्यांनी वीस– बावीस वर्ष पंजाबमध्ये तळ ठोकून वारकरी संप्रदायातील विचार तिथे रुजवले. त्यामुळे त्यांची वारी चुकली असणारच. पण त्यांचं जगणंच वारी झाली होती. म्हणून एखादी वारी चुकली तर काय बिघडतं? आपलं जगणंही त्यांच्यासारखंच वारी बनायला हवं, ही भावना प्रत्येक वारक–याची असते. कांदा मुळा भाजी श्र अवघी विठाबाई माझी श्रश्र अशी श्रद्धा असलेले संत सावता माळी, परंपरा सांगते, कधीच वारीला आले नाहीत. ' स्वकर्मात व्हावे रत, मोक्ष मिळे हातोहात ' इतकी साधी शिकवण त्यांनी दिली. त्यामुळे ते इतरांसाठी नास्तिक ठरले. पण देव त्यांना कळला होता. म्हणून श्री विठ्ठल पंढरपूर सोडून त्यांना भेटायला आला. आजही सावता महाराजांच्या अरण या गावाहून पालखी पंढरपूरला जात नाही. तर वारी झाल्यावर पंढरपूरहून विठ्ठलाची पालखी अरणला जाते. तोच वारसा वारीच्या काळात पंढरपुरात येऊनही कधी विठ्ठलाचं दर्शन न घेणा–या संत गाडगेबाबांनी चालवला. म्हणून संत एकनाथ महाराज सांगतात... 'नाथाच्या घरची उलटी खूण, पाण्याला मोठी लागली तहान तसं नवल इथे होतं... वळचणीचं पाणी उलटं घराच्या आढ्यावर येतं....

काही दिवसापूर्वी माजी मुख्यमंत्री व राजकीय नेत्यांनी परंपरेचा कैवार घेत पायी पालखी सोहळा व्हायलाच हवा, अशी भूमिका घेतली होती. तेव्हा त्यांची बाजू घेणा–या आणि विरोध करणा–या दोघांनाही वारक–यांना शहाणपणा शिकवण्याची खुमखुमी आली होती. पण वारक–यांच्या शहाणीवेची परंपरा त्या राजकारणाला पुरुन उरली. यंदाची वारी पायी नाही, हे वारक–यांनी अगदी सहज स्वीकारलं.

वारकरी हा खुला संप्रदाय आहे. इथे कुणीही येऊ शकतो. इथे कुणीही एक गुरू नाही. एक नेताही नाही.त्यामुळे यात अद्भुत असा लवचिकपणा आहे. संतविचारामुळे यात बदल पचविण्याची मोठी ताकद आहे. किंबहूना वारीने आजवर यापेक्षाही मोठमोठे बदल स्वीकारलेत.....

पंढरीची वारी ही अत्यंत जुनी परंपरा आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे वडील, श्री एकनाथ महाराजांचे पणजोबा, श्री भानुदास महाराज व जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांचे पूर्वज श्री विश्वंभरबुवा हे पंढरीच्या वारीला जात असत. आपल्या जीवलग पांडुरंगास भेटण्यासाठी आषाढ शुद्ध एकादशीला लाखो वारकरी आपापल्या गावातून आमंत्रणाची अपेक्षा न करता दिंड्या व पालख्या घेऊन पंढरीला येतात. श्री माऊलींचा अतिभव्य पालखी सोहळा दिसतो तो सन १८३० मध्ये १८० ते १९० वर्षांपूर्वी हैबतबाबा आरफळकर (पवार) यांनी सुरु केला. सातारा जिल्ह्यातील आरफळ हे त्यांचे मूळ गाव आहे. तुकोबांच्या आणि माऊलींच्या पादुका गळयात घालून देहूहून पंढरपूरला पायी जाण्याची परंपरा तुकोबारायांचे सुपुत्र नारायणबाबा यांनी सुरू केली. हे झाले सतराव्या शतकात. त्यात पालख्या, घोडे अठराव्या– एकोणीसाव्या शतकात आल्या. पण वारी तर त्याआधीही शेकडो वर्षे सुरू आहे. त्यामुळे फक्त पालखी सोहळा म्हणजे वारी नाही, फक्त पायी चालणं म्हणजे वारी नाही १८८९ च्या प्लेगमध्ये आणि १९१८ च्या एन्फ्लुएंझाच्या साथीत कोरोना काळासारखीच पालखी पायी चालली नव्हती, असं सांगतात वारक–यांना माहित आहे, वारी या सगळयांच्या खूप पुढची गोष्ट आहे. तो प्रत्येकाने आपल्या जगण्यावर करायचा प्रयोग आहे. आणि आपल्या स्वतःचा शोध आहे. ती वारी... हेचि व्हावी माझी आस, जन्मोजन्मी तुझा दास, पंढरीचा वारकरी, वारी चुको नेदी हरी, ... हे त्याला कळलेले असतं

.... कोरोनाने सगळ्यांना खूप काही शिकवलंय, आता तो खरी वारीही शिकवतोय,.... वारीतली माऊलीपणाची साधना आपल्या घरीच बसून करायचं आव्हान वारकऱ्यांनी स्वीकारलं आहे. अर्थात ठायीच बैसोनि करा एक चित्त! अनंत आवडी आळवावाश्रश्र ❦



mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!



**आज पौर्णिमा! ...पार्वतीचा उपास होता पौर्णिमेला आकाशात पूर्ण चंद्र पाहायला मिळतो . त्यांचं शुभ्र, शीतल, शांत रुप आल्हाददायी आणि लोभस वाटतं, मनाला अतिशय समाधान देणारे असते. असेच सुख संसारात नांदावं म्हणून पौर्णिमेचा उपवास व पूजाअर्चा करण्याचा रिवाज पार्वतीच्या घरात होता.**

# सत्य–आभास

**महेश बाळकृष्ण भालेराव**

सकाळची घरातली सारी कामे आटोपून ती घराच्या समोरच्याच विहिरीवर पाणी भरण्यासाठी नेहमीप्रमाणे हजर झाली. आज विहिरीवर अजून कोणी आलेले दिसत नव्हते. विहिरीवर रोज भेटणारी सविता, राधा मावशी, गोदाक्का, यमु कोणीही अजून आले नसावे. घागर कळशी तिने बाजूला ठेवली , सवयीप्रमाणे दोन्ही पाय विहिरीच्या काठावर घट्ट रुतवत, पाणी भरायची बादली तिने विहिरीत सोडली. तसा सरसर करीत पोहरा तिच्या दोन्ही हातातून खाली जाऊन बादलीसह पाण्यावर धडकला. यावर्षी भरपूर पाऊस झाल्यामुळे विहीर अजूनही चांगलीच भरलेली होती ..सात –आठ हात भर पोहरा पाणी शेंदायला पुरेसा होता. तिचा सडपातळ शेलाटी बांधा नमस्कार करायला वाकावे तसा वेलांटीसारखा गोलाकार होऊन विहिरींसमोर झुकला होता, मागच्या बाजूने पाठमोरी तिची छबी मोठी विलक्षण दिसत होती. वर डोक्याचा मोठा काळा ठिपका, त्यातून अलगद बाहेर पडलेली लांब सडक काळीशार वेणी , त्यावर माळलेला शेवंतीचा पांढरा –पिवळसर गजरा, ..तिने सर सर वर हात ओढत पोहरा वर घेतला आणि पाण्याची बदली घागरीत ओतली ..एवढ्यात तिची रोजचीच मैत्रीण सविता भांडी घेऊन विहिरीवर पोहचली. काय ग पार्वती आज लवकर आली वाटतं? तिने आल्याआल्याच प्रश्न केला ...अग !आज पौर्णिमा नाही का! ..मला तशी घाईच असते .सकाळची रोजचीच कामं , मुलांचं सारं आणि देवपूजा ...वेळ अजिबातच पुरत नाही .मलाच वेळेशी सारं जुळवून घ्यावं लागत! ती हसतच म्हणाली . बोलता बोलताच तिने बादली अन पोहरा विहिरीत सोडला , एव्हाना सविताही पाणी शेंदायला सज्ज होऊन समोरच्या बाजूला, विहिरीत पोहरा सोडून , काठावर उभी होती . पार्वतीने बदली भरली समजून खाली नजर करून पोहरा खेचायला सुरुवात केली , एक हिसका उजव्या हाताला देत हातभर दोर तिने वर ओढला असेन आणि अचानक तिला गाईचं प्रतिबिंब पाण्यात दिसू लागलं ...सविता ज्या ठिकाणी उभी होती त्या ठिकाणावर जणू गाय उभी राहून पाण्यात पाहतेय असं तिला वाटलं ...तिने लगेच सविताकडे पाहिलं ...पण ती तर सविताच होती .तिने परत पाण्याकडे पाहिलं ...तिला परत गायचं दिसत होती ..पार्वती घाबरलीच ...हे काय ? असं काय होतंय ?.तिच्या अंगाला दरदरून घाम फुटला ...तेवढ्यात समोरच्या सविताचा लक्ष गेलं ...काय ग काय झालं ? एकदम अशी का थांबली ? एवढी अस्वस्थ का वाटतेय ?बरं नाही वाटतं हे का ?

पार्वतीला घडलेला प्रकार सविताला सांगायचंच नव्हता ..ती आपल्याला वेड्यात काढून हसत बसेल याची तिला खात्री होती , ती पटकन विहिरीखाली उतरुन पायरीवर बसली ...काही नाही ग! झोप पुरी झाली नसेन कदाचित ...शिवाय आज सकाळपासून जरा जास्तच



mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही. कुठेही!

श्रम झाले म्हणून असेल कदाचित, अन उपाशी आहे ना ! .जरा चक्कर आल्यासारखं वाटतंय ...तिने खोटंच सांगितलं. काय ग पार्वती! अग बसायला का आली इथे ? राधा मावशींनी येतायेताच प्रश्न फ`कला . राधा मावशी , गावच्या जमीनदार कुळातली बाई! .एक भारीच व्यक्तिमत्व !. भरजरी नऊवारी रेशमी साडी , भला मोठा अंबाडा , कपाळावर भलं मोठं कुंकू आणि वर पातळ अशी मळवटाची रेघ. त्यामुळं त्या खूप भारदस्त दिसत. त्यांना महाराजांचं फार वेड होतं. गावात महाराज आले म्हणजे त्यांच्याकडेच आले हे ठरलेले असे. कुणी महाराज आले असं कळलं की त्या त्यांना त्यांच्या घरी बोलावून घेत, त्यांना कपडालत्ता, पै –पैसे ,अन्नदान वगैरे करुन आपण देवभक्त असल्याचा फार मोठा बडेजाव निर्माण करत. शिवाय फार बोलक्या असल्यामुळे, बरंच साऱ्या बारीक सारीक तपशीलांसहित चौकशी करण्याचा त्यांचा हातखंडा होता. तसे सारे त्यांना जरा वचकूनच असतं. त्या फक्त त्यांनी भरलेलंच पाणीच त्यांच्या कामासाठी वापरत असत. त्यांना नोकरांनी भरलेलं पाणी चालत नसे म्हणून त्या एखाद– दोन भांडी पाणी स्वतः भरुन नेत. पुन्हा पार्वतीने सविताला जे सांगितलं तेच त्यांना सांगितलं. अग मग आराम कर घरी जाऊन, पाणी काय, होतं राहील ...बरं वाटलं , वेळ मिळाला कि भर मग ..जा बघू विहिरीवर चढताच राधा मावशींनी सल्ला दिला. हो मावशी एवढी घागर भरते अन जाते .असं म्हणून पार्वती परत विहिरीवर पाणी शेंदायला सिद्ध झाली . खाली वाकून पाहताना आता तिची चांगलीच घालमेल होत होती. हातातला पोहरा बदलीसह खाली जाऊन धडकला ...बादली भरल्याची चाहूल तिला लागली म्हणून मोठ्या धीरानं तिने बादली खेचत खाली पाहिलं तिच्या काळजात धँ ीस्स्स झालं. खाली पाण्यात आता गाईच्या शेजारी मोठ्ठं गिधाड बसलंय असं दिसत होतं.बरोब्बर तिथेच, जिथे सविताच्या बाजूला राधा मावशी तिच्या पाण्याची बादली विहिरीतून वर खेचत होती...बा ी प रे ी ती जोरात किंचाळली , तिच्या हातातला पोहरा बादली सकट एका क्षणात विहिरीत पडला , तिने विहिरीच्या बाजूला पटकन उडी मारली , सविता !, मावशी! भूत ीभूत ी...विहिरीत भी भ ीभूत आहे अशी ओरडायला लागली . आग काय झालं? असे ओरडत दोघीपण पार्वतीजवळ आल्या . अग असं काय बोलते वेड्यासारखं ? आम्ही तर तुझ्या सोबतच आहोत ना ? कसलं भूत ? कुठे आहे ? आम्हाला का नाही दिसलं? दोघीही आलटून पालटून विचारीत होत्या . पार्वती प्रचंड घाबरलेली होती , तिचे अंग भयाने थरथर कापत होते , नजर अतिशय कावरी बावरी झाली होती .काय सांगावं तिला सुचेना . मला काहीच सुचत नाहीये , काही समजत नाहीये , मला जरा घरी सोडते का सविता ? तिने विनवणी केली , तशी सविता तिला घरी घेऊन गेली .हे काय आता नवीनच! पार्वती मावशी अश्यर्यचकित होऊन त्या दोघींच्या पाठमोऱ्या आकृत्यांकडे पाहताच राहिल्या. घरात गेल्याबरोबर सविताने तिला ग्लासभर पाणी प्यायला दिलं, बरं वाटतं का ग आता ?..थोडा चहा करू का सविताने विचारलं . नाही ग ! काहीच नको, तू फक्त बैस थोडावेळ! तिचा हात धरत पार्वती बोलली . बरं ठीक आहे पण तू झोप बरं जराशी! , तिला नीट पलंगावर झोपवतच सविता बोलली .पडल्या पडल्या पार्वती ने सविताला विचारलं , तुला काही विचित्र नाही वाटलं का ग आज विहिरीवर ? विहिरीत काही दिसलं तुला ?....आपण पाणी भरताना एखादी गाय आली होती का ग विहिरीवर ? .कॅ ी य ?, अग तू हे काय बोलतेस अग तुला काही भास झालं का विहिरीवर ?, उलट सवितानेच तिला प्रतिप्रश्न केला .. अग असं काही नाही घडलं तिथे ...आपण रोजच पाणी भरतो ना ? तीच विहीर , तेच पाणी , त्याच आपण , तीच बादली , तीच भांडी ...मग आज तुला असं का वाटलं ?. मावशी येईपर्यत तर आपण दोघीच होतो ना तिथे? . आणि कोणती गाय ? ती कोठून अन कश्याला येईल विहिरीवर ? मला तर बाई काहीच समजत नाही तू काय विचारतीय ते , सविताने तिची बाजू सांगून टाकली .भास झाला असेन का ग मला ? पण कसं शक्य आहे .दोन दोन वेळा तेच ते कसं दिसेल ? आणि आजच का भास होईल ? पार्वती गोंधळून विचारीत होती . काय पाहिलं तू नेमकं ? तेही विहिरीच्या आंत , पाण्यात ? जरा मला सविस्तर सांग बरं . सविताने पुन्हा प्रश्न केला . नाहीं ीनाहींी हे तर काहीतरी विचित्रच वाटतेय मला . भास असे असतात ? पार्वती अजूनही तिच्या सवतःशीच बडबडत होती .हे बघ जास्त विचार करू नको , नंतर बोलू आपण याच्यावर , तू थोडा आराम कर , थोड्यावेळानी मुलं येतील शाळेतून आणि मलाही घरी जायला हवं .सविताने धीर देत तिला चूप केलं .

तो दिवस तसाच विचार करण्यास निघून गेला, संध्याकाळी नवरा घरी आल्यानंतर पार्वतीने घडलेली सर्व घटना त्याला सांगितली. परंतु जे काय ऐकलं ते सर्व खरं वाटण्यासारखं नव्हतं. त्यालाही ते पार्वतीच्या मनाचे खेळ किंवा क्षणिक झालेला भास असेच वाटले. फार काही जास्त विचार करत जाऊ नकोस ,असं होतं कधी कधी, पण भूत प्रेत वगैरे असं काहीही नसतं,बरं का ! तेव्हा विषय सोडून दे, मनातून काढून टाक असे त्याने पार्वतीला समजावून सांगितलं. सगळेजण असेच म्हणत असल्याकारणाने पार्वतीला ही आपल्या मनाची समजूत घालावी लागली व मनाला पटत नसतानाही ती घडलेला प्रकार विसरण्याचा प्रयत्न करू लागली. दुसरा दिवस उजाडला. ठरल्याप्रमाणे घरातील सगळी कामे तिने नेहमीप्रमाणे आटोपली . परंतु आज पाण्यासाठी विहिरीवर जाण्याची तिची हिंमतच होत नव्हती. अर्थात पर्याय नव्हता, घरात सगळ्याच कामासाठी पाण्याची आवश्यकता असल्याकारणाने तिला विहिरीवर जाणं भाग पडलं .तशी ती चांगली खंबीर, निडर, काटक, कष्ट करणारी स्त्री होती. काल नक्कीच आपल्याला काही भास झाला असावा असं तिलाही वाटू लागलं. मोठ्या धीराने ती उशिरा का होईना पण विहिरीवर पोहोचली .आज तिच्या अगोदरच सविता आणि गोदाक्का विहिरीवर पाणी भरीत होत्या. चारू मावशी मात्र दिसत नव्हती कदाचित ती येऊन गेली असणार. काय ग पार्वती ,आता बरं वाटतं का ?सविताने आल्याआल्याच विचारलं. काय ग पारु सविता सांगत होती तुझी तब्येत बरी नाही ते, खरं आहे का ? गोदाक्काने ही खुशाली विचारावं म्हणून विचारलं .आता बरं वाटतंय, काल उपवासामुळे कदाचित थोडा थकवा आला

असावा , बाकी काही नाही. आराम केल्यावर बरं वाटलं असं म्हणून तिने विहिरीमध्ये बादली सोडली बादली भरल्याचा आदमास घेत तिला वर खेचण्यासाठी तिने विहिरीत डोकावलं. आज समोर बादलीच दिसत होती, तिला थोडं हायसं वाटलं. मग तिने विहिरीच्या इतर काण्या कोपऱ्यात नजर फिरवली परंतु सर्वत्र फक्त पाणीच दिसत होतं , कसलंही वेगळं प्रतिबिंब पाण्यावर दिसत नव्हतं . सविताची आणि गोदाक्काची हेलकावे खात असलेल्या बादल्या हळूहळू वर येत होत्या. कालच्यासारखे काहीही विचित्र नजरेत पडत नव्हतं .तिने हू ी श करत निश्वास सोडला. मग तिनेच रोजच्या दोन-चार गोष्टी सविता आणि गोदाक्का बरोबर करून उरलेले पाणी भरलं .आज तिला आता अजून फ्रेश वाटू लागलं .काल आपण पाहिलं तो नक्कीच भास होता अशी तिला आता खात्री वाटू लागली. हळूहळू घडलेला प्रकार ती विसरूनही गेली आणि आपल्या रोजच्या जीवनक्रमात रममान झाली. येत्या पंधरा दिवसात तिच्या सासरची काही मंडळी ,सासू-सासरे काही दिवस राहण्यासाठी तिच्या घरी येणार होते .पार्वतीचा नवरा अरुण बँकेत नोकरीला होता , त्यामुळे गावोगाव बदली हा जीवनाचाच भागच होता .पार्वतीला या नवीन गावात येऊन चार -सहा महिनेच झाले होते तेवढीच पार्वतीला सोबत आणि हवापालट म्हणून ते येणार होते .त्या तयारीत ती लागली. ठरल्याप्रमाणे सर्वजण आले मग तिच्या दिवसाची दिनचर्या फारच व्यस्त झाली. साऱ्यांचं करण्यात दिवस कसा संपायचा तिला कळायचं पण नाही. एका सकाळी तिला उठण्यास थोडा उशीर झाला. तिने बघितले तर घरातली सर्व मंडळी अगोदरच उठलेली होती. सासूबाई तर आंघोळ करुन तयार होत्या. मला तुम्ही उठवलं का नाही? तिने लगेच विचारलं. अग मला वाटलं थकली असशील ,उठशील थोड्यावेळात म्हणून मुद्दामून उठवल नाही सासूबाईंनी उत्तर दिलं. मला काय काम आहे ?आज पौर्णिमा म्हणून देवपूजेसाठी लवकर उठली एवढच! सासूबाईंनी अजून स्पष्ट केलं . अरे बापरे! मी तर विसरुनच गेले होते. पार्वती म्हणाली .आणि अजून शशांक पण तयार झालेला दिसत नाही, त्याला पटकन आंघोळ घालून शाळेत पाठवते .असं म्हणून ती त्याला बाथरुम मध्ये घेऊन गेली. ती टॉवेल वगैरे घेऊन येईपर्यंत शशांक घंगाळातल्या पाण्याशी खेळत होता. शशांक बस बघू दगडावर लवकर ,आज तुला खूप उशीर झालाय, पटापट आंघोळ करून काहीतरी खाऊन तयार हो, व्हॅन वाले काका आता येतीलच. तिने त्याला जबरदस्ती दगडावर बसून आंघोळ घालण्यासाठी पाण्याचा तांब्या घंगाळात बुडवला .पाण्याकडे पाहताच एक क्षण समोरचं प्रतिबिंब पाहून ईी इ करत ती जोरात किंचाळत उभी राहिली. पाण्यामध्ये चक्क एका लहानशा वासराचे , गायीच्या छोट्याशा पिल्लूयाच प्रतिबिंब दिसत होतं. तिच्या स्वतःच्या मुलाचं प्रतिबिंब पाण्यामध्ये वासरा सारखं बघून भयचकित होऊन ती एकटक एकदा शशांककडे तर एकदा घंगाळाकडे पाहत होती. शशांकला काहीच कळत नव्हतं आई असं काय बघते आहे ते पुन्हा मागच्या पौर्णिमेची सगळी कहाणी पार्वतीच्या डोळ्यासमोर पुढे उभी राहिली .आई काय झालं? पाल हे का कुठे ? आई पालीला घाबरूनच ओरडली असेल असं शशांकला वाटलं म्हणून त्याने विचारले . काही नाही , पालच होती गेली ती , पार्वतीने उत्तर दिले .ओत पाणी पाणी भरा भरा मला उशीर होतोय, शशांक पुन्हा आवाज देत तिला भानावर आणलं. तिने शशांकला तसाच बाथरूममधून ओढत आणत कपडे चढवायला सुरुवात केली . हे सारं करत असताना ती मात्र वेगळ्याच विचारात घडून गेली होती. अगं झालं का तुझं? व्हॅन वाला केव्हाचा ओरडतोय, तयार झाला असेल तर जाऊ दे त्याला सासूबाई च्या बोलण्याने ती परत भानावर आली. शशांक शाळेत निघून गेला पार्वतीच्या मनात विचारचक्र काही थांबत नव्हतं. आज आपल्याला परत असं का दिसतंय असं का वाटतंय असं तिला राहून राहून वाटू लागलं. ती लगेच परत बाथरुम मध्ये गेली आणि घंगाळातल्या पाण्याकडे पाहू लागली. परंतु आता घंगाळात तिला फक्त तिचं प्रतिबिंब दिसत होतं दुसरं काहीही नाही. तिला कळेना आज परत आपल्याला भास झाला असावा का ?विचार करतच ती घरातल्या कामाला लागून गेली. सासूबाई त्यांच्या पूजेमध्ये गर्क होत्या त्यानंतर पार्वतीने ही सारंकाही आटोपून पूजा करून घेतली. नंतर जेवण, दुपारचा आराम ,चहापाणी ,गप्पा यात दिवस निघून गेला. संध्याकाळी आल्यावर आज यांना ही घटना सांगावी का असा नवीनच प्रश्न तिला पडला कारण सकाळी एकदा दिसलं होतं ते दुसऱ्यांदा दिसलं नव्हतं म्हणून ती संभ्रमात होती. दिवसभरात परत तिला तसला काही अनुभव आला नाही. यावेळेसही घरी पाहुणे असल्यामुळे आपण जास्त श्रम केले असणार आणि थकलो असणार,आराम व्यवस्थित न झाल्यामुळे असे होत असावे का? का हा निव्वळ योगायोग आहे? कदाचित आपल्या मनाचा भ्रमच असणार असं स्वतःला बजावत शेवटी तिने कुणालाच काहीही न सांगण्याचा निर्णय घेतला. पुन्हा रोजचीच दिनचर्या सुरू झाली .दुसऱ्या-तिसऱ्या व येणाऱ्या कित्येक दिवसात तिला परत तसा काहीच अनुभव आला नाही. आता तिची त्याप्रसंगा वरील विचार करण्याची सवय आपोआपच कमी झाली .दिवसात थोडा वेळ मिळाला की पेपर वाचणे, पुस्तक वाचणे, टीव्ही सिरीयल बघणे ,अगदी थोडा जास्त वेळ मिळाला तर गप्पा करणे हे नित्याचेच दिनक्रम पुन्हा नेहमीप्रमाणे सुरू होते. आता हिवाळा संपत आला होता. चैत्राची गुढी पाडव्याची चाहूल लागली होती दिवसभर उन्हाच्या झळा चांगल्याच बसत होत्या. गर्मी, उकाडा 'मी' म्हणत होता .

पाडव्याची तयारी करता करता गुढीपाडवा सरला सुद्धा . घरात भरपूर मंडळी असल्याने दिवस कसे गेले कळलेच नाही ..घरातल्या उन्हाळी कामांची थोडीफार तयारी सुरु होती ....चैत्र महिन्यातली पौर्णिमा आली . नेहमीप्रमाणे पार्वती सकाळची सारे काही आटोपून विहिरीवर पाणी आणण्यासाठी गेली. एक वेडी मुलगी विहिरीवर उभी होती ...धुळीने माखलेली , विस्कटलेल्या केसाचा पूर्ण डोलारा डोक्यावर लोंबकळत , वेडेवाकडे हाव भाव करत ती स्वतःशीच बोलत होती . त्या मुलीला लोक माली म्हणून हाक मारत ...हाक कसली पुष्कळदा फक्त हाकलून देण्यासाठीच तिच्या नावाचा वापर करीत . ती गावभर फिरत असल्याने पार्वतीला तिची कल्पना होती. ही स्वतः


mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

च्या नादातच विहिरीवर चढली नसेन ना ? पार्वतीला प्रश्न पडला . ऐ माले उतर खाली ...पडशील ना विहिरीत ! चल हो खाली, जा इथून तिने दरडावतच 'माली' ला तिथून जाण्यास सांगितले . माली काही केल्या ऐकेना , पाणी हवंय का तुला ? तहान लागलीय का ? देऊ का पाणी ? दया येऊन पार्वतीने विचारलं , पण माली' च तिच्याकडे काही लक्ष नव्हतं .

उपवासामुळं आणि पूजेची तयारी यामुळे आज पार्वतीलाही थोडी घाईच होती . तिने हंडा विहिरीच्या बाजूला ओट्यावर ठेवला आणि भराभरा पोहरा विहिरीत सोडला ...बादली तळाशी जाऊन धडकली तसे तिने पाणी शेंदण्यासाठी खाली बघितलं ...बादली पेक्षा तिचे लक्ष बाजूच्या प्रतिबिंबावर सहज गेले . त्यात एका घायाळ झालेल्या कोवळ्या हरिणीची छबी अगदी स्पष्ट दिसत होती , एक खूप जखमा असलेले , रक्ताने माखलेले , तडफडत असलेले, हरीण वरतून डोकावत असल्यासारखं तिला दिसलं . तिने लगेच वर पहिले तर माली वेडे वाकडे चाळे करत उभी होती . विहिरीतल्या पाण्याकडे पाहून ती ठेंगा दाखवत शिवीगाळ करीत होती . पार्वतीने पुन्हा पाण्यात पाहिलं तर तेच दृश्य ! ...एक घायाळ हरिणी तडफडत होती .असलं काही दिसण्याची ही चौथी वेळ होती ...त्यामुळे पार्वती या वेळेस फार घाबरली नव्हती . ती परत परत , एकदा विहिरीच्या पाण्यात आणि एकदा माली कडे बघत होती .पण प्रत्येकवेळी तिला पाण्यात घायाळ हरिणीचेच प्रतिबिंब दिसत होते.

आता या साऱ्या प्रकाराचा सविस्तर विचार करायचा असं तिने ठरवलं .. ती आपली भरलेली घागर घेऊन घरी निघून आली . शांतपणे ती देवाजवळ जाऊन बसली आणि आतापर्यंत घडलेल्या साऱ्या घटनांचा आढावा घेऊ लागली . घरात कुणीच नव्हते त्यामुळं तिला शांतपणे विचार करता आला. असे भास आपल्याला फक्त कधी कधीच का होतात ? एका दिवसानंतर साधारण महिनाभर तसे काही दिसत नाही आणि मग अचानक एक दिवस परत कुठल्यातरी प्राण्यांचं प्रतिबिंब दिसते .तिने विचार केल्यावर तिच्या लक्षात आले कि हे सारं बरोबर पौर्णिमेच्या दिवशी घडते . म्हणजे पौर्णिमेच्या दिवशी जर आपण एकाद्या व्यक्तीच प्रतिबिंब पाण्यात पाहिलं तर कदाचित त्याच्या जागी आपल्याला एखादा प्राणी दिसू शकेल . आता तिची उत्सुकता अजूनच वाढली होती . तिने लगेच दारातून विहिरीकडे पाहिलं ...अजून तरी कोणी आलं नव्हतं .. थोड्यावेळात तिला मागच्या गल्लीतल्या दोन मुली विहिरीवर जाताना दिसल्या. तिने लगेच आपलाही बादली आणि हंडा उचलला व विहिरीवर येऊन पोहोचली . एव्हाना त्या मुलींनी पाणी शेंदायला सुरुवात केली होती . पार्वतीने मुद्दामहून पाण्यात डोकावून पाहिलं ..तिचा अंदाज बरोबर होता .लाल पोलकं आणि निळा परकर घातलेल्या मुलीच्या जागी तिला एक मांजर दिसत होती तर हिरवी साडी नेसलेल्या थोड्या वयस्कर मुलीच्या जागी तिला बकरी दिसत होते. क्षणाचाही विलंब न करता ती सविताच्या घरी पोहचली . सविता माझं तुझ्याकडे एक काम आहे करशील का ? होच म्हणावं लागेल तिने गळच घातली. बरं बाई ! सांग काय करू ? सविताने लगेच होकार दिला . तुला आता माझ्याबरोबर आपल्या विहिरीवर यावे लागेल . मला तुला एक गम्मत दाखवायची आहे .चल पटकन! . सविता निमूटपणे तिच्या बरोबर आली . ते बघ काय आहे ते ?असं म्हणून तिने सविताला विहिरीत डोकावयास सांगितले आणि तिचं प्रतिबिंब पाण्यात बघितलं . मागे दिसली होती तशीच गाय आज परत तिला दिसत होती .ती एकटक पाहत होती खात्री करुन घेत होती . अगं कुठे काय ? मला तर काहीच गम्मत दिसत नाहीये , सविताने कुतूहलाने विचारलं . तुला विहिरीत काय दिसत? पार्वतीने सविताला विचारलं . एवढं मोठं पाणी , तिकडे तू आणि इकडे मी. अजून काय ? सविताने उत्तर दिले. पार्वतीला मात्र स्पष्टपणे सविताच्या जागी 'गाय' आणि स्वतःच्या जागी स्वतःचेच प्रतिबिंब दिसत होते. आता एक गोष्ट नक्की झाली होती पौर्णिमेच्या दिवशी पार्वतीला पाण्यात इतर लोकांचे प्रतिबिंब वेगळे दिसतात. पण हे फक्त तिलाच दिसायचं , इतर कोणाला ते दिसत नव्हतं. तिने लगोलग सविताला आपल्या घरी नेले आणि सारं काही सविस्तरपणे समजावून सांगितले .

आता आश्यर्यचकित व्हायची वेळ सविताची होती . तिला तर यावर अजिबातच विश्वास बसत नव्हता पण पार्वती म्हणते म्हणून तीने सारं एकूण घेतलं . पार्वतीवर तिचा विश्वास होता. ती काही खोटं सांगणार नाही याची तिला खात्री होती .मला सांग पार्वती !,अगं हे जर खरं असेल तर तू तुझ्या घरातील साऱ्यांचाच चेहरा पाण्यामध्ये का नाही पाहत ? बघूया काय दिसतंय ते ...नाही म्हणजे ते सगळ्यात सोप्प आहे म्हणून मी सुचवलं. पण या सगळ्याचा काय अर्थ असावा ग ? पार्वतीने सविताला प्रश्न केला . तसं म्हणशील तर मला फार काही विशेष वाटत नाही बघ . काही अर्थ असेलही आणि नसेलही . कदाचित नियतीकडून तुला काही इशारा मिळत असावा , किंवा तुझ्या मनातले खेळ, कल्पना काहीतरी भास –आभासी रुपात तुला दिसत असावेत .कदाचित तुझ्या मनात त्या माणसाविषयी जसे अनुभव किंवा विचार असतील तसं तुला दिसत असावं , किंवा कदाचित त्याचा काही वेगळाही अर्थ असू शकेल. आपण आता यावर नंतर बोलूया फार वेळ झाला मला जायला पाहिजे . साऱ्या शक्यतांची जणू भविष्यवाणी करत सविता निघून गेली . आता पार्वतीला कशानेच चैन पडत नव्हती .

मुलगा शशांक येण्याची वेळ झाली होती. तिने बाथरुम मधली मोठी बादली पाण्याने भरून ठेवली आणि लाईट चालू करून ठेवला . शाळेतून आल्या आल्या तिने शशांकला हात–पाय धुण्याच्या बहाण्याने बाथरूम मध्ये घेऊन गेली.बादलीच्या पाण्यात आपोआपच तिला त्याचे प्रतिबिंब दिसू लागले .................... पाण्यामध्ये तिला वासराच्या छोट्या पिलाचा चेहरा स्पष्ट दिसत होता, मागच्या वेळेसही तिला अशाच प्रकारचा चेहरा दिसला होता. आता तिला कळून चुकले होते, हे सारे पौर्णिमेच्या दिवशीच घडते आता ती अजूनच उत्सुक झाली आणि तिच्या नवऱ्याची वाट पाहू लागली . कधी त्याचा चेहरा एकदा पाण्यात पाहते असे तिला झाले होते, त्यासाठी वेगळीच शक्कल तिने लढवली होती. बाथरुममधील भरलेल्या बादलीच्या पाण्यात तिने


mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

तिचे एक सोन्याचे कानातले टाकून दिलं. नवरा घरी आल्यावर फ्रेश होण्यासाठी बाथरुममध्ये गेला तशी ती त्याच्या मागून गेली, अहो माझं कानातलं पडलं वाटतं तिथेच कुठे तरी जरा बघता प्लीज दिसतंय का ते ? तिने बाथरुम जवळ जाताच नवऱ्याला विचारलं, आणि इकडे तिकडे बघु लागली . अगबाई !बदलीतच पडलंय , ते बघा !, जरा देता का ? ती लगेच म्हणाली. त्याने खाली वाकून बादलीत हात टाकला त्याचक्षणी तिने पाण्यामध्ये त्याचा चेहरा न्याहाळण्यासाठी पाण्यात दिसणाऱ्या प्रतिबिंबाकडे पाहिलं .... ती चकितच झाली! ती चक्क एका सिंहाचा चेहरा पाण्यात पाहत होती . हे घे!. नवऱ्याने हातावर कानातले ठेवत तिला भानावर आणलं . तिच्या मनात चाललेलं काहीही समजू न देता , ती तिथून किचन कडे निघून गेली . आता तिचं विचार चक्र अतिशय गतिमान झालं होतं. तिला आता भीती कमी आणि काहीतरी नवीन गवसल्याचा आनंद जास्त झाला होता . पण त्याचा अर्थ माहित नसल्याची हुरहुरही तितकीच तिला सतावीत होती .काय असेल या साऱ्याचा अर्थ? ती स्वतःशीच पुटपुटली . तिला काहीच सुचेना ...ती रात्र विचार करण्यातच निघून गेली. दुसऱ्या दिवशी सकाळीच काम आटोपल्यावर तिने सविताला घरी बोलावून घेतले. सविता मला तुझी मदत हवी आहे ,इथे तूच माझी जीवाभावाची मैत्रीण आहे ,त्यामुळे तूच मला हे सगळं समजण्यात, समजावून सांगण्यात मदत करू शकते. मुलगा व नवरा यांचा काल सायंकाळी आलेला अनुभव तिने सविताला सांगितला . सविता ही विचार करू लागली ,थोडावेळ विचार केल्यावर ती ओरडतच बोलली., कदाचित हे असं तर नाही ना की तुला या लोकांचे स्वभाव बघून साम्य असलेले प्राणी पाण्यामध्ये दिसतात, जेणेकरुन तू आधीच सावध व्हावं किंवा त्यांच्या मनात काय विचार आहे हे तुला कळावं, सविताने तिचं मत मांडलं . हे बघ तुला तुझा म ुलगा एक वासरू म्हणून दिसतो ,म्हणजे गाईचं प्रेमळ वात्सल्याची ओढ असलेलं पिल्लू...एका निरागस मुलाचं प्रतिनिधित्व बरोबर कि नाही ? ! तुझा नवरा सिंहाचं प्रतिनिधित्व करतो , तसा तो करारी, शिस्तबद्ध, जरासा मीपणा चालवणारा थोडा मानी स्वभावाचा , कुटुंबप्रमुख..... सारं काही जुळतंय की नाही? हं ि ि ...खरंय !. पार्वतीने दुजोरा दिला . तुझ्या जागी मला गाय दिसते तशी तू पण आहेसच गायी सारखी , गरीब, शांत, सर्वाचं भलं करणारी, सदैव देव-देव करणारी, गाईच्या पोटातही तेहतीस कोटी देव असतात म्हणे ! खरंच ग ! जुळतंय सारंकाही पार्वती उत्स्फूतपणे म्हणाली . पण मला मावशीच्या जागी गिधाड का ग दिसलं असेल ? तिला लगेच प्रश्न पडला .तुला मावशीच्या जागी त्या दिवशी गिधाड दिसलं म्हणून तू इतकी घाबरली होतीस ? सविताला आठवताच तिने विचारलं . हो गं !, भयंकर दृश्य होतं ते मी विसरू शकत नाही, आठवलं तरी माझ्या अंगावर काटा उभा राहतोपार्वती घाबरतच बोलली . सांग हे तर जुळत नाही ना? राधा मावशी आणि गिधाडांचा काय संबंध? किती किळसवाणे ,घाण आणि ओरबडून खाणारे असतात ती गिधाडे !राधा मावशीच तर सारं व्यवस्थित, नीटनेटक असतं . शिवाय त्या वागतातही चांगल्याच ना ? मग असं का मला दिसलं असावं ? पार्वतीने सविताला प्रश्न केला. सविता विचार करत होती तिचे डोळे काहीतरी सापडावं तशा आवेगाने एकदम चमकले .हे बघ तू कुणालाही सांगणार नसेल तर मी तुला एक गोष्ट सांगते ,तुला जे दिसलं ते बरोबरच दिसलं असं माझं मत आहे.

पण ते सारं मी तुला आज नाही सांगू शकणार .नंतर कधी तरी सांगेन . तुझ्या घरातही पाहुणे आहेत . मलाही घरी थोडी कामं आहेत , मला आता घरी जायला हवं . आपण नंतर नक्की बोलू यावर. असं म्हणून सविता निघून गेली . पार्वतीच्या मनातली हुरहूर अजूनच वाढली . पण वाट बघण्याशिवाय काही इलाज नव्हता. दिवसामागून दिवस जात होते . पुढील काही दिवस सविता कामानिमित्य बाहेर गावी गेली होती त्यामुळे सविताची तिची भेटच झाली नाही . पार्वती सविताची डोळे लावून वाट पाहत होती . आणि एक दिवस सकाळीच विहिरीवर सविता दिसली , का ग केंव्हा आलीस ? बरेच दिवस लागले या वेळेस , नाही का ?. पार्वतीने अंगणातूनच सविताला विचारले , तिने काही उत्तर द्यायच्या आत ती पुढे म्हणाली ये आज दुपारी निवांतपणे , आपल्याला त्या विषयावर बोलायचे आहे ना ? , सविताने मानेनेच हो म्हणत दुजोरा दिला .

दुपारी सविता , पार्वतीकडे ठरल्याप्रमाणे आली सुद्धा .आल्या आल्याच तिने सुरुवात केली ,

राधा मावशी वरवर कितीही चांगल्या वाटत असल्या तरी फार आतल्या गाठीच्या आहेत . त्यांच्या मनाचा ठाव कुणालाही घेता येत नाही . तू तर या गावात फारच नवीन आहेस .पण मी गेली वीस वर्ष याठिकाणी राहते . गावकऱ्यांचे त्यांच्याबाबत मत काही फार चांगले नाही . इतके दिवस झाले माझी त्यांची ओळख आहे पण अजून मी त्यांच्या घराची पायरी ओलांडली नाही , म्हणायला दोन घर सोडून त्यांचं घर आहे .गावातल्या सगळ्या ओळखीच्यांच्या घरी -दारी मी कित्येकदा गेले असेन पण मावशीचा उंबरठा ओलांडून जायला कोणाचीही सोय नाही.त्या कधी बोलवतही नाही ..त्यांच्याकडे .सण-वार , हळदींकुंकू सुद्धा बाहेरच्या वाड्यात अंगणात होतं ...ते सुद्धा तेवढ्यापुरतं तेवढंच ...केवळ औपचारिक जाणं येणं होतं त्यावेळेस शिवाय सारं काही नौकर चाकरच बघतात .. त्यांच्याकडे कामाला असलेले रखमा सांगायची त्यांचा खूप दरारा आहे, फक्त बाहेरच्या बाजूनेच नोकरांना बाहेरच्या भागात प्रवेश करता येतो काही खोल्यात काय चाललंय काय घडतं कुणालाच माहीत नसते. त्यांची सून दोन वर्षापूर्वी वारली .कारण कुणालाच कळलं नाही. चांगली धडधाकट होती. अचानक कशी गेली ?लोक काही -बाही बोलतात मागे .एकदा ऐकलं होतं, राधा मावशी खूप छळ करायच्या म्हणे तिचा ...यांच्या तोलामोलाची नव्हती पैशाने म्हणून सारखे टोमणे मारत असत, मानसिक -शारीरिक छळ तर रोजचाच होता म्हणे .कधी कधी तिच्या ओरडण्याचा आवाज बाहेर ऐकू येई , पण विचारायची कोणाची हिम्मत नव्हती . त्यांची सून कधीच घराबाहेर पडत नसे . असं कानावर आलाय की ह्यांनीच मारली तिला ...कुणाला काही पत्ताही लागू दिला नाही ..तिचं शेवटचं दर्शन म्हणूनही गावकऱ्यांनी पाहिलं नाही ...तिच्या माहेरचे काही लोक आले होते, परस्पर त्यांच्या वाड्याच्यामागे, त्यांच्या


mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

शेतातच सारे सोपस्कार उरकून टाकले . गाववाले काय, काही दिवस कुजबुजले नंतर विसरूनही गेले . लगेच एक वर्षाच्या आत दुसरी सून पण करून आणली, आता तिच्या बद्दल पण बरच काही कानावर येते .या साऱ्या गावाच्या चौकशी करत असतात पण त्यांच्या बद्द्ल आपल्याला एक शब्दही कळत नाहि. हे सारं दुसरं कोणी नाही ,तर त्यांच्याकडील माणसानेच गावातल्या लोकांना सांगितलं होतं. रघु नावाचा एक नातेवाईक त्यांच्या घरीच राहत असे. गावात त्याचे काही मित्र होते. घरातलं वातावरण फार चांगलं नसते असं उडत उडत बोलायचा. आमचे हे सांगत होते तसा तो घाबरतच थोडीफार माहिती त्याच्या मित्रांना द्यायचा. पहिल्या सुनेच्या मृत्यूनंतर रघु फार अस्वस्थ झाला होता . त्यांनतर तो गावात जरा जास्तच भटकताना दिसायचा . त्याचे ते भणंग अवस्तेत शून्यात नजर ठेवत विनाकारण गल्लीतून भरकटणं, मी पण माझ्या डोळ्यांनी पाहिलंय , सविता न थांबता बरंच काही बोलत होती . त्या घटनेत नक्कीच काहीतरी काळेबेरे होतं ,तो गावात एक दोन जणांशी बोलला होता हे जेव्हा मावशींना कळालं तेव्हा त्याच्या दोन दिवसांनी रघु गावाबाहेरच रेल्वे रुळावर मेलेल्या अवस्थेत सापडला. कोणी म्हणे आत्महत्या!, कोणी म्हणे खून! ,मावशी निगरगट्ट सारख्या, निरपराध असल्याचा आव आणत राजरोस मिरवत होत्या. जसे काही घडलेच नाही!. गावात शिरपा गडी आहे, त्याचा एक पाय कापला गेलाय, तो लंगडा आहे. आता घरीच असतो, मावशींच्या घरीच कामाला होता म्हणे वीस–तीस वर्षापूर्वी. मावशीच्या शेताची सारी कामे तोच करायचा. एका सकाळी अचानक त्याला तालुक्याच्या हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आलं, तेव्हा कळलं की त्याचा पाय तुटला. पंधरा दिवसांनी घरी आल्यावर सगळ्या गावकऱ्यांनी त्याला विचारलं काय झालं तर म्हणे मी झाडावरून पडलो ,पण त्याच्या उत्तरात कुणाचं समाधान झाले नाही. गावकऱ्यांच्या मते त्याने काहीतरी चूक केली असणार आणि बदल्यात मावशीने पाय मोडला असणार, शिवाय कुणाला सांगशील तर याद राख अशी तंबी पण दिली असणार .असंही म्हणतात की त्यांचा नातू ..जो आता २ वर्षाचा आहे ..तो मुळी त्यांचा नाहीच! .काय सांगतेस ? मध्येच पार्वतीने आश्चर्याने विचारले , मग तो कोण आहे ?. पार्वतीने लगेच विचारलं . सविता पुन्हा सांगू लागली , अगं तो रघु होता ना, त्यांच्या घरी काही दिवस , त्याच्याच मुलीचा मुलगा होता म्हणे तो . रघूला आणि त्याच्या मुलीला काहीतरी भूलथापा मारून , कपट करून यांनी त्या मुलाला रातोरात चोरून आणला वाड्यावर .आणि तो त्यांचाच नातू आहे असा सारा बनाव करत गावभर साखरही वाटून झाली .तसं त्यांच्या सुनेला सूर्यदेव ही दिसत नाही कि उनही शिवत नाही ..मग कुणाला काय कळणार ? आणि विचारणार कोण ? . हे सारं त्या नवीन सुनेला नसेलही आवडलं, ती प्रतिकार करत, नकार देत असणार पण पहिल्या सुनेचा इतिहास तिलाही माहित असेलच ना ?. आणि इथे ऐकायला आहे कोण ? प्रश्न –उत्तर सारं काही सविताचा बोलत होती .आता मला सांग अशा सगळ्या कहाण्या जिच्याशी जोडल्या गेल्या ती बाई साधी–सरळ कशी असणार? सविताने पार्वतीलाच सवाल केला .एवढं सगळं अनपेक्षित ऐकून पार्वती पार गोंधळून गेली होती .ती फक्त मान हलवत राहिली. आपण काय समजतो आणि काय असतात ही माणसं, नाही का ? तिने सविताला उलटप्रश्न करीतच उत्तर दिले .

त्यांच्या गप्पा आज चांगल्याच रंगल्या होत्या , विषयही तसाच होता म्हणा. घरातील सगळी पाहुणे मंडळी मागच्याच आठवड्यात निघून गेली होती त्यामुळे पार्वती एकटीच होती .पार्वतीने जरा उसंत घेत चहा करून आणला , सविता आणि तिने दोघींनी घेतला ...मध्ये जरा शांतता पसरली . दोघीही विचारच करीत होत्या. ऐ पण गोदाक्का तशी साधी वाटते ना गं ? पार्वतीने मध्येच सविताला चहाचे घोट घेता घेता प्रश्न केला , मला तुझ्या एवढं कुणा बद्दल काहीच माहीत नाही , शिवाय माझ्याशी सगळे चांगलेच वागतात, म्हणून विचारलं! पार्वतीने स्पष्टीकरण दिलं. गोदाक्का तशी माझ्याशी पण चांगलीच वागते. तशी ती व्यवस्थित आहे पण माझ्या सासूबाईंना ती अजिबात आवडत नाही. सविताने गोदाक्का बद्दल सांगायला सुरुवात केली . सासूबाईंनी मला तिच्यापासून चार हात दूरच राहायला सांगितलंय . त्या जादुटोणा करतात म्हणे! , त्यांचं आणि मागच्या गल्लीतल्या दुभासानेंच चांगलंच वैर आहे. दुभासनेचें चान्गले तीन चार वाडे आहेत तिथे त्यांचे चांगली १० –१२ घरे आहेत . त्यांच्या वाड्यात नेहमी काहीतरी विचित्र घडत असतं , कधी कुणाला रक्ताची उलटी काय होते, कुणाच्या अंगात काय येते , कोणी विचित्र अपघातात काय सापडतात ,हात–पाय मोडून घेतात, तर एखादं कुणी वेड्यासारखी झटके येऊन गावभर फिरत असते ,मध्येच एखादी सासुरवाशीण सासरी नांदवत नाही म्हणू घरीच काय निघून येते , सारंच विचित्र आणि भयानक ! आणि हे सारं गोदाक्का करते असं म्हणतात .सविताने एका दमात सांगितलं .पण गोदाक्का असं का करेल ? पार्वतीने प्रश्न केला . अगं त्याची पण एक फार मोठी कहाणी आहे . आता विषय निघालाच आहे तर देते सांगून तुलाही . सविताने जणू आज सारं काही सांगून टाकण्याचा चंगच बांधला होता .दुभासनेच्या एका घरातील मुलीने आणि गोदाक्काच्या म ुलाने पळून जाऊन लग्न केले होते . नंतर गावकऱ्यांनी त्यांना समजावून परत आणले आणि त्यांचे लग्नही मान्य केले . पण दुभासाने परिवाराला हे मनातून अजिबात मान्य नव्हते . दोन दिवसातच गोदाक्काच्या मुलाचा मृतदेह गावाबाहेरच्या विहिरीत मिळाला . त्याची बायको तर पार वेडी झाली . ती नाही का फाटक्या कपड्यात धुळीने माखलेली एकवेडी बाई गावभर फिरत असते आणि वेडेवाकडे बोलत असते ती. ती मालीच तर गोदाक्काच्या पोराची बायको आहे . काय ? पार्वती एकदम ओरडलीच . हो मग ?, सविता पुढे सांगत राहिली .नवरा गेल्याच्या दुःखात माली सुरुवातीला काहीच बोलली नाही आणि नंतर ती म ानसिकरीत्या चांगलीच आजारी झाली .तिची कुणीच दखल घेतली नाही . मुलगा गेल्यावर गोदाक्काने तिला स्वीकारलं नाही कि तिच्या घरच्यांनी तिला स्वीकारलं नाही . तेंव्हापासून ती वेड्यासारखी भटकत असते , कुणी काही दिले किंवा रस्त्यावरच जे मिळत ते खात असते ...कशीही राहते ...तिला त्याच भानच कुठे आहे म्हणा ?सविताच्या सांगण्याने पार्वतीच्या अंगावर काटा



mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

आला , बापरे! हे काय जीवन? अन हे काय असले लोक ? ती चिंताग्रस्त होऊन उद्गारली . सविता अजून बरंच काही सांगतच होती गोदाक्काच्या मते दुभासण्यानीच त्यांच्या मुलाला मारलाय त्याबद्दल तिच्या मनात प्रचंड राग तसाच आहे. ती मधली दोन वर्ष गावाबाहेर होती म्हणे त्यानंतर परत आली तेव्हापासून दुभासनेकडील हे विचित्र प्रकार सुरू आहे. काही जणं म्हणतात गोदाक्का आता दुभासाने कुळाचा नाश केल्याशिवाय थांबणार नाही! इतर कोणाला ती अशा प्रकारचा त्रास देते असं ऐकिवात नाही . पार्वतीला आता फारच विचित्र आणि भयानक वाटू लागलं होतं आपल्याला बरोबर वाटतात तसे आपल्या सभोवती ची माणसं साधी नसतात का ग ?किती भयंकर आहे हे सारं ? तिने अतिशय काळजीनेच सविताला विचारलं . नशीब तुझ्यासारखी एक चांगली मैत्रीण मला मिळाली नाहीतर माझा विश्वासच उडाला असता चांगुलपणावरचा  ती पुढे विश्वासानं म्हणाली .

अगं आपल्या सभोवती अश्या बऱ्याच घटना घडतात, घडत राहणार .शेवटी हे कलियुग आहे . आपण मात्र विचलित व्हायचं नाही . आपण नेहमी चांगलंच वागायचं, आपल्यामुळं इतर कुणाला त्रास होता काम नये . मग काय काळजी? , शिवाय परमेश्वर आहेच की ! तो आपल्या पाठी नाही तर कुणाच्या पाठी उभा राहणार ? असा सकारत्मक विचार सांगत सविताने शेवटी पार्वतीच्या थोडा ताण हलका केला. आणि थोड्याच वेळात ती घरी निघून गेली .

संध्याकाळी पार्वतीचा नवरा घरी आला ते मुळी खुश होऊन हसतच , अगं ऐकलं का, माझी बदली झाली बघ,आता परत आपण पुण्याला आपल्या घरी जाणार. मी म्हंटल नव्हतं तुला काही दिवसांचाच प्रश्न आहे म्हणून ? त्याने अंगणातूनच पार्वतीला सांगितले .पार्वतीच्या मनात तर कल्लोळ माजलेला होता पण या बातमीने तिलाही छान वाटलं. आता उद्यापासून आवरा –आवर करायला हवी ,महिनाभरात मला तिकडे रुजू व्हायचंय तो आनंदाने म्हणाला . पार्वतीने सुटकेचा निश्वास टाकला , सुटका झाली म्हणायची आपली इथून नाही तर अजून काय विचित्र अनुभव आले असते देव जाणे! ती मनातल्या मनात बोलली .चार पाच दिवसातच तिने गावातल्या एका काम करणाऱ्या बाईला हाताशी घेऊन घर आवारण्यास सुरुवात केली . 'बायजाबाई' तशी म्हातारी पण चांगली काटक होती , अंगात धम्मक होती आणि तिचा कामात हातही चांगलाच चालत असे . ती पुढे मधून मधून पार्वतीकडे कामासाठी येत राहिली .काम करताना एक दिवस पार्वतीने सहजच गोदाक्काचा विषय काढला , काय ग! ती वेड्या माली ची सासू गोदाक्का कशी आहे ? त्यांच्या शेतात वैगेरे जाते का कधी तू कामाला ? नाय बा! , आत्ता न्हाई जात , तसा बी गोदाक्का अन तिचा दादला घरीच करतेय की समदं , एक गडी माणूस हाय त्यांच्याकडं, बस तेवढंच बायजान उत्तर दिलं . ती तर मोठी तालेवार बाई व्हती, तिच्या पोराचं तसं झाल्यापासून येड्यावानी करतीय...लोक म्हन्तेत ती करणी करती ...पर मले न्हायी वाटत , नाय त गोदाक्का भली बाय हाय  , बायजान अजून माहिती पुरवली . तू कधीपासून ओळखते ग गोदाक्काला ? पार्वतीने प्रश्न केला .  आत्ता ! कधीपासून म्हणजे ? ती ह्या गावात हाये तेव्हापासून वळकती म्या तिला . तिच्या दोन महिंन् आधी म्या लगीन करून ह्या गावात आले . माझा दादला तिच्या घरीच कामाला जात व्हता . मी बी जायची त्या वक्ताला त्याच्या संग. गोदाक्का बाजूच्या परघण्यातल्या सावरखेडची , तिचा बाप मोठा जमीनदार होता , लय शिरीमंती होती तिच्या म्हायेरी. . तिले दाग –दागिन्याचा ,नटायचा , भारी कपडे घालायचा लय शोक व्हता. आदलीभर दागिने म्या माह्या डोळ्यानं पहिले तिच्या अंगावर. तवा लय रुबाब होता तिचा. पर तिच्या घरात लय भावबंदकीच्या भानगडी होत्या ...कुणाचा कोणाले मेळ नव्हता ...गेली मंग जमीन कुळकायद्यात ...म्हणता म्हणता हातचं सारं हातातून निसटलं ...तशी गोदाक्का हुशार म्हणून थोडं फार राखून ठेवलं .घर फिरलं कि घराचे वासे बी फिरत्यात म्हणे , अन मंग एक एक संकट येतच राहिलं .नशिबाचा खेळ दुसरं काय ! बायजाला जे काही माहित होतं ते सारं तीन पार्वतीला सांगून टाकलं .बाकी कहाणी पार्वतीला माहित होतीच . पण का कुणास ठाऊक गोदाक्का बद्दल तिच्याही मनात सहानुभूतीच निर्माण झाली ..गोदाक्का काही चुकीचं करेल असे तिला अजिबात वाटेना .आवरण्याचा गडबडीत दिवस भराभर जात होते . एक दिवस सकाळीच खूप गोंधळ आणि कल्ला तिला बाहेर ऐकू आला , तिचा नवरा ही एव्हाना उठला होता, त्या दोघांनी खिडकीतून बाहेर डोकावून पाहिलं , दुभासणेंच्या वाड्यात कोणीतरी गेल्याच लोकं बोलत होते . सविता विहिरीवर भेटल्यावर पार्वतीने विषय काढला. कोण गेलं ग आज ? म्हणजे तुला काही माहीतच नाही का ? सविताने आश्चर्यानेच विचारले .गोदाक्काच्या सुनेचे दोन काका आणि दोन काकी , एकदम चार जन खल्लास झाले बघ रात्रीतून . काय झालं कुणालाच माहित नाही, त्यांच्या अंगावर कसल्या खुणाही नाही , कुणी मारलं ही नाही , मग एकदम काय झालं कुणास ठाऊक ? पोलीस पण आलेत गावात , पंचनामा चालू आहे म्हणे . आमचे हे सांगत होते कि पोस्ट मॉर्टम वैगेरे होईल , पोलीस केस होईल . पार्वतीच्या डोळ्यासमोर पुन्हा गोदाक्काची सारी कहाणी नाचू लागली. घरी नवरा आल्यावरही पार्वती आणि तिच्या नवऱ्यामध्ये दुभाषणेकडच्या या भयानक प्रकाराची चर्चा होत राहिली. पण पार्वतीने गोदाक्काबद्दल कळलेली कोणतीच माहिती नवऱ्याला सांगितली नाही .शेवटी गाव सोडून जाण्याचा दिवस जवळ आला . दोन दिवसांनी सारं सामान घेऊन एकदमच निघायचं ठरलं होतं. आज पौर्णिमेचा दिवस ...या गावातली शेवटचीच पौर्णिमा ! नेहमी प्रमाणे पार्वती विहिरीवर गेली , आणि पाणी भरायला सुरुवातही केली. विहिरीवर कुणीही नव्हतं , ती कुणाची तरी वाट पाहत होती .

एवढ्यात तिला हवी असलेली व्यक्ती विहिरीवर आली . अर्थात ती तिच्या ओळखीचीच होती .  काय ग तुम्ही गाव सोडून चाललात म्हणे आल्या आल्याचं समोरच्या व्यक्तीने प्रश्न केला . हो !बदलीची नोकरी ना यांची !,चालायचंच !. पार्वतीने हसतच उत्तर दिले . समोरच्या व्यक्तीने एव्हाना पाणी शेंदायला सुरुवात केली पण , पार्वतीने थोडं थांबून आवर्जून विहिरीच्या आत पाण्यात पाहायला सुरुवात केली . पाण्यात तिला चक्क चेटकिणीचं प्रतिबिंब दिसत होतं

, शिवाय त्यामागे मोराचा पूर्ण फुललेला पिसाराही स्पष्ट दिसत होता . चेटकिणीचा चेहरा आणि मागे मोराचं शरीर असे विचित्र रूप पाहून तिला धक्काच बसला , पण दुसऱ्याच क्षणी तिने स्वतःला सावरलं . जे दिसत होतं तेही खरंच होतं . तिच्या समोर गोदाक्का पाणी भरत होती , पिसारा फुलवलेला मोर तिच्या सुरुवातीच्या आयष्याचं , वागण्याचं प्रतिनिधित्व करीत होता तर चेटकिणीचा चेहरा तिच्या सुडाच्या भावनेने बदललेल्या जीवनाचं प्रतिनिधित्व करीत होता . ती पाण्याची घागर घेऊन निमूट घरी आली . गोदाक्काबद्दल तिला मिळालेली माहिती खरीच होती याची तिला खात्री झाली. ती बऱ्याच दिवसापासून गोदाक्काचा चेहरा पाण्यात पाहण्यासाठीच पौर्णिमेची वाट पाहत होती . माहिती मिळाली म्हणजे त्या माणसाचं खरं रूप जाणून घ्यायचं , असं जणू व्यसन तर नाही ना लागलं आपल्याला? ती स्वतःशीच पुटपुटली . तिचा मनातल्या मनात विचार चालूच होता . शेवटी तो दिवस उजाडला . आज ती आपल्या कुटुंबासोबत हे गाव सोडून निघून जाणार होती . सकाळीच सविता भेटून गेली होती , गोदाक्कानेही चोकशी केली होती ...आठवण ठेव म्हणाल्या. जाण्यासाठी सारी सोया झाली होती . अडचण आणि परेशानी नको म्हणून तिच्या नवऱ्याने एक चार चाकी भाड्याने पुण्यापर्यंत करून घेतली होती . सगळ्या ओळखीच्या लोकांचे निरोप घेऊन झाले आणि प्रवास सुरु झाला . समोर सामानाची गाडी आणि मागे पार्वतीची गाडी ...सोबत मुलगा , नवरा ...तसे सारेच खुश होते . पण पार्वतीच्या मनातील विचाराचे कवडसे संपता संपत नव्हते . आपल्याला मिळालेली ही प्रतिबिंब पाहण्याची देणगी खरंच चांगली की वाईट ? तिलाच प्रश्न पडला .माणसं खऱ्या अर्थाने माहित असल्याशिवाय त्याला महत्व तरी काय ? आणि माणसाची मने अशी एक दुसऱ्या भेटीत , वरचेवर , वर वर ओळखता येतात ? नक्कीच नाही . आयुष्य ! म्हंटल तर सोप्प !,आणि म्हंटल तर फार गुंतागुंतीचं !,त्याचा गुंता आपल्याला सोडवता येईलच असे काही नाही .आपल्याला जे दिसतं ते कुणाला सांगूनही काही उपयोग नाही , शिवाय यावर कुणाचा विश्वासही बसणार नाही. जे घडायचं ते तर घडणारच ना ? मग उगाच त्याची आळवणी आणि उजळणी कशाला? असं अनेक विचार तिच्या मनात येत राहिले . आत्ता मला हे सर्व सोडून द्यायला हवे . ते एक दुःस्वप्न होते असे सम जून सारं काही विसरायला हवं . या पुढे पौर्णिमेच्या दिवशी कुणाचंही प्रतिबिंब पाण्यात पाहायचं नाही ...अगदी आवर्जून ठरवून पाहायचं नाही ! तिने मनाशीच निर्णय केला ...आणि ती खिडकीबाहेर पाहू लागली .बाहेरचा मोकळा वारा, तिला अजूनच मोकळा श्वास देत होता ...सारं काही मोकळं मोकळं वाटत होतं ..गाडी एव्हाना वेस ओलांडून बरीच दूर निघून आली होती . हा आपल्या जीवनातला बदल मागच्या बदलीपुरताच असावा असं तिला मनापासून वाटत होतं. ❧

# अंधश्रद्धा

भूषण सहदेव तांबे



समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याकरिता आपल्याला आतापासूनच सतर्क रहायला हवे. आपल्याला त्याची सुरवात आपल्या स्वतःपासूनच केली पाहिजे आणि नंतर मित्र, परिवार, नाते मंडळी या सर्वांकडे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्व आपल्याला सर्वात आधी आपल्या पाल्याना सुद्धा समजावून सांगायला हवे. कारण हीच हीच लहान मुले भविष्यातली तरुण पिढी असेल आणि सर्व समाजाचा कारभार त्यांच्याजवळ असेल. ते बोलतात ना लहान मूल म्हणजे मातीचा गोळा आकार द्यावा तशी मूर्ती घडते. तसेच लहान मुलांच्या बाबतीत सुद्धा असते. आपण जसे संस्कार करु तसेच ते आत्मसात करून मोठे होतात. त्यासाठी आतापासूनच आपण त्यांना वैज्ञानिक दृष्टिकोना बद्दल सांगायला हवे आणि अंधश्रद्धा यापासून दूर ठेवायला हवे. रात्रीची नखें काढू नये, कारण पूर्वीच्या काळी दिवे नव्हते. त्यामुळे असे बोलायचे की रात्रीची नखें कापली तर आपल्याजवळ नखाएवढे सुद्धा

प ै स `

राहत नाही. पण याला वैज्ञानिक कारण हे आहे की अंधारात नखें कापली तर आपल्या शरीराला दुखापत होऊन आपल्याला इजा होऊ शकते. आपल्या दारासमोर लिंबू–मिरची लावली जाते कोणाचीही नजर न लागण्यासाठी पण वैज्ञानिक दृष्टिकोन सांगतो की या दोन गोष्टी कीटक नाशकांना घराच्या प्रवेशद्वारा जवळच रोखतात आणि घरामध्ये पॉझिटीव्ह एनर्जी देतात. कारण लिंबूमध्ये सायट्रिक ऍसिड असते. शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विज्ञानाचे जीवनात खूप महत्वाचे स्थान आहे आणि यामुळे आपल्या समाजातील सर्व लोक हे अंधश्रद्धेच्या आहारी न जाता वैज्ञानिक दृष्टीकोन पाहून त्याचा सकारात्म क विचार नक्कीच करतील. आपल्या भारत देशातील अंधश्रद्धा निर्मूलन करणारे थोर व्यक्तिमत्व म्हणजेच डॉ. नरेंद्र दाभोळकर सर यांना समर्पित माझी एक स्वरचित चारोळी.

**सामान्य जनतेलाही आधार**
**डॉ. नरेंद्र दाभोळकरांचा होता,**
**त्यामुळेच तर हा भोळा समाज**
**अंधश्रद्धेपासून खरा दूर होता.!** ❧



mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!



ज्या ठिकाणी समुद्रमंथन घडले, तो भूभाग म्हणजे आताचा इंडोनेशिया ! समुद्रमंथनाचा रवी बनलेला सुमेरू पर्वतही याच भागात आहे. जगातील सर्वात मोठे द्वीपराष्ट्र म्हणजे इंडोनेशिया होय. १७ सहस्रांहून अधिक द्वीप असलेले हे राष्ट्र हिंद महासागर आणि प्रशांत महासागर यांच्यामध्ये १ सहस्र ७०० मैल क्षेत्रात पसरलेले आहे. त्याच्या पूर्वेकडून पश्चिमेकडे जागतिक स्तरावरील १३९ घातक ज्वालामुखी आहेत. प्रत्येक ज्वालामुखीला लाखो वर्षांचा इतिहास आहे. १५ व्या शतकापर्यंत इंडोनेशियात श्रीविजय, मातरम्, शैलेंद्र, संजया, मजपाहित यांसारखे हिंदु राजांचे राज्य होते. जावा बेटावर जावानीस', बाली द्वीपावर बालीनीस' या भाषा जरी असल्या, तरी पूर्वी सर्व लोक संस्कृत भाषेला मातृभाषा मानायचे. त्यानंतर मुसलमानांच्या आक्रमणामुळे येथील भाषा आणि संस्कृती पालटली, तरीही येथील नागरिक आधी हिंदु होते. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनात हिंदु धर्मातील विविध पैलू आढळतात. अशा प्रकारे एकेकाळी जगभर पसरलेल्या हिंदु संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या वतीने सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आग्नेय आशियाचा दौरा केला होता.यावेळी त्यांना अनुभवायला मिळालेली हिंदु धर्माची महत्ता नि हिंदूंचा गौरवशाली इतिहास या माध्यमातून देत आहोत.

# हिंदु धर्माची महत्ता नि हिंदू संस्कृतीचा गौरवशाली इतिहास !

सुनील ओजाळे

**सप्तलोकांच्या संकल्पनेवर आधारलेले आणि प्रगत स्थापत्यशास्त्राचा नमुना असलेले इंडोनेशियातील प्रंबनन् म्हणजेच परब्रह्म मंदिर !**

बांधकामात कोठेही सिमेंटचा वापर न करता विशिष्ट पद्धतीने एकमेकांत कोट्यवधी दगड अडकवून हे मंदिर उभारले गेले आहे. – इंडोनेशियातील योग्यकर्ता या गावातील परब्रह्म मंदिरासाठी कोट्यवधी दगड वापरण्यात आले आहेत. त्या काळी याकरता कोणते तंत्रज्ञान वापरले असेल ?', एवढ्या मोठ्या संख्येने दगड कुठून आणले असतील ?', असे प्रश्न उपस्थित होतात. मार्गदर्शकाला (गाईड'ला) विचारले असता त्याने सांगितले, मागे एक वाहती नदी आहे, तेथून हे दगड वाहून आणले असतील.'' कोट्यवधी दगड आणणे आणि त्यापासून मंदिर उभे करणे, यावरून तेव्हाचे तंत्रज्ञान किती प्रगल्भ असेल', हे लक्षात येते. मंदिराचा परिसर पुष्कळ मोठा आहे, तसेच सर्व मंदिरांचा कळस पुष्कळ उंच आहे. विशेष म्हणजे मंदिरांच्या बांधकामात कुठेही सिमेंटचा वापर झालेला दिसत नाही. सगळीकडे इंटरलॉकिंग' पद्धत आहे. दगड एकमेकांमध्ये विशिष्ट प्रकारे अडकवले आहेत. अशा रचनेमुळे मंदिर खूप सुंदर दिसते. यावरून आपले पूर्वज किती


mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

हुशार होते', असे म्हणणे योग्य होईल.

**नैसर्गिक आपत्तीतही मूर्तीची हानी होऊ नये', अशा प्रकारे केलेली मंदिराची रचना**

येथे शिवस्वरूप असलेला आणि जिवंत ज्वालामुखी असलेला मेरापी' पर्वत आहे. त्यातून सतत राख आणि धूर बाहेर पडत असतो. हा ज्वालामुखी वर्ष १००६ मध्ये जागृत झाला होता. त्या वेळी योग्यकर्ता' या गावाच्या परिसरात भूकंप झाला. त्यामुळे अनेक लहान लहान मंदिरे पडली. त्यानंतर वर्ष १५६३ मध्ये ज्वालामुखीचा उद्रेक होऊन भूकंप झाला, तेव्हाही या मंदिरांना हादरे बसले होते. त्यानंतर वर्ष २००६ च्या भूकंपात पुन्हा तेथील काही मंदिरे पडली. मार्गदर्शकाने (बरोबर असलेला गाईड ) सांगितले की, जेव्हा भूकंपात मंदिराचे शिखर पडले, तेव्हा ते मंदिराच्या गर्भगृहात न पडता दोन्ही बाजूने उन्मळून पडले. त्यामुळे आतील मंदिरातील मूर्तीची कुठल्याही प्रकारे हानी झाली नाही. (छायाचित्र क्रमांक २ पहा) अशा पद्धतीने या मंदिराची रचना केली होती. आपत्काळ आला, तरी देवतेच्या मूर्तीला काही हानी पोहोचू नये', याची जाणीव त्या वेळच्या लोकांना होती. मंदिर पुन्हा उभारता येते; पण मूर्तीत आलेले देवत्व टिकवणे फार कठीण असते', त्याकाळी एवढा व्यापक विचार केल्याचे येथे लक्ष्यात घेणे महत्वाचे आहे.

**ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांचे प्रतीक असलेले आणि विश्वातील अत्यंत जागृत ज्वालामुखी असलेले पर्वत ब्रोमो, सुमेरू अन् मेरापी यांचे दर्शन अन् समुद्रमंथनाच्या वेळी रवीचे कार्य केलेल्या सुमेरू पर्वतातील कार्यरत विष्णुतत्त्वाची आलेली अनुभूती !**

योग्यकर्ता या शहरापासून ५०० किलोमीटर अंतरावर असलेल्या सुराबाया हे इंडोनेशियातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. या ठिकाणी ९९ टक्के मुसलमान लोकसंख्या आहे. सुराबाया पासून १०० किमी अंतरावर असलेल्या सुमेरू पर्वताचे दर्शनघेता येते. इंडोनेशिया म्हणजे जिवंत ज्वालामुखींचा देश ! या देशात एकूण १३० पर्वत आहेत. ते सर्व ज्वालामुखीमुळे निर्माण झालेले आहेत. त्यांतील सर्वात उंच आणि धोकादायक ज्वालामुखीचा पर्वत म्हणजे मेरापी पर्वत, त्यानंतर सुमेरू पर्वत आणि अगुंग पर्वत. मेरापी हा पर्वत योग्यकर्ता शहराजवळ आहे. सुमेरू हा सुराबायाच्या जवळ आहे आणि अगुंग हा पर्वत बाली बेटावर आहे. सुमेरू पर्वताला इंडोनेशियातील हिंदू पवित्र पर्वत मानत असल्याने या पर्वताचे लांबूनच दर्शन घ्यावे लागते.

समुद्रमंथनात रवीचे कार्य ज्याने केले, तो म्हणजे सुमेरू पर्वत !

सुमेरू पर्वताविषयी आपण भागवतामध्ये, तसेच वेगवेगळ्या पुराणांत वाचलेले असते. समुद्रमंथनात रवीचे कार्य ज्याने केले होते, तो पर्वत म्हणजेच सुमेरू पर्वत ! जेव्हा क्षीरसागरातील अमृत मिळवण्यासाठी देव आणि असुर यांना समुद्रमंथन करायचे होते, तेव्हा विष्णु सांगतात, जर आपण हिमालयातील मंदार पर्वत येथे घेऊन आलो आणि त्याला रवी बनवून मंथन केले, तर छान होईल.'' त्याप्रमाणे मंदार पर्वताचा एक भाग येथे आणला गेला. त्या भागालाच सुमेरू पर्वत' म्हणतात. या सुमेरूला धारण करण्यासाठी श्रीमन्नारायणाने कूर्मअवतार धारण केला होता. तेही याच भागात घडलेले असल्यामुळे इंडोनेशियातील विष्णुच्या प्रत्येक मंदिरात सुमेरू आणि त्याखाली कूर्म असलेल्या खुणा आढळतात. समुद्रमंथन याच प्रदेशात घडले असण्याचा आणखी एक स्पष्ट पुरावा म्हणजे इंडोनेशियाच्या एका बाजूला उत्तरेकडे प्रशांत महासागर आहे आणि दक्षिणेकडे हिंदी महासागर आहे. या महासागरांमध्ये समुद्रमंथनासाठी सर्व देवी-देवता आल्या होत्या आणि ऋषिमुनी उपस्थित होते. सर्व दैवी शक्ती या ठिकाणी उपस्थित असल्यामुळे हा सुमेरू पर्वत त्या दैवी उर्जेने भारलेला आहे. आजही सुमेरू पर्वताच्या जवळ ३० कि.मी. परिसरात कोणीही रहात नाही आणि सरकारनेही त्याच्या जवळ सैन्य उभे केले आहे.

**ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांचे प्रतीक असलेले अनुक्रमे ब्रोमो, सुमेरू आणि मेरापी पर्वत !**

सुराबाया या शहरापासून १०० किलोमीटर अंतरावर पर्वतांची मोठी रांग आहे. त्या पर्वतांच्या रांगांमध्ये अनंतगुडंग, अर्जुन, ब्रह्म, सुमेरू असे अनेक पर्वत आहेत. या आठ - दहा पर्वतांमध्ये जो सर्वात उंच पर्वत दिसतो, तो म्हणजे सुमेरू' ! स्थानिक भाषेत ब्रोमो', सुमेरू' आणि मेरापी' असे संबोधले जाणारे हे तीन पर्वत येथील हिंदूसाठी पवित्र आहेत. ब्रोमो म्हणजे साक्षात् ब्रह्मा, सुमेरू म्हणजे श्रीविष्णु आणि मेरापी म्हणजे शिव ! हे तिन्ही पर्वत जगातील सर्वात भयानक ज्वालामुखी आहेत. या तिन्ही पर्वतांचा एकाच वेळी विस्फोट होतो. मेरापी पर्वतामध्ये जेव्हा ज्वालामुखीच्या संदर्भात हालचाल आढळते, तशीच हालचाल अन्य दोन्ही पर्वतांतही आढळते(त्यालासिस्मिकॲक्टिव्हिटी' म्हणतात.) हे तिन्ही पर्वत हे त्रिदेवच आहेत.हे लक्ष्यात घेण्यासारखे आहे.

**पर्वतांतील देवत्त्वाची आलेली प्रचीती - श्री महालक्ष्मी आणि श्रीविष्णु यांची स्तुती गात असतांना विष्णुस्वरूप असलेल्या सुमेरू पर्वताच्या गर्भात विस्फोट होणे.**

सुमेरू पर्वताचे दर्शन घेण्यासाठी आम्ही सुराबायापासून


mpc news.in राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!

रात्री ११ वाजता निघालो. तीन घंटे प्रवास करून पनांजकान’ पर्वतावर पोहोचलो. तेथे थोडी विश्रांती घेऊन पहाटे साडेतीन वाजता आम्ही त्या पर्वताच्या टोकावरून सूर्योदय पहाण्यासाठी गेलो. हे दृश्य पहाण्यासाठी जगभरातून पर्यटक येत असतात. पनांजकान’ पर्वत समुद्र सपाटीपासून १० सहस्र फूट उंच आहे. तेथून आम्हाला सुमेरू आणि ब्रह्म पर्वत यांचे दर्शन होणार होते. बरोबर पहाटे साडेचार वाजता सूर्याचे पहिले किरण पडताच सुमेरूचे आम्हाला पहिले दर्शन झाले. ब्रह्म पर्वताचेही दर्शन झाले.

सुमेरू पर्वतामुळे, म्हणजे समुद्रमंथनातून आपल्याला अमृत मिळाले. श्रीकृष्णाच्या हातातील पांचजन्य शंख, श्रीविष्णुच्या हातातील गदा, स्वर्गातील अप्सरा, कामधेनु गाय, पारिजात वृक्ष, सात मुख असलेला उच्चश्रैवास घोडा, इंद्राचा ऐरावत हत्ती, विष्णूच्या मुकुटात असलेला कौस्तुभ मणी, हलाहल विष (ते नंतर शिव प्यायला), धन्वंतरी देवता, चंद्र, कल्पवृक्ष, शारंग नावाचे धनुष्य, हे सर्व समुद्रमंथनातूनच मिळाले आहे. सर्वात म हत्त्वाचे म्हणजे विष्णुच्या हृदयात असलेली श्री महालक्ष्मीही याच समुद्रमंथनातून आली आहे. त्यामुळे सुमेरू पर्वताचे स्थान हे श्री महालक्ष्मीचे उत्पत्तीस्थानच म्हणायला हरकत नाही. जेव्हा आम्ही सर्वजण श्री महालक्ष्मीचे वर्णन करत होतो आणि विष्णुस्तुती गात होतो, त्याच वेळी सुमेरू पर्वताच्या गर्भात विस्फोट झाल्याचे प्रत्यक्ष अनुभविले.

**ब्रह्म पर्वताखालील हिंदु लोकसंख्या असलेल्या गावांतील परंपरांचे अवलोकन करून त्याठिकाणी संवाद साधण्यात आला.**

सुमेरू पर्वताच्या येथून खाली येऊन नंतर ब्रह्म पर्वताच्या दिशेने प्रवास सुरु केला. या पर्वताजवळ जेवढी गावे आहेत, ती सर्व ९५ टक्के हिंदु लोकसंख्या असलेली गावे आहेत. ते जावानीज’ आणि बाली’ या दोन भाषा बोलतात. त्यांना संस्कृत येत नसले, तरी ते वेद आणि उपनिषदे यांना आपले धर्मग्रंथ म ानतात. त्यांचा धर्म हिंदु असला, तरी ते बाली बेटावरील हिंदूंच्या संप्रदायाप्रमाणे आचरण करतात. त्यांच्याशी संवाद साधल्यावर तेथील अनेकांची नावे आदित्य, सूर्य, नारायण तर कोणाचे नाव विष्णु अथवा कृष्ण असेही असल्याचे समजले. तेथील लोक त्रिदेव स्वरूप असणाऱ्या ब्रह्मा, विष्णु आणि महेश या तीन देवतांची उपासना करतात. हिंदु धर्मातील प्रचलित पद्धतीप्रमाणे धूप दाखवणे, फुले वाहणे, तीर्थ घेणे, अशा वेगवेगळ्या पद्धतींचे आचरण करत आहेत. त्यांच्याकडील गुढीपाडव्याला ते न्येपी’ म्हणतात.

**सहस्रो पटींनी अग्नितत्त्व कार्यरत असलेल्या ब्रह्म पर्वताचे दर्शन घेऊन त्याच्या पायथ्याशी असलेल्या ब्रह्मा, विष्णु आणि महेश या मंदिराचे दर्शन आवर्जून पाह्यासारखे !**

ब्रह्म पर्वत हा इंडोनेशियातील सर्वात जागृत पर्वत आहे. तेथे जागृत ज्वालामुखी आहे. त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष अनुभवता येईल. तेथे चालत किंवा घोड्यावरून जाऊ शकतो. तेथे जाण्यासाठी ६०० हून अधिक घोडे आणि त्यांच्यासाठी चालक आहेत. ब्रह्म पर्वताच्या पायथ्यापासून २५० पायऱ्या चढाव्या लागतात. त्या चढल्यानंतर ज्वालामुखीचे थेट दर्शन होते. एक एक ज्वालामुखी म्हणजे सहस्रो पटींनी कार्यरत असलेले अग्नितत्त्वच आहे. या वेळी सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांनी सर्वांसमवेत केलेली प्रार्थना, हे ब्रह्म पर्वता, हे सुमेरू पर्वता, हे मेरापी पर्वता, तुमच्या उदरामध्ये तुम्ही जो अग्नी साठवून ठेवला आहे, तो कलियुगाच्या शेवटी १०० टक्के जागृत होणारच आहे. तोपर्यंत या कलियुगांतर्गत कलियुगात तुम्ही सर्व साधकांचे, सर्व भक्तांचे रक्षण करा आणि सर्वांभोवती संरक्षककवच निर्माण होऊ दे.

ब्रह्म पर्वताच्या पायथ्याशी ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांचे एक मंदिर आहे. त्याला तेथील लोक पुरा ब्रोमो’ असे म्हणतात. (पुरा म्हणजे मंदिर) या ठिकाणाहून पुष्कळ दूरवर असलेला सुमेरू पर्वत दिसतो. तेथे ७ ते ८ किलोमीटरच्या परिसरात केवळ ज्वालामुखीची राख दिसते. राखेचा डोंगर जसा असतो, त्याप्रमाणेच सुमेरू पर्वत आहे.

**अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असूनही गुरुकृपेनेच जागृत ज्वालामुखी असलेल्या या प्रदेशांतील देवत्व अनुभवायला मिळाल्याविषयी कृतज्ञता !**

सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांनी केलेला दौरा म्हणजे एक प्रकारे दिव्य दौराच होता. जगामध्ये इंडोनेशिया या भूभागाला पॅसिफिक रेंज ऑफ फायर’ म्हणतात. पॅसिफिक रेंज ऑफ फायर’ म्हणजे येथील भूमी दोन भागांत विभागलेली आहे. त्या दोन भागांत अजूनही घर्षण होत असते. या घर्षणाच्या मध्यावर असलेला विश्वातील भूभाग म्हणजे इंडोनेशिया ! या भागात सर्वात मोठे भूकंप, सर्वात मोठे ज्वालामुखीचे स्फोट होतात. भूगर्भातील सर्वाधिक हालचाली, घर्षणे याच भूभागात होतात. येथे आल्यावर कळले की, या दर्शनासाठी भाग्य लागते. बऱ्याच वेळा या ठिकाणी ढग असतात किंवा कडाक्याची थंडी असते. कधी कधी पाऊस पुष्कळ पडतो. त्यामुळे पूर आलेला असतो. तेथे जाताही येत नाही’, अशी स्थिती होते. एका युरोपीय मुलीने सांगितले, तुम्ही तीन मासांपूर्वी येथे आला असता, तर त्याच्या जवळही जाता आले नसते. तुम्ही खरेच भाग्यवान आहात.’’हि सर्व माहिती श्री. विनायक शानभाग यांचेकडून इंडोनेशियाचा दौरा सुरु असताना मिळाली ती संकलन केली आहे.

**इंडोनेशियातील बाली द्विपावरील विविध मंदिरे आणि त्यांचा संक्षिप्त इतिहास**



mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!



इंडोनेशियातील बाली द्विपावर ८७ टक्के लोक हिंदू आहेत. बाली येथील मंदिरांना पूरा' या नावाने संबोधले जाते. त्यांतील पूरा बेसाखी, पूरा तीर्थ एंपूल, पूरा तनाह लोट आणि पूरा उलुवातू ही प्रमुख आहेत. त्यातील पूरा तीर्थ एंपूल, पूरा तनाह लोट आणि पूरा उलुवातू या मंदिरांविषयी आपण जाणून घेणार आहोत.

### १) पूरा तीर्थ एंपूल :
### पवित्र अमृत तीर्थाजवळ असलेले आणि श्रीमन्नारायणासाठी बांधलेले मंदिर आहे.

बालीची राजधानी देनपासर येथून ३५ कि.मी. अंतरावर असलेल्या तंपकसिरिंग गावाजवळ एक मोठे तीर्थक्षेत्र आहे. या ठिकाणी एक मंदिरही आहे. हे मंदिर श्रीमन्नारायणासाठी बांधले असावे', असे म्हणतात. बाली येथील हिंदू या तीर्थाला पवित्र अमृत तीर्थक्षेत्र' मानतात. या तीर्थक्षेत्री स्नान केल्याने चर्मरोग आणि इतर व्याधी दूर होतात', अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे अनेक भाविक या तीर्थक्षेत्री स्नान करण्यासाठी येतात. या तीर्थक्षेत्रापासून ५० मीटर अंतरावर मुख्य मंदिर आणि त्या मंदिराच्या शेजारी मुख्य स्वयंभू तीर्थक्षेत्र आहे.

### २) पूरा तनाह लोट :
### वरुणदेवता अथवा समुद्रदेवता यांच्यासाठी बांधलेले मंदिर


बालीमध्ये ७ सागर मंदिरे आहेत. त्यांपैकी एक म्हणजे तनाह लोट मंदिर'.बालिनी भाषेत तनाह लोट' म्हणजे समुद्र भूमी' असा अर्थ होतो. समुद्र भूमी म्हणण्याचे एक कारण असे की, हे मंदिर समुद्रात; पण भूमीला लागून आहे. बाली येथील हिंदूंचे म्हणणे आहे की, या मंदिराच्या खाली अनेक विषारी नाग आहेत. हे नाग मंदिराचे सतत रक्षण करतात. हे मंदिर निरर्थ नावाच्या एका ऋषींनी वरुणदेवता अथवा समुद्रदेवता यांच्यासाठी बांधलेले मंदिर असावे. हे मंदिर बालीची राजधानी देनपासर या शहरापासून २० कि.मी. अंतरावर आहे. मंदिरात कोणतीही मूर्ती नसून केवळ एक पूजापीठ आहे. याला पद्मासन' असे म्हणतात.

### ३) पूरा उलुवातू :
### रुद्रासाठी बांधलेले मंदिर

बालीची राजधानी देनपासर या शहरापासून दक्षिणेला २० कि.मी. अंतरावर पूरा उलुवातू हे मंदिर समुद्र तटावर आहे. समुद्रसपाटीपासून ७० मीटर उंचीवर असलेल्या एका मोठ्या टेकडीवर हे मंदिर आहे. मंदिराच्या खाली बघितले, तर तीनही बाजूंनी विशाल असा समुद्र आहे. हे मंदिर बाली येथील ७ सागर मंदिरांपैकी एक आहे. हे मंदिर निरर्थ नावाच्या ऋषींनी रुद्रासाठी बांधले असावे', असे म्हटले जाते. याच ठिकाणी निरर्थ ऋषी निर्वाण पावले; म्हणून या ठिकाणी प्रत्येक वर्षी त्यांच्यासाठी एक उत्सव साजरा केला जातो. या मंदिराच्या परिसरात अनेक माकडे आहेत. येथील माकडांविषयी वैज्ञानिकांनी संशोधन केले असून ही माकडे इतर माकडांपेक्षा वेगळी असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या मंदिराजवळ प्रतिदिन संध्याकाळी पर्यटकांसाठी स्थानिक पारंपारिक कचक नृत्याचे सादरीकरण होत असते.'


mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

# 'प्रकाशवाटा, एक आकलन' दिशादर्शक संदर्भग्रंथ




'प्रकाशवाटा: एक आकलन' हा संदर्भग्रंथ प्रा. डॉ. अतुल चौरे यांनी लिहिला असून तो अक्षरवाङ्‌मय प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. हा संदर्भग्रंथ सहा प्रकरणांमध्ये विभागला आहे. या ग्रंथाच्या सुरुवातीलाच आत्मचरित्र संकल्पना व स्वरूप हे प्रकरण दिले आहे. कोणतेही आत्मचरित्र अभ्यासताना आत्मचरित्र संकल्पनेच्या संदर्भात विचार केला जातो. डॉ. अतुल चौरे यांनी तोच धागा पकडून लेखन केले आहे. त्यामध्ये त्यांनी आत्मचरित्र संकल्पनेचे स्वरूप, आत्मचरित्र लेखनामागील लेखकाचा हेतू, आत्मचरित्र या साहित्य प्रकाराची बदलती संकल्पना, चरित्र–आत्मचरित्र–आत्मकथन या संकल्पनातील साम्य, भेद आणि इतर वेगवेगळ्या अभ्यासकांच्या व्याख्यांचा विचार करून आत्मचरित्र संकल्पना स्पष्ट केली आहे. त्यासाठी त्यांनी विविध संदर्भग्रंथांचा वापर केला आहे. त्या संदर्भग्रंथांची क्रमवार यादी दिली आहे. त्यानंतर त्यांनी प्रकाशवाटा' या आत्मचरित्राशी संबंधित असणारा मुख्य भाग सांगितला आहे. त्यामध्ये त्यांनी लोकबिरादरी प्रकल्प निर्मितीची प्रेरणा आणि वाटचाल या प्रकरणाअंतर्गत बाबा आमटे यांनी सुरू केलेल्या लोकबिरादरी प्रकल्पाची वाटचाल सांगितली आहे. तसेच लोकबिरादरी प्रकल्पाच्या निर्मितीचा विस्तृतपणे वेध घेतला आहे. लोकबिरादरी प्रकल्पाचे स्वरूप स्पष्ट करताना आरोग्याला दिशा देणारा दवाखाना, शैक्षणिक विकासाची शाळा, वन्यजीवन संरक्षण प्राण्यांचे गोकुळ, शेती विकास हाच आदिवासींचा विकास, न्याय–निवाडा जातपंचायतीचा, अनाथालय लहान मुलांचे गोकुळ अशा प्रकरणांच्या शीर्षकाखाली 'प्रकाशवाटा' या आत्मचरित्रातील अनेक गोष्टींवर डॉ.अतुल चौरे यांनी नेमकेपणाने भाष्य केले आहे. लोकबिरादरी प्रकल्पाच्या वाटचालीसंदर्भात भाष्य करताना त्यांनी आरोग्य सेवा, शैक्षणिक विकासाची शाळा, शेती प्रकल्प, लोक अदालत, जात पंचायत इतर गोष्टींची सविस्तर मांडणी केली आहे. लोकबिरादरी प्रकल्पाला मिळालेल्या समाजमान्यतेची विस्तृत आणि अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे.

समाजजीवनातील ज्या–ज्या समाजघटकांनी लोकबिरादरी प्रकल्पाची दखल घेतली त्या सर्व संस्थांचा उल्लेख त्यांनी केला आहे. महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारने या कामाची दखल घेऊन दिलेले अनेक पुरस्कार तसेच फिलिपाइन्स या देशाने दिलेला रँमन मॅगसेसे पुरस्कार या सर्व पुरस्कारांबद्दलची विस्तृत माहिती या संदर्भग्रंथात वाचायला मिळते.

**प्रा.डॉ.अतुल चौरे**

या ग्रंथातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे 'प्रकाशवाटा' या आत्मचरित्रात जे समाजदर्शन आले आहे. त्या आदिवासी समाजजीवनाची डॉ.अतुल चौरे यांनी गंभीरपणे दखल घेतली आहे. विशेषत: डॉ.प्रकाश आमटे यांचा नागपूर, चंद्रपूर, बल्लारपूर, अल्लापल्ली आणि हेमलकसा या भागातील जीवनप्रवासाचा सविस्तर आढावा प्रस्तुत ग्रंथात घेतला आहे. हेमलकसा भागातील भौगोलिक परिस्थितीचे चित्रण, आदिवासी बांधवांचा जीवनसंघर्ष त्याचबरोबर प्रकाश आणि मंदाकिनी आमटे यांचा संघर्षमय जीवनप्रवास विस्तृतपणे नोंदवला आहे. तसेच डॉ.अतुल चौरे यांनी त्यावर आधारीत आपले अभ्यासपूर्ण मत नोंदवले आहे. या ग्रंथाच्या शेवटी 'प्रकाशवाटा' या आत्मचरित्राचे वाङ्‌मयीन मूल्यमापन केले आहे. यामध्ये त्यांनी 'प्रकाशवाटा' या आत्मचरित्राचे आशयसूत्र, आत्मचरित्रातून आलेला प्रांजळपणा, प्रकाशवाटामधून आलेल्या विविध व्यक्तिरेखा, आत्मचरित्राची भाषाशैली, निवेदनशैली, स्थळ वर्णन, प्रसंग वर्णन, विविध घटना–प्रसंग त्याचबरोबर 'प्रकाशवाटा' या शीर्षकाची यथार्थता अशा सर्व अंगांनी डॉ.अतुल चौरे यांनी या संदर्भग्रंथात मांडणी केली आहे.

शेवटी 'प्रकाशवाटा' या आत्मचरित्राबद्दलचे काही निष्कर्ष त्यांनी नोंदवले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एस.वाय.बी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी 'प्रकाशवाटा' हे आत्मचरित्र लावले आहे. त्यादृष्टीने 'प्रकाशवाटा: एक आकलन' हा संदर्भग्रंथ संशोधक अभ्यासक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शक व दिशादर्शन ठरेल अशी आशा वाटते.


mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!



दिवाळीचा पहिला दिवा लागता दारी, सुखाचे किरण येती घरी, पुर्ण होवोत तुमच्या सर्व ईच्छा,
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
उन्नति
सोशल फाऊंडेशन
नई सोच.. प्रगति कि ओर..
सौ. कुंदाताई संजय भिसे
अध्यक्षा ,उन्नती सोशल फाऊंडेशन
श्री.संजय तात्याबा भिसे
संस्थापक, उन्नती सोशल फाऊंडेशन
व्हा.चेअरमन यशदा रिएलिटी ग्रुप




शिवसेना
तुमच्यासोबत सदैव असो आनंद, कधी न होवो निराशा...
आम्हा सगळ्यांकडून
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
मा.श्री. विशाल बाळासाहेब यादव
शिवसेना विभागप्रमुख
मा.सौ. मीनल विशाल यादव
शिवसेना नगरसेविका


सर्व ठेवीदार, सभासद, कर्जदार व हितचिंतक तसेच मावळकर नागरिक बंधू-भगिनींना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
आधारस्तंभ
पै. विश्वनाथराव भेगडे नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
नोंदणी क्र. : पी.एन.ए./एम.डब्ल्यु.एल./आर.सी.आर.(सी.आर.)/२८८९/०७/०८
स.नं.४८०६, प्रारंग, पहिला मजला, ज्ञानेश्वरनगर समोर, जिजामाता चौकाजवळ, तळेगाव दाभाडे,
ता. मावळ, जि. पुणे - ४१० ५०६ फोन ०२११४-२२८१८१
श्री.संजय (बाळा) भेगडे
माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
श्री.गणेश कि. भेगडे
संस्थापक
अध्यक्ष, पुणे जिल्हा भा.ज.पा.
श्री.दत्तात्रय पंढरीनाथ नाटक
अध्यक्ष
श्री.प्रकाश दत्तात्रय लोणकर
उपाध्यक्ष
श्री.मंगेश हनुमंत सरोदे
सचिव
श्री.संदीप रघुनाथ शिंदे
खजिनदार
श्री.संदीप गोपाळ वाळुंज
मुख्य व्यवस्थापक
ठळक वैशिष्ट्ये
• सभासद संख्या - ३५७६ • कार्यक्षेत्र - संपूर्ण पुणे जिल्हा • वसुल भागभांडवल - १,१३,१२,७७५.००
• ठेवी - १२,३६,४४,१७३.०० • कर्ज - १०,६५,१४,५३६.०० • खेळते भागभांडवल - १९,१५,६१,२०१.००
• गुंतवणुक - ४,२३,१०,७४३.०० • निधी - १,८५,८२,६२६.०० • नफा - ४७,१९,३३६.०० • ऑडीट वर्ग - सतत अ
संचालक मंडळ
• श्री. अरुण जगन्नाथ भेगडे
• श्री.संतोष किसनराव भेगडे
• श्री.विजय श्रीरंग शिंदे
• श्री. अरुण भगवान भेगडे
• श्री.शरद शंकरराव शेलार
• श्री.मयुर शंकर ओसवाल
• श्री. आनंद मधुकर भेगडे
• श्री.समीर खंडूजी जाधव
• श्री.आशुतोष हरिचंद्र हेंद्रे
• सौ.नंदाताई संजय दाभाडे
• श्री. किशोर दत्तात्रय जाधव
• श्री.राजेश ऋषिनाथ चोपडे
• श्री.विनोद अशोक भेगडे
• सौ.शोभा सुनिल परदेशी
• श्री.सुनील बबनराव भेगडे
• श्री.परुक फ. पस्ताकिया
• श्री.अंकुर रसिकलाल मेहता
• श्री.मनोज सुर्यकांत मेहता
• श्री.भरतकुमार शांतीलाल गदिया
• सौ.ज्योतीताई सुरेश जाधव


जय मल्हार ग्रुप
खंडोबा चौक, वडगाव मावळ
विशाल वहिले
माजी उपसरपंच
वडगाव मावळ ग्रामपंचायत
मंगेश खैरे
प्रभारी
मा. ता. रा.काँग्रेस ओबीसी सेल
अफताब सय्यद
अध्यक्ष
मा.ता.रा.काँग्रेस अल्पसंख्यांक सेल
गणेश वायकर
उद्योजक
माजी अध्यक्ष - जय मल्हार ग्रुप
ओंकार (सोनू) पिंजण
अध्यक्ष
जय मल्हार ढोल - ताशा पथक
सौरभ सावले
अध्यक्ष
वडगाव शहर रा.कॉ.पदवीधर मतदार संघ
दीपावली अभीष्टचिंतन!


दिवे तेवत राहो,
सर्वांचं घर प्रकाशमान होवो,
सर्व स्वप्नं पूर्ण होवो,
हे दिवस असेच झगमगत राहोत,
दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा!
चंद्रजीत वाघमारे
उपनगराध्यक्ष
नगरपंचायत वडगाव मावळ
शांताराम कुडे
अध्यक्ष
वडगाव शहर रा. काँ. ज्येष्ठ नागरिक सेल
ॲड. मिनाक्षी ढोरे
अध्यक्षा
वडगाव शहर महिला रा.काँ.
अक्षय रौंधळ
उपाध्यक्ष
तालुका रा.काँ.पदवीधर मतदार संघ
सौरभ सावले
अध्यक्ष
वडगाव शहर रा.काँ.पदवीधर मतदार संघ


लायन्स क्लब ऑफ पुणे अग्र सफायर
यांच्यावतीने दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
LIONS CLUB OF PUNE AGRA SAPPHIRE
2020-21
लॉ. अशोक अग्रवाल
लॉ. रवींद्र सातपुते
लॉ. भीमसेन अगरवाल
अध्यक्ष
लायन्स क्लब ऑफ पुणे
अग्र सफायर
लॉ. अशोक बंसल
लॉ. नरेंद्र अग्रवाल
लॉ. नितीन गर्ग
मा.श्री. विकास गर्ग
अध्यक्ष
पूर्णानगर विकास समिती




लक्ष दिव्यांनी उजळली निशा घेवूनी नवी उमेद,
नवी आशा होतील पूर्ण मनातील सर्व इच्छा,
दिवाळीच्या तुम्हाला खुप खुप शुभेच्छा...
आमचे मार्गदर्शक व आधार स्तंभ
मा. किशोरभाऊ आवारे
राहुल धामणकर
उद्योजक
प्रदीप नाईक
माहिती अधिकार कार्यकर्ता
जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र भ्रष्टाचार निर्मूलन समिती
SSK GROUP OF BUSINESS
Industrial Material Supplier & Services
Address - A/P-urse ,shankarwadi, Taluka maval, district Pune
SWAMI SAMARTH INDUSTRIES
Our Products : Paper Plates, Paper Cups
Paper Dish, Paper Bowl
DISPO KING




रांगोळीच्या सप्तरंगात सुखाचे दीप उजळू दे...
लक्ष्मीच्या पावलांनी घर सुख समृद्धीने भरू दे...
शुभ दीपावली!
गणेश वसंतराव खांडगे
वरिष्ठ उपाध्यक्ष - पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
मा उपनगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक - तळेगाव दाभाडे नगरपरिषद
संस्थापक - मामासाहेब खांडगे नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
संस्थापक - मामासाहेब खांडगे इंग्लिश मिडीयम स्कूल
उपाध्यक्ष- नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ, तळेगाव दाभाडे.
मा संचालक - महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन.
उपाध्यक्ष - तळेगाव जनरल हॉस्पिटल, तळेगाव दाभाडे.
उपाध्यक्ष - इंद्रायणी औद्योगिक वसाहत, टाकवे मावळ
संचालक - इंद्रायणी विद्या मंदिर संस्था, तळेगाव दाभाडे



स्नेहाचा सुगंध दरवळला, आनंदाचा सण आला...
विनंती आमची परमेश्वराला समृध्दी लाभो तुम्हाला...
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
प्रविण (राजू) सुरेश चव्हाण
नगरसेवक - वडगाव नगरपंचायत, मावळ
माजी उपसभापती - पंचायत समिती,वडगाव मावळ
संस्थापक - मावळ फेस्टीवल


तुमच्यासोबत सदैव असो आनंद,
कधी न होवो निराशा...
आम्हा सगळ्यांकडून
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
कु.आदित्य खंडुजी टकले
▪ सामाजिक कार्यकर्ते
▪ युवा उद्योजक तळेगाव दाभाडे
फर्म - वैशाली सर्व्हिसेस आणि आदित्य सर्व्हिसेस




घेऊन दिव्यांच्या प्रकाश सोनेरी.
माळोनी गंध मधूर उटण्याचा..
करा संकल्प सुंदर जगण्याचा,
गाठूनी मुहूर्त दिवाळी सणाचा...
शुभ
दीपावली
निमित्त सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक :- केदार भेगडे युवा मंच
GRANDUER INFO TECH SERVICES PVT LTD
GOODWILL EVENTS



शिवसेना
पहिला दिवा आज लागला दारी,
सुखाची किरणे येई घरी, पूर्ण होवो तुमच्या सर्व इच्छा
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
मा. श्री. सतीश मरळ-देशमुख
शिवसेना विभागप्रमुख- निगडी, यमुनानगर
मा. श्री. नितीन बोंडे
शिवसेना विभागप्रमुख - रुपीनगर

तुमच्यासोबत सदैव असो आनंद,
कधी न होवो निराशा...
आम्हा सगळ्यांकडून
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
मा. श्री. श्रीरंग (आप्पा) बारणे
खासदार - मावळ लोकसभा मतदारसंघ
मा. श्री. बशीर सुतार
सदस्य - केंद्रीय रेल्वे सल्लागार समिती, पुणे
सौजन्य
• सिएरा झेरॉक्स- आकुर्डी, बिजलीनगर • नागरी सुविधा केंद्र - आकुर्डी





उटण्याचा सुगंध, रांगोळीचा थाट,
दिव्यांची आरास, फराळाचे ताट,
फटाक्यांची आतिषबाजी, आनंदाची लाट,
नूतन वर्षाची चाहूल दिवाळी पहाट.....
शुभ दीपावली!
सुभाषराव पं. जाधव
अध्यक्ष - मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ग्रामीण ब्लॉक
माजी अध्यक्ष - लायन्स क्लब ऑफ कामशेत
विश्वस्त - श्री. पोटोबा महाराज देवस्थान, वडगाव मावळ
निवास - वडगाव मावळ, जि. पुणे. मोबाईल- ९८२२३४९१४९




लक्ष लक्ष दिव्यांनी उजळुन निघो ही निशा
घेऊनि येवो नवी उमेद नवी आशा
शुभदिपावली
सुनील गणेश अप्पा ढोरे
नगरसेवक | संस्थापक अध्यक्ष
नगरपंचायत वडगाव मावळ | सह्याद्री फाऊंडेशन, वडगाव मावळ
शुभ गणेश प्रॉपर्टी, वडगाव मावळ


मा.श्री.श्रीरंग (आप्पा) बारणे
संसद रत्न खासदार,
मावळ लोकसभा मतदार संघ
तुमच्यासोबत सदैव असो आनंद,
कधी न होवो निराशा...
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा.
श्री.राजेंद्र बाळासाहेब तरस
( M.COM,D.T.L,G.D.CA)
शिवसेना


दीप जळत राहो,
तुमचं घर प्रकाशमान राहो,
या दिवाळीच्या सणाला
तुम्हाला सर्व सुख मिळो...
शुभ
दिपावली
विजय वामनराव सातकर
प्रथम लोकनियुक्त सरपंच ग्रुपग्रामपंचायत कान्हे
नायगाव, ता. मावळ, जि, पुणे.


लक्ष लक्ष दिव्यांनी उजळुन निघो ही निशा
घेऊनि येवो नवी उमेद नवी आशा,
सोबत आमच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!
तळेगाव व मावळवासियांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
आशिष विलास खांडगे
अध्यक्ष
राष्ट्रवादी युवक काँग्रेस
तळेगाव शहर
कै.लाडभाऊ सखाराम खांडगे प्रतिष्ठान,
खांडगे परिवार तळेगाव स्टेशन
• खांडगे वॉटर सप्लायर्स
• वैष्णवी एन्टरप्रायजेस
• अंशिका एन्टरप्रायजेस


GRADATIONS
STUDIO
Everyone loves seeing
their childhood memories, Do you?
Capture moments & make memories
for your child (below 10Y).
RS.1000/-
Special offer ONLY for 3months
Let me give you a twist,
You can have a chance to decide
your desired outdoor place!
Near talegaon Dabhade - FREE
Far from talegaon Dabhade - Paid
Contact Now!
8600891141
gradationsstudio@gmail.com

#I_Support_MPCNEWS

तपपूर्ती

mpc news.in

राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!

# तपपूर्ती निर्भिड, निःष्पक्ष व विश्वासार्ह पत्रकारितेची!

## एमपीसी न्यूजला गरज आहे आपल्या 'सपोर्ट'ची! आपण करू शकता 'एमपीसी न्यूज'ला 'सपोर्ट'!

**DONATE**



- mpcnews.in या आपल्या न्यूज पोर्टलवरील कोणतीही बातमी ओपन करा.
- प्रत्येक बातमीच्या खाली असलेल्या 'सपोर्ट एमपीसी न्यूज' या इमेजवर क्लिक करा आणि आपली ऐच्छिक आर्थिक मदत आम्हाला पाठवावी. किंवा
- खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून युपीआय, फोन पे, गुगल पे अथवा पेटीएम द्वारे आपली ऐच्छिक आर्थिक मदत पाठवावी.

UPI UNIFIED PAYMENTS INTERFACE G Pay

9011070006

आपल्याला अधिक दर्जेदार वृत्तसेवा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत



# दुर्ग अभ्यासक, लेखक संदीप तापकीर...

**इतिहास या आवडीच्या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करुन, इतिहासाचा साधार अभ्यास करणारे, इतिहास अभ्यासक. दुर्गभ्रमंती करुन, दुर्गाविषयी अभ्यासपूर्ण माहिती पुस्तक रुपाने प्रकाशित करणारे, दुर्ग अभ्यासक, लेखक. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आपल्या ओजस्वी वाणीने श्रोत्यांसमोर मांडणारे, शिवव्याख्याते अनेक पुस्तकांचे संपादन करणारे, संपादक, मुद्रितशोधक अशा अनेक पैलूने परिचित असणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे संदीप तापकीर...**

**श्रीकांत चौगुले**

आळंदीच्या कुशीत वसलेले चऱ्होली गाव. या गावातील शेतकरी कुटुंबात संदीपचा १९७९ मध्ये जन्म झाला. एकत्रित कुटुंब, शेती हा मुख्य व्यवसाय. संदीपचे वडील मात्र सुशिक्षित, बीए झालेले, आरटीओमध्ये नोकरी करणारे. घराण्यात वारकरी परंपरा, अशा सर्व वातावरणात संदीपची जडण-घडण झाली.

पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. चऱ्होली गावाचा १९९७मध्ये पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेत समावेश झाला. साधारण २००२ पर्यंत गाव इतर खेडेगावांप्रमाणेच होते. संदीपचे माध्यमिक शिक्षण गावातील श्री वाघेश्वर माध्यमिक विद्यालयात झाले. त्यानंतरच्या शिक्षणासाठी पुण्यातील नामांकित एस. पी. कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सुरुवातीला काही वर्ष चऱ्होली वरुन सायकलवर जाऊन ,शिक्षण घेतले. नंतर बसची सुविधा झाली. एस. पी. कॉलेजमधून इतिहास या आवडीच्या विषयात एम.ए. केले. मुळातच मराठी साहित्याची आवड होती. फर्ग्युसन कॉलेजमधून मराठी विषयात एम.ए. केले. शिक्षणाच्या काळात एक खेळाडू म्हणूनही उत्तम कामगिरी केली. लेखनाची आवड होती. त्यातून पत्रकारितेचा कोर्स केला. सुरुवातीला एक वर्ष दैनिक केसरीसाठी पत्रकारिता केली.

शिक्षण सुरु असतानाच आवडीच्या बाबी करत राहणे हा छंद होता. त्यातूनच बारावीची परीक्षा झाल्यानंतर सुट्टीच्या काळात सायकलवर पाली ते सिंधुदुर्ग अशी भ्रमंती केली. साठ दिवसात साठ किल्ले ,असा हा उपक्रम होता. यामध्ये कोकणातील परिचित, अपरिचित अशा ६० किल्ल्यांची भ्रमंती केली. वाचनाच्या आवडीतून गावात ग्रंथालय सुरु करण्याची संकल्पना मांडली. त्याला मित्रांची साथ लाभली. १९९९ मध्ये गावात ग्रंथालय सुरु केले. त्याचे उद्घाटन मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यानिमित्ताने शिवाजी सावंत यांचा परिचय झाला. शिवाजी सावंत यांचा मराठी साहित्यात मोठा दबदबा होता. त्यांची लोकप्रियता खूप होती. वाचकांना त्यांचे नुसते दर्शन झाले तरी धन्यता वाटे. अशा काळात संदीपला त्यांचा तब्बल साडेतीन वर्षे सहवास लाभला, ही खूप महत्त्वाची बाब आहे. शिवाजी सावंत यांना साहित्याची आवड असणाऱ्या एका लेखनिकाची गरज होती. संदीप मधील हे गुण हेरुन त्यांनी त्याला संधी दिली. संदीपचे एस. पी. कॉलेज, तेथून जवळच पर्वती पायथ्याजवळ शिवाजी सावंत राहत असत. त्यामुळे संदीपलाही सोयीचे ठरले. दररोज त्यांच्या घरी जाणे, त्यांनी सांगितलेले कागदावर उतरवून घेणे. या सर्वांमुळे संदीपला एका दिग्गज लेखकाचा सहवास लाभला. लेखनाची शिस्त, लेखनशैली याचा परिचय झाला. त्यांच्यासोबत कार्यक्रमाला जाणे, तसेच त्यांना भेटायला येणाऱ्या विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांचाही सहवास त्याला यानिमित्ताने लाभला. एक आठवण तर अशी आहे. शिवाजी सावंतांच्या वाढदिवसाला अनेक मान्यवर त्यांना शुभेच्छा द्यायला येत असत. एका वाढदिवसाला अभिजात संगीतातील ख्यातकीर्त गायक पंडित जसराज त्यांच्या घरी आले होते. शुभेच्छा आणि इतर गप्पा झाल्यावर, शिवाजी सावंतांसाठी पंडित जसराज यांनी गायला प्रारंभ केला. ही तर एक अनौपचारिक अशी सुरांची मैफल होती. यावेळी शिवाजी सावंत यांच्या घरची मंडळी आणि दोन-तीन इतर श्रोते होते. त्यामध्ये संदीप एक होता. हा अविस्मरणीय प्रसंग होता. अशा अनेक प्रसंगातून संदीपचे जीवन समृद्ध होते गेले, बहरत होते. शिवाजी सावंत यांचा सहवास ही त्याच्या आयुष्यातील मोठी शिदोरी ठरली.

गावात ग्रंथालय सुरु झाले, मग साहित्यविषयक उपक्रम



mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही. कुठेही!

घ्यायला सुरुवात केली. १९९९ मध्ये श्री संत ज्ञानोबाराय एकदिवसीय साहित्य संमेलन आयोजित केले. २००६ पर्यंत दरवर्षी अशी संमेलने आयोजित केली. यामध्ये कविवर्य नारायण सुर्वे, डॉ. सदानंद मोरे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले , इ. महाराष्ट्रातील नामांकित साहित्यिकांचा समावेश होता.


महाविद्यालयीन काळातच दर वर्षी पंढरपूरची पायी वारी करणे, किल्ले भ्रमंती करणे ,लेखन करणे, या आवडीच्या गोष्टी सुरू होत्या. २००४ मध्ये विनोबा भावे यांच्या गीताई निर्मितीला ७५ वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने पवनार ते नागपूर सायकल वारी करण्यात आली. यामध्ये प्रत्येक जिल्ह्यातून एका तरुणाची निवड करण्यात आली होती. पुणे जिल्ह्यातून संदीपची निवड झाली. ही वारी महाराष्ट्राच्या बहुतेक जिल्ह्यातून गेली. या उपक्रमांच्या निमित्ताने तसेच किल्ले भ्रमंती आणि शिवाजी सावंत यांच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने अशा विविध कारणाने महाराष्ट्रभर भ्रमंती करण्याची संधी संदीपला मिळाली.

शिक्षणानंतर संदीपने एका संस्थेत नोकरी सुरु केली. संदीपचे मुळातच शुद्धलेखन उत्तम. त्यातच सावंत यांचा लेखनिक म्हणून काम करताना, लेखन अधिक अचूक व्हावे, म्हणून शुद्धलेखनाचा अधिक अभ्यास केला. त्याचा लाभ नंतरच्या काळात झाला. नोकरी करत असताना साहित्याची आवड स्वस्थ बसू देत नव्हती. त्यातून त्यांनी अनेक प्रकाशनाच्या पुस्तकांसाठी मुद्रित शोधनाचे काम केले. आजवर त्याने सुमारे चारशे पुस्तकांचे मुद्रितशोधन केले आहे. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्य साहित्य, संस्कृती मंडळाने मराठी शब्दकोश निर्मितीचा प्रकल्प सुरु केला. यावेळी शब्दकोश कार्यालयात तब्बल दहा वर्षे काम करण्याची संधी संदीपला मिळाली. मराठी शब्दकोशातील काही खंडांचे सहाय्यक संपादक म्हणून त्याने केलेले कार्य महत्त्वपूर्ण ठरले. गड किल्ल्यांचा अभ्यास, भ्रमंती सुरु होती. यातूनच संपूर्णपणे दुर्ग या विषयाला वाहिलेला अंक सुरू करण्याचे ठरविले. २०१२ मध्ये दुर्गांच्या देशातून हा दिवाळी अंक सुरु केला. त्याला दिवसेंदिवस उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. यामधून परिचित दुर्गाबरोबरच, माहीत नसलेले अनेक दुर्गही लोकांसमोर आले. या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे ,अनेक नवीन लेखकांना, दुर्गभ्रमंती करणाऱ्यांना, संधी दिली गेली. यामधून आत्तापर्यंत सुमारे दोनशे दुर्गांवरचे लेख प्रसिद्ध झाले आहेत.

दुर्गभ्रमंती, दुर्ग अभ्यास, यातून अनेक पुस्तकांचे लेखनही घडले. पुणे जिल्ह्यातील २९ किल्ले, महाराजांच्या जहागिरीतून, सातारा जिल्ह्यातील किल्ले, अपरिचित दुर्गांची सफर, रायगड स्वराज्याची राजधानी. याच बरोबर छत्रपती श्री शिवराय हे शिवाजीमहाराजांवरचे छोटेखानी पुस्तक जिल्हा परिषद शाळांसाठी निवडले गेले आहे. तसेच चला आळंदीला जाऊ, ज्ञानेश्वर डोळा पाहू अशी काही पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. इतिहासाचा अभ्यास ,दुर्गभ्रमंतीचा अनुभव, यावरुन छत्रपती शिवाजी महाराजांवर अनेक ठिकाणी व्याख्याने दिली आहेत. शाळा–कॉलेज ,संस्था, व्याख्यांनमाला अशा सर्वांमधून साधारणपणे चारशे व्याख्याने झाली आहेत.

संदीप सध्या विश्वकर्मा प्रकाशनामध्ये सहसंपादक म्हणून कार्यरत आहे. तेथे विविध साहित्य प्रकारातील, साधारण चाळीस पुस्तकांचे संपादन त्यांने केले आहे .त्याला घरातूनही उत्तम साथ मिळाली आहे. संदीप जसा धार्मिक, सांप्रदायिक आहे. तसाच तो पुरोगामी विचारांचाही आहे .लग्नातील उधळपट्टी, डामडौल त्याला मान्य नाही. म्हणूनच त्यांने स्वतःचे लग्न नोंदणी पद्धतीने केले. त्याची सौभाग्यवती सारिका ही बीएड कॉलेजमध्ये प्राध्यापिका आहे. विविध क्षेत्रात त्याने केलेले कार्य कौतुकास्पद आहे. वयाच्या चाळीशीतच त्याने मारलेली मजल अभिनंदनीय आहे. सध्या त्याचे संभाजी महाराज व राजाराम महाराज यांच्यावरचे संशोधन व अभ्यास सुरु आहे .यावरती त्याला लेखन करायचे आहे. त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा.

पिंपरी–चिंचवड शहरातील, नव्याने विकसित होत असलेल्या, चऱ्होली गावातील एका तरुणाची, विविध क्षेत्रातील कामगिरी नक्कीच कौतुकास्पद आहे. ॐ






mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

सुंदर व्यक्तिमत्व लाभलेल्या, हसऱ्या चेहऱ्याच्या तरीही मनाने कणखर असणाऱ्या, कोणत्याही प्रसंगाला हसतमुखाने सामोरे जाणाऱ्या माझ्या वडिलांविषयी म्हणजे वासुदेव मोतीराम बांदेकर यांच्याविषयी व प्रेम, कर्तव्य, संगोपन, जबाबदारी, ज्ञान, कला यासाठीची आठ आयुधे अष्टभुजा मध्ये घेऊन उभी राहणारी नवदुर्गा. आयुष्यभर कठीण प्रसंग आले तरी चेहऱ्यावर हसू आणि हातात काम असणाऱ्या माझ्या अन्नपूर्णा अशा आई विषयी म्हणजे श्रीमती अनुराधा वासुदेव बांदेकर हिच्याविषयी लिहिताना मला विशेष अभिमान वाटत आहे.



# कल्पवृक्ष कन्येसाठी...

रंजना बांदेकर

आमचे आप्पा मूळचे सावंतवाडीचे. ते तरुण असतानाचे एकदोन किस्से नेहमी सांगायचे. ते जेव्हा सावंतवाडीला राहात होते तो काळ गोवा मुक्ती  संग्रामाचा होता. आप्पा व त्यांचे मित्र गोवा मुक्ती संघटनेने कार्य करत होते. घराच्या तळघरात थंड बॉम्ब बनवत असताना तो आप्पांच्या हातात फुटला व हात आणि मांडी दोन्ही भाजले मित्रांनी औषधोपचार केले पण वडिलांकडून मात्र खरपूस मार मिळाला. दुसरी आठवण म्हणजे विनोबा भावे यांच्याबरोबर त्यांनी केलेले' भूदान 'चळवळीतील काम! विनोबांच्या बरोबर गावोगावी फिरणे लोकांकडून जमिनी गोळा करणे, त्यात आलेले अनुभव हे त्यांच्या तोंडून ऐकणे हा आमच्यासाठी रोमांचकारी अनुभव होता.

आप्पा प्रथम सावंतवाडीला नंतर रत्नागिरीला व त्यानंतर पुण्याला येऊन स्थायिक झाले. पुण्याला आल्यावर साधना मासिकात ते प्रथम काम करत होते हळूहळू पत्रकारितेचे शिक्षण घेऊन त्यांनी लोकसत्ता, लोकमत व संध्याचे मावळचे पत्रकार म्हणून काम करायला सुरुवात केली. मावळात काम करत असताना त्यांच्या लक्षात आले येथून निघणारे असे एकही बातमीपत्र नाही म्हणून त्यांनी लोणावळा टाईम्स नावाचे एक साप्ताहिक सुरु केले. दर शनिवारी ते प्रसिद्ध व्हायचे पण  त्यासाठी पूर्ण आठवडाभर ते रोज पुण्याहून लोणावळ्याला जात असत. लोणावळा टाइम्सचे संपादक या नात्याने त्यांनी एकखांबी तंबू सारखे काम केले. लोणावळा टाइम्स, लोभस दिवाळी अंक अतिशय वाचनीय असायचा. दरवर्षी लोणावळा टाईम्सचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा व्हायचा तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात अनेक मोठे  साहित्यिक येऊन भाषण देत असत. या सर्वांमध्ये त्यांना अनेक लोकांची साथ लाभली होती. पावसाळा आला की मला आठवते ती आमची पावसाळी सहल.  लोणावळा टाइम्स मुळे लोणावळ्यावर आमचे खास प्रेम होते. पाऊस सुरु होताच या सहलीचे वेध लागायचे पुण्याहून सकाळी सातची लोकल पकडून आम्ही नऊ वाजेपर्यंत लोणावळ्याला पोहोचायचं. मग मगनलाल चिक्कीवाल्या मगनलालांच्या घरी जाऊन चहापाणी वगैरे आटपून आम्ही चालत ,भिजत गाणी म्हणत खंडाळ्याच्या राजमाची पॉइंटवर जायचो . तिथे जेवण-खाण आटपून समोरचा नागफणीपॉईंट बघून परत चालत लोणावळ्याला यायचो.  मुसळधार पावसात भिजण्याची, मक्याची कणसे, वडे खाण्याची मजा काही औरच होती. ट्रीपला आई -आप्पा, बहिणी तर असायच्याच पण कधी मामा, आमच्या मैत्रिणी तर त्यांचे मित्र असायचे. जवळजवळ दहा वर्षहा उपक्रम चालू होता .

आम्ही चौघी मुली, घरात पै पाहुण्यांचा राबता असायचा. मित्रमंडळी असायची पण  सर्वांनाच त्यांनी भरभरून प्रेम दिले त्यात सर्वात जास्त साथ दिली ती माझ्या आईने!

नऊ भावंडांचे कुटुंब असणारी, वडील लहानपणीच गेलेले असल्यामुळे तिच्या मावशीकडे राहिलेली अशी माझी आई. मावशीने तिला शिकवले. शिवणकामात पारंगत केले. सातवीनंतर वयाच्या १४ व्या वर्षी चिपळूण जवळील एका खेड्यात १५ किलोमीटर सायकल वर जाऊन तिने एका शाळेत शिवण शिक्षिकेची नोकरी केली. वयाच्या दहाव्या वर्षी ती कशिदा शिकली. बाराव्या वर्षी तिला कशिदा कामाचे बक्षीस मिळाले. आज ती ८७


mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

वर्षाची आहे. तरी तिचे कशिदाकाम चालू आहे. शिवण कामात पारंगत असल्यामुळे तिने वेळोवेळी संसाराला हात भार लावला. त्याकाळी रत्नागिरीत थिएटरमध्ये तिच्या शिवणाची जाहिरात दाखवली जात असे. पदार्थ झटपट व चविष्ट कसे करावेत हे तिच्या कडून शिकावे. आप्पा सकाळी सात वाजता लोणावळ्याला जात असत व दुपारी दीड वाजता जेवायला घरी येत. तेव्हा त्यांच्याबरोबर तीन–चार पत्रकार असत. हॉल मधूनच ते सांगत माझ्याबरोबर यांनाही जेवायला वाढ. अर्ध्या तासात सर्वजण जेवायला बसलेले असत. हे ती कसं करत असेल याचे मला आजही आश्चर्य वाटते. आजही ती युट्युब वर नवीन नवीन रेसिपी बघते व नातवंडांना खायला घालते. म्हणून मी तिला अन्नपूर्णा म्हणते. वडील गेले तेव्हा ती साठ वर्षाची होती. आई वडिलांचा संसार सुखाचा समाधानाचा झाला. पण वडिलांना पैसे साठवायची आवड नव्हती. त्यामुळे तिला परत खंबीरपणे उभे राहावे लागले. तेव्हा तिने पेईंग गेस्ट ठेवले, मुलांना डबे दिले व आपले कार्य पुढे चालू ठेवले. नावातच प्रेम असल्याने सेवा करणे हा तिचा स्थायीभाव आहे. आजारी माणसाची सेवा करण्याचे व्रत जणू तिने घेतले आहे. वयाच्या विसाव्या वर्षी पासून शेजारीपाजारी कोणीही आजारी असले तरीही त्यांच्याबरोबर दवाखान्यात जाते, राहते ,सेवा करते .हे तिचे व्रत वडिलांच्या शेवटच्या आजार पणापर्यंत चालू होते.

असे आई–वडील आम्हाला लाभले आणि त्यांच्याविषयी लिहिण्याची संधी मिळाली, हे माझे मोठे भाग्यच आहे.

# कोरोना नंतरचे बदलते शिक्षण क्षेत्र

भूषण सहदेव तांबे

कोरोना हे नाव जरी घेतले तरी पायाखालची जमीन पूर्णतः सरकते, कारण हा रोग एवढा भयानक आहे की संपूर्ण जगावर त्याचा फार भयंकर परिणाम झाला आहे. संपूर्ण जगात या रोगाने हाहाकार माजवला आणि खूप लोकांचा या रोगाने बळी घेतला. भारतातसुद्धा या रोगाने खूप हाहाकार म ाजवला आणि सर्वच क्षेत्रावर त्याचा परिणाम झाला. शिक्षण क्षेत्र हे देखील त्यास अपवाद नसेल. कोरोनानंतर शिक्षण क्षेत्रात फार मोठे बदल घडून येतील. सुरवातीला ते कठीण असतील पण एकदा काय त्यांची सवय झाली कि ते सर्वांसाठी सोयीस्कर आणि फायदेशीर नक्कीच ठरतील. एनसीईआरटी शाळा उघडण्याच्या नव्या यंत्रणेचा शोध घेतील, तर युजीसी महाविद्यालये आणि विद्यापीठांसह उच्च शैक्षणिक संस्थांसाठी कार्यपद्धती राबवतील. सुधारित आसन व्यवस्था, वेळ बदलणे आणि वर्ग बदलणे यासाठी वेगवेगळ्या विभागांमध्ये वर्ग करणे ही शाळांमधील मुख्य वैशिष्ट्ये असू शकतात. जेव्हा ते कोरोना व्हायरस साथीच्या आजारात पुन्हा उघडले जातील. केवळ शाळा दरम्यानच नाही तर शाळा बस सेवेसारख्या वाहतूक सुविधांवरही सामाजिक अंतर राखले जाणे आवश्यक आहे. एनसीईआरटीकडून या कार्यपद्धतींवर कार्य केले जाईल. एनसीईआरटी शाळा सुरू करण्यासाठी नवीन यंत्रणा शोधत आहे, तर यूजीसी येत्या सत्रासाठी महाविद्यालये आणि विद्यापीठांसह उच्च शैक्षणिक संस्थांची कार्यपद्धती राबवतील. शाळांमधील स्वच्छता, आरोग्यविषयक मापदंड राखण्यासाठी एक टास्क फोर्स तयार करण्यात येईल.

कोरोनाव्हायरसशी संबंधित समस्या हाताळण्यासाठी म हाविद्यालयांना प्रत्येक संस्थेत कोविड –१ सेल तयार करण्यास सांगितले आहे. युजीसीने असे सांगितले आहे की ऑगस्टमध्ये नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी नवीन बॅचचे वर्ग सप्टेंबरपासून सुरू होतील, परंतु शाळा पुन्हा कधी उघडल्या जातील याविषयी स्पष्टता नाही. लॉकडाऊन नंतर शाळा पुन्हा सुरू होईल शाळा प्रशासन आणि शिक्षक शाळा पातळीवरील सर्व भागधारकांच्या विशिष्ट भूमिका व जबाबदाऱ्या निश्चित करणे, परिभाषा व स्थापना यासारख्या

विविध कामे पार पाडतील. आरोग्य आणि स्वच्छता आणि इतर सेफ्टी प्रोटोकॉल किंवा मानक ऑपरेटिंग प्रक्रिया (एसओपी) शाळा पुन्हा सुरू करण्यापूर्वी आणि नंतर, शाळा कॅलेंडर आणि वार्षिक अभ्यासक्रम योजनांचे पुनर्निर्धारण किंवा सुधारित करणे, लॉकडाऊन दरम्यान औपचारिक शालेय शिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांचे सहज संक्रमण सुनिश्चित करते. विद्यार्थ्यांचे भावनिक कल्याण सुनिश्चित केले जाईल. शाळा कुठल्याही गोष्टीची कमतरता गमावू नये यासाठी चेकलिस्ट तयार करतील. सीबीएसई चेकलिस्ट त्यांच्या सामायिक करतील. कोरोनाव्हायरस विरूद्ध लढा देण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आरोग्य सेतू अँप डाऊनलोड करुन कोरोनव्हायरसशी संबंधित ताजी माहितीवर अद्ययावत रहाण्यास सांगितले जाईल. कोरोनव्हायरस प्रेरित लॉकडाऊनमुळे मार्च आणि मध्यभागी शाळा आणि महाविद्यालये बंद आहेत. शिक्षकांना ऑनलाइन पद्धतीने घरातून शिकवण्यास सांगितले गेले आहे. त्यांना विविध पद्धतींनी ऑनलाईन शिकवणी चालू ठेवण्याचे आवाहन केले जाईल. आपण या परिस्थितीला संधीप्रमाणे मानले पाहिजे आणि डिजिटल पायाभूत सुविधा बळकट केल्या पाहिजेत. भारतीय शिक्षण क्षेत्र हळूहळू ऑनलाइन वर्गाची कल्पना स्वीकारत आहे कारण यासारख्या संकटाचा हा सर्वोत्तम उपाय आहे. जर मोबाईल, संगणक किंवा लॅपटॉप आणि मूलभूत इंटरनेट कनेक्शनसह सहाय्य केले तर विद्यार्थी जिथे आहेत तेथून वर्गात येऊ शकतात.

**कठीण काळ सर्वांवर आला खूप काही त्याने शिकवले,**
**अमुलाग्र हे बदल जोपासू यातच आता सर्वांचेच भले.!**


mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!




## सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

नमस्कार गेली १२ वर्षे आम्ही mpcnews.in वर व पिंपरी चिंचवड अंतरंगसाठी ११ वर्षे राशी भविष्य लिहित आहोत. असो ज्योतिषशास्त्राच्या विविध अंगांचा विचार करून आम्ही वार्षिक राशी भविष्याचे लेखन केले आहे. प्रत्येक ग्रहाचा मानवी जीवनावर परिणाम होत असतो व प्रत्येक ग्रहाची गती कमी-जास्त असल्यामुळे आपण जास्त काळ एका राशीत राहणाऱ्या ग्रहाचा परिणाम कसा होईल, त्यांचे विवेचन राशी व नक्षत्रानुसार केले आहे. ग्रहांची मानसिकता शास्त्र व राशीप्रमाणे बदलते. काही ग्रह जगणे नकोसे करणारे वाटतात, परंतु तेथे ग्रह थोड्या कालावधीनंतर आनंद देणारे ठरतात. सर्वसामान्य व्यक्तीचे जीवन हे कुटुंब, मित्र परिवार व नोकरी व्यवसाय यांनी व्यापलेले असते. यात काही शुभ घटना घडल्या की मनुष्य आनंदी होतो. परंतु अप्रिय घटना घडल्यास मनुष्य दु:खी होतो. असो, आम्ही वार्षिक राशी भविष्य लिहिताना प्रमुख अंगांचा जास्त विचार करून लिखाण केले आहे. तसेच उपासना ही या वर्षीच्या ग्रह गोचरीनुसार प्रत्येक राशीस सुचवली आहे. तसेच प्रत्येक राशीला शुभ रंग, भाग्य रत्न, शुभदिनांक व शुभकारक वयावर्षे आम्ही सुचविलेली आहेत. या सर्व गोष्टींचा सारासार विचार करून निर्णय घेतल्यास आपले कार्य सिद्धीस जाईल, असे वाटते.



ज्योतिष भास्कर :
**उमेश स्वामी**
(ज्योतिष व वास्तू सल्लागार)
केशवनगर, कासारवाडी,
पुणे ४११०३४.
मोबाईल - ९९२२३१११०४.

(राशी  भविष्य पाहताना लग्न राशी, चंद्रराशी व रवि राशी यांचा विचार करावा. लग्न राशीवरून व्यक्तीमत्व विचारात घ्यावे. आरोग्यचा विचार करावा, चंद्र राशीवरून मानसिक सौख्य व रविराशी वरून नोकरी व्यवसाय व सामाजिक यांचा विचार करावा.)

## मेष : यशकारक वर्षे राहील



राशी चक्रातील मेषरास ही पहिली रास असून साहसी आत्मविश्वास पुरुष स्वभावी रजो गुणांनी परिपूर्ण भरलेली रास आहे. ह्या राशीचे चिन्ह मेंढा हे असून अग्नी तत्वाची रास असून शूर व करारी व्यक्तिमत्वाची गुण आपल्या राशीत आहेत. प्रत्येक क्षेत्रात तडफदार व आत्मविश्वासाने काम करण्याचा आपला स्वभाव आहे. काम करताना आपले उसळणारे तारुण्य ओसंडून जाणारा उत्साह धैर्याने व तेजाने पराक्रम करून आपल्या क्षेत्रात चमकणारी आपली रास आहे. संकटकाळी न घाबरणारी व शेवटच्या क्षणापर्यंत उत्साह टिकून ठेवणारी आपली क्रियाशीलता, हे गुण प्रकर्षाने जाणवतात. प्रचंड इच्छाशक्ती, मनोग्रह व स्वातंत्र प्रेम असणारी व्यक्ती आपण आहात. 'अशक्य' हा शब्द आपल्या शब्दकोषात नसतो.

आपल्या व्यक्तिमत्वात अपूर्व ताकद आहे. आपली मते व विचार सदैव गतिमान वेगवान त्वरेने काम करणारे असल्यामुळे नेतृत्वचे काम आपल्याकडे चालून येते. नमते घेणे, माघार घेणे आपणास सहसा जमत नाही. अपयश जर आलेच तर स्वस्थ बसून राहणार नाही. परत जोमाने कामाला लागता. तर मेष राशीमध्ये अश्विनी भरणी व कृतिका ही नक्षत्रे येतात.

मेष रास अश्विनी नक्षत्र जातकाची व्यक्तीमत्व व चतुर्थ, सौंदर्य, प्रेमी, धाडसी महत्वाकांक्षी, अधिकारपदाची लालसा असणारी, रोगप्रतिकारक शक्ती उत्तम असणारी सतत नवनवीन गोष्टी शिकणारी, तेजस्वी संशोधक व शास्त्रज्ञ असतात.

भरणी नक्षत्रामधील व्यक्तीमत्व  वाचाळ, भाग्यवादी, भोजनप्रिय, काहीवेळा दृढ निश्चयी व कठोर सुंगधी वस्तूची आवड असणारी तर कृतिका नक्षत्रमधील व्यक्तीमत्व तेजस्वी विद्वान चतुर व राजासमान आचरण, स्वाभिमानी गुरु गोष्टीत आवड असणारी चलाख व क्रोधी असते.

**तर अशा मेष राशीचे चालू वर्षे कसे राहील ते पाहू.**

मेष राशीच्या दशम स्थानातून व लाभातून गुरुचे भ्रमण होत असून तरुणांना नवीन नोकरीच्या संधी प्राप्त होती. नोकरदारांना प्रमोशन मिळेल. राजकीय/सामाजिक क्षेत्रात यश मिळून निवडणुकीत विजय मिळेल. विशिष्ठ उत्तम सहकार्य या वर्षात राहील. घरातील मोठ्या व्यक्तीचा आशीर्वाद मिळेल. नवीन वाहन व घर खरेदीसाठी कालखंड उत्तम राहील. समाजात मान/ सन्मान/प्रतिष्ठा वाढेल. शिक्षण व अध्यात्म यामध्ये आवड निर्माण होईङ. हाताखालील लोकांचे सहकार्य उत्तम राहील. नोकरीमध्ये बदल, घराजवळ बदली अशा घटना अनुभवास येतील. शत्रूंचा उपद्रव कमी होईल. तर शनिचे भ्रमण हे ही आपल्या दशम स्थानातून होत असून उद्योग व्यवसायात स्थैर्य वाढवणारा काळ राहिल. नोकरीमध्ये प्रमोशन बढती चांगले बदल येतील. मोठ्या पदाची प्राप्ती होईल. मात्र वरिष्ठ व्यक्तीशी बोलण्यातून ताण तणाव वाढेल. व्यापारात चांगला फायदा होईल. जुनी येणी वसूल होतील. मित्राचे सहकार्य उत्तम मिळेल. जुन्या घरांचे नूतनीकरण कराल, कोर्टकचेरीच्या कामाता यश मिळेल. वृद्ध व्यक्ती, राजकीय व्यक्ती, वकील यांच्याकडून महत्वाची कामे मार्गी लागतील. तर राहू केतूचे भ्रमण हे धन स्थान व अष्टम स्थानातून होत असून राहू हा अचानक धनलाभ देईल पण कौटुंबिक मतभेद ही देईल. खाण्यापिण्याचे पथ्यपाणी पाळावे लागतील. वडीलोपार्जित प्रॉपर्टी /वारसा हक्क यामध्ये कामात अडथळे डोळ्याचे/दाताचे दुखणे याकाळात संभवते. प्रवास जपून करावे लागतील.

हर्षल आपल्या राशीतून नेप्च्यून आपल्या लाभ स्थानातून व प्ल्यूटो आपल्या नवम व दशम स्थानातून भ्रमण करणार आहे. एकंदरीत सामाजिक जीवनात यश मिळेल. नावलौकिक वाढेल. मोठे प्रवास व व्यवसायात अधिकार मिळेल.

**उपासना :** गणपती उपासना, मारूती उपासना केल्यास अनूकूल राहील. व त्याचबरोबर 'रुद्र अभिषेक, प्रदोष व्रत हे केल्यास उत्तम राहील.

**शुभरंग :** लालसर, गुलाबी, पिवळा, डाळींबी रंगाचा वापर केल्यास उत्तम राहील.

**भाग्यरत्न :** पिवळ्या रंगाचा पुष्कराज धारण केल्यास उत्तम राहील.

**शुभदिनांक :** कोणत्याही महिन्याचा ०१, ०८, ०९, २७.

**शुभकारक वर्षे :** १२,१५,२१,३०,४८,५८,६२,६९.

## वृषभ : वाटचाल यशाकडे हे निश्चित



ही राशीचक्रातील द्वितीय रास असून स्त्री स्वभावी पृथ्वी तत्वाची स्थिर प्रवृत्तीची रास आहे. सौंदर्य, तेजस्वी दिर्घ उद्योगी बोलण्यात लाघवीपणा जबरदस्त आशावादी जगातील सर्व सुख सोयीची लालसा बाळगणारी, हुशार असा स्वभाव असतो. वृषभ राशीच्या स्त्रिया खूप सुंदर व हुशार असतात. या राशीच्या व्यक्तींना नवनवीन कपडे, शोभिवंत वस्तू, वाहन घर, यांची आवड असते.

मैत्रीला, शब्दाला आपण अनुसुरून असता. आपण घेतलेल्या निर्णयाला कमालीचे तत्वप्रधान असता. आपण सहनशील व सोशिक आहाता, गोड आर्जवी व प्रिय बोलण्यामुळे आपण


mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

सर्वांना हवे हवेसे वाटता. आपण रसिक आहात. साहित्य, कला, संगीत, नाट्य, चित्रपट यांची विशेष आवड वृषभ राशीला संसार प्रिय राशी म्हणतात. आपणास मित्रमंडळी खूप असतात. सेवा करणे, नोकरी करणे याकडे आपला जास्त कल असतो. कोणत्याही संस्था, समूह, ट्रस्ट चे व्यवस्थापन आपण उत्तम प्रकारे सांभाळता. आपला स्वभावव सर्वत्र निर्मोही व निरपेक्ष बुद्धीनी काम करून घेणे याकडे जास्त कल असतो. आपणाकडे व्यवहार कुशलता, व्यापारी कला व आर्थिक मूलमापे योग्य समजलेले असते आपणात हट्टीपणा व सृफशक्तीचा वावर आपल्या स्वभावात आढळतो. कुठल्याही अडचणीवर या व्यक्ती उपाय शोधतात तर वृषभ राशीमध्ये कृत्तिका रोहिणी, व मृग ही नक्षत्रे येतात. वृषभ रास कृत्तिका नक्षत्राचा जातक आर्थिक सुबकता, असणारा चतुर, विद्यागुणयुक्त, स्वाभिमानी, राजेशाहीची आवड असे साहसी दुसऱ्याचे कौतुक करणारे व गर्विष्ठ व हट्टी असते.

तर वृषभ रास : रोहीणी नक्षत्र या व्यक्ती मधुर वचनी पवित्र आचरण खरे बोलणारे, शांत सत्वगुणी, स्थिर बुद्धी, सौंदर्य व आकर्षक व्यक्तीमत्व असते. ही माणसे विलासी, श्रीमंत, व्यापारी व प्रेमळ असतात. काही व्यक्ती कलावंत असतात. तर वृषभ रास मृग नक्षत्राच्या व्यक्ती चंचल उत्साही चंचल मनाच्या, भित्र्या, भूमी वाहन, याचे सुख भोगणारी असतात. या नक्षत्राच्या व्यक्तींना काही वेळा शेती खूप आवडते. तर वृषभ राशीचे चालू वर्ष कसे राहील ते पाहू.

वृषभ राशीच्या भाग्य व दशम स्थानातून गुरुचे भ्रमण जाणार असून प्रगतीचे नवे मार्ग सापडतील. शिक्षक, सल्लागार व गुरुजन व्यक्तीचे मार्गदर्शन मिळेल. नावलौकीक व प्रसिद्धी मिळेल. धार्मिक कार्य, मंगल कार्य घरात घडतील. पुरस्कार व पदवी विद्यार्थी वर्गाला यश मिळेल. तीर्थयात्रा घडतील उपासनामध्ये मन रमेल. धार्मिक व शिक्षणासाठी आवड निर्माण होईल. उच्च शिक्षणासाठी किंवा परदेशी शिक्षण कोर्स यामध्ये यश मिळेल. कर्जातून मुक्तता होईल. उत्पन्नात वाढ झाल्याने खर्च कमी झाल्यासारखे वाटेल. नातेवाईक़ यांच्याशी संबंधामध्ये मधुरता येईल. कलाकार / साहित्य/खेळाडू यांना यश प्रसिद्धी मिळेल. शेअर्स व्यवसायामध्ये पैसे मिळतील व गुंतवणूक होईल. प्रेमविवाह यशस्वी होतील तर शनिचे भ्रमण आपल्या भाग्य स्थानातून होत असून आरोग्याच्या तक्रारी हळूहळू कमी होतील.

कौटुंबिक समस्यांमधून मार्ग मिळेल. विद्यार्थीवर्गाला उच्च शिक्षणासाठी संधी प्राप्त होईल. नोकरदार वर्गाला नवीन नोकरी / प्रमोशन नवीन काम मिळेल. निवडणूकीमध्ये यश मिळेल. ज्येष्ठ व्यक्तीकडून मदत व लाभ होईल.

वरिष्ठ व्यक्तीची आपणावर कृपा होईल. मात्र मित्रपरिवार दुरावेल. भावंडे व छोट्या प्रवासात हानी संभवते व जुनी येणी वसुल करण्यासाठी त्रास होईल. राशीच्या मधून राहुचे व जतन व जानातून केतूचे भ्रमण होत असून मानसिक दबाव वाढेल. भीती वाढेल. मोठे निर्णय घेताना योग्य व जाणकार व्यक्तीचे मार्गदर्शन योग्य राहील. जोडीदाराशी मतभेद वाढतील. वैवाहिक सौख्यात अडचणी निर्माण करणारा कालखंड राहील. भागीदारीतील व्यवसाय अडचणी वाढतील अथवा ते व्यवासयात खंड पडेल. मात्र कोर्टकचेरीचे कामे पार पडतील. या काळात मन सतत चंचल राहील.

राशीच्या व्ययस्थानातून हर्षल, दशमात नेप्च्यून व भाग्यात प्ल्यूटोचे भ्रमण राहणार असून. आर्थिक स्थिरता वाढेल. मोठे लाभ होतील. वारसा हक्क / प्रॉपर्टीची कामे होतील. विद्यार्थी वर्गाला शिक्षणात यश, कुटुंबात वृद्धी होईल. मेहनतीचे चीज होईल.

**उपासना :** आपण महालक्ष्मी उपासना केल्यास उत्तम राहील. त्याचबरोबर, हनुमान मंदिरामध्ये चमेलीचे तेल / लाल कापड / व लाल पदार्थ दान केल्यास उत्तम राहील.

**शुभरंग :** हिरवा, पांढरा.

**भाग्यरत्न :** निलम व डायमंड या रत्नाचा वापर केल्यास उत्तम राहील.

**शुभ दिनांक :** कोणत्याही महिन्याचा ६, १५ , २४.
**भाग्यकारक वयोवर्षे :** १७, २८, ३५, ४४, ५३

## मिथुन : यशाच्या मार्गावर

मिथून राशी चक्रातील ही तिसरी रास असून वायू तत्वाची



ही स्वभावी उत्तम स्मरण शक्ती असणारी बौद्धीक कामे बुद्धी चातुर्याने करणारी संगीत, कलाक्षेत्र यामध्ये विशेष आवड असणारी सतत प्रवासाची आवड असणारी बुद्धीप्रधान रास असून वाचन, चिंतन, मनन, संशोधन, व्यासंग याबद्दल आपली ख्याती असते. प्रसंगावधान, संयम, सूचकता, हजरजबाबी चातुर्य हसत हसत दुसऱ्यावर टीका करणारी व वकिलास लागणारी गुणवैशिष्ट्य आपणाकडे असतात.

अनेक भाषांवर आपले प्रभुत्व असू शकते. चर्चासत्रे, प्रवचने, वृत्तपत्रे, बौद्धीक चळवळी ही आपल्या आवडीची खरी खुरी क्षेत्र आहेत. आपल्या जीवनात विचाराचा चढ उतार असतो. आपल्याला खेळामध्ये बुद्धीवादी खेळ आवडतात. आपण नेतृत्वाचे सल्लागार म्हणून आपणास जास्त काम करण्यास आवडते. जगात नवनवीन काय चालले आहे याचे कुतुहलाने आपण शोध घेता. साहित्य, काव्य, नाट्य या गोष्टी आपणास मनापासून आवडतात. आपले शस्त्र म्हणजे आपले शब्द आपण आपल्या बोलण्याचा पद्धतीमुळे आपणास इतर राशीच्या व्यक्तीपेळा वेगळी असते. मिथुन राशीमध्ये मृग, आद्रा, व पुनर्वसू ही नक्षत्र येतात.

मिथुन रास व मृग नक्षत्र यामध्ये व्यक्तीचा स्वभाव धार्मिक यात्रा, धनयुक्त, साहसी विवेकी वाहन व भूमी यांचा उपभोग प्राप्त


mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

करणारी व्यक्ती असते. तसेच हुशार विद्वान, गतिशील उत्साही व पराक्रमी असते. तर मिथुन रास आर्द्रा नक्षत्रमधील व्यक्ती, उग्र स्वभावाची, चंचल मनाची, क्रोधी, संशयी असतात. हे लोक हिंसक, कृतघ्न स्वभावात कठोरपणा व गुढ विद्येची आवड यांची विद्या व बुद्धी तीक्ष्ण असते. तर मिथुन रास पुनर्वसू नक्षत्रमधील व्यक्ती व्यवहार कुशलता, विद्वान व कोमल माणुसकी जाणारा साहित्यप्रेमी, सौम्य व संतोषयुक्त मनाचा कला कौशल्य संपन्न लोकसेवा करणारी, ईश्वर भक्त, गायन कलेत पारंगत अशा गुणांनी युक्त असतात. तर अशा मिथुन राशीच्या व्यक्तीचे चालू वर्षे कसे राहिल ते पाहू.

मिथुन राशीच्या अष्टम स्थानी गुरु चे भ्रमण व ५ एप्रिल २०२१ नंतर भाग्य स्थानी असून, आपल्या आर्थिक स्थितीमध्ये फार मोठा बदल होईल. वारसा हक्काचे प्रश्न मार्गी लावावे लागतील. कुटुंबामध्ये वृद्धी व चांगल्या सुधारणा घडतील. पैशाची कामे मार्गी लागतील. मात्र मनाप्रमाणे लाभ होणार नाहीत. मित्र व ओळखीच्या व्यक्तीकडून मदत मिळेल. मोठे प्रवास / विमान प्रवास घडतील. वाहन, घर, प्रॉपर्टी खरेदी होईल. मोठे कर्ज मंजूर होईल. घरात धार्मिक व मंगल कार्य घडेल. मात्र या वर्षी विद्यार्थी वर्गाला विशेष मेहनत घ्यावी लागणार आहे. संघर्षातून परिक्षेत यश मिळेल. ज्येष्ठ व्यक्तींना संतती बद्दल चिंता वाढेल.

शारिरीक मेहनत वाढेल. नोकरी व्यवसायात श्रम वाढतील. कष्आने यश मिळवावे लागेल. तर अष्टम स्थानातून शनिचे भ्रमण होत असून वैवाहिक जीवनातील समस्या पासून त्रास कमी होईल. कोर्ट कचेरी व कायदेशीर कामातील समस्यांचे निराकरण आपल्या मनाप्रमाणे होईल. पेन्शनर व व्यवसायात मनासारखे बदलल हे मे, २०२१ नंतरच होतील. नवीन संधी उपलब्ध होताना जुळते घ्यावे लागेल. विद्यार्थी वर्गाला व ज्येष्ठ व्यक्तींना उशीराने अथवा शेवटच्या क्षणी चांगले यश मिळेल.

अपेक्षित ठिकाणी यश, प्रवेश व इतर कामे ही स्त्रीवर्गाकडून व ज्येष्ठ व्यक्तींकडून पूर्ण होतील. मिथुन राशीच्या व्यय व षष्ठस्थानातून राहू केतूचे भ्रमण होणार आहे. यामुळे अनावश्यक खर्च वाढतील. कर्जाचा त्रास प्रवासात गोंधळ / मनस्ताप होईल. प्रवासात वस्तूंची चोरी अथवा नुकसान होईल. मात्र हिशत्रूंवर विजय प्राप्त होईल. नोकरीमध्ये बदल संभवतो. सेवा निवृत्ती अथवा नोकरीमध्ये बदली नको असल्या ठिकाणी होईल. तर हर्षलचे भ्रमण लाभातून भाग्यातून नेपच्यून व अष्टमातून प्ल्यूटो चे भ्रमण होत असून शेअर्स व्यवसायात फायदा होईल. अचानक मोठे लाभ, वादविवादमध्ये व कोर्टकचेरीमध्ये आपली सरशी होईल. विद्यार्थी वर्गाला परिक्षेच्या वेळी सावध रहावे लागेल. ऐनवेळी गोंधळ / मनस्ताप संभवतो. मात्र उपासकांना चांगले अनुभव येतील. शुभ व सूचक स्वप्ने पडतील. एकंदरीत हे वर्ष संघर्षाचे असले तरी यश तुमचेच आहे.

**उपासना :** विष्णू, राधा-कृष्ण यांची उपासना केल्यास उत्तम राहील. तसेच दर गुरुवारी हरभरा डाळ व पिवळे वस्त्र व सप्त धान्य मंदिरात दान केल्यास उत्तम राहील.

**शुभरंग :** चमकदार पोपटी, फिकट गुलाबी.

**भाग्यरत्न :** पाचू हे रत्न वापरल्यास उत्तम राहील.

**शुभदिनांक :** कोणत्याही महिन्याच्या ५,१४,२३

**भाग्यकारक वयोवर्षे :** १७, २३, ३५, ४४ , ५३, ६२

## कर्क : व्यवसायाच्या दृष्टीने प्रगतीची



कर्क रास राशीचक्रातील चौथी रास असून जलतत्वाची स्त्री राशी आहे. या राशीवर चंद्राचे स्वामीत्व आहे. त्यामुळे त्या ग्रहाच्या गुणधर्मानुसार संवेदनशीलता संस्कारक्षम, सात्विक, शांत व एकांतप्रिय, लोकप्रिय, राजकारणाची आवड, धर्मात्मा व चंद्र ग्रहाचा अंमल आपल्या राशीवर असल्यामुळे आपल्या स्वभावात चढ उतार हा आल्यास आपण व्हहारी आहात. काटकसरीपणा आपल्यात आहे. संसार-प्रपंच यशस्वी होण्यासाठी लागणारे जे गुण असतात ते आपल्याकडे आहेत. काल्पनिक विश्व, आपल्या भावनांचा आपल्या मनावर बसत असल्यामुळे ज्या प्रवाहाबरोबर असता त्या प्रवाहाशी जुळते घेता. आपले मन सतत अस्थिर चंचल असून या राशीचे चिन्ह खेकडा हे आहे. त्याप्रमाणे आपण एखाद्या ध्येयाला, विचाराला एकदा चिकटून राहण्याचा कल आपल्या स्वभावात आहे. आपण सर्व पंथांच्या व्यक्तींना सामावून घेण्याचा कल असतो. जात, धर्म, पंथ हा विचार बाजूला ठेवून सर्व स्तराच्या व्यक्तमींशी आपले मैत्रीपूर्वक संबंध असतात. आपण कधी कठोर अथवा कोमल हा गुण जाणवतो. आपल्या स्वभावात सात्विकता आहे. आपण एखाद्या व्यक्तींची नेयाची अथवा साधू संतांची मनोभावे पूजा अथवा निष्ठा ठेवून काम करता. आपली ग्रहणशक्ती व कल्पना शक्ती चांगली असून परिस्थितीशी आपण मिळते जुळते घेवून वेळ मारून नेता. त्यामुळे आपल्या गतीमान पद्धतीमुळे आपल्या व्यक्तीमत्वामध्ये एक भारदस्त वलय निर्माण होते. आपणाकडे अफाट यश खेचून आणण्याची ताकद आहे. त्यामुळे आपण लोकप्रिय होत असता. कर्कराशीमध्ये , पुनर्वसू, व पुष्य आणि आश्लेषा ही नक्षत्रे येत असतात.

कर्क रास : पुनर्वसू नक्षत्र असणाऱ्या व्यक्तीचा स्वभाव ईश्वरावर श्रद्धा असणारा, स्वत:चे विचार मांडणारा धर्मशील, कायदे पंडीत यांचा आत्मविश्वास चांगला असतो. कर्करास पुष्य नक्षत्र असणाऱ्या व्यक्तीचे पाठ करणारे, बुद्धीमान, भाऊ बहिणीमध्ये लाडका असणारा, राजप्रिय घरामध्ये एकत्र कुटुंबात राहणारा असतो. तर कर्करास आश्लेषा नक्षत्रामध्ये हया नक्षत्राचे व्यक्ती परिणामाची चिंता न करणारे, काही वेळा विश्वासू नसणारे, क्रोधी, कृतघ्न, धूर्त अनेक भाषांचे ज्ञान असणारे वैभवाची इच्छा करणारे राजकारणी साहसी धूर्त, अभिमानी,

स्वातंत्र्य प्रिय असतात. तर अशा कर्क राशीच्या व्यक्तीचे चालू वर्ष कसे राहील ते पाहू.

राशीच्या सप्तम व अष्टम स्थानातून गुरुचे भ्रमण होणार असून पूर्वार्ध अनुकूल स्थितीमध्ये विशेषकरून भागिदारीतील घटनामध्ये शुभ राहील. कोर्टकचेरीमधील निर्णय मनासारखे होतील. स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी कालखंड उत्तम आहे. नोकरीमध्ये बढती/प्रमोशन यासारख्या घटना घडतील. वाहन खरेदी अनेक लाभदायक घटना घडतील. उत्तरार्धात घराचे व्यवहार मनासारखे होतील. राजकीय/सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. निवडणुकीत यश मिळेल. महत्वाचे पद मिळेल. वरिष्ठांचे घरापासून अथवा परदेशी जाल, कुटुंबामध्ये सुखकारक घटना घडतील. मंगल कार्य घडतील. घर, जागा यांची कामे मार्गी लागतील. विद्यार्थी वर्गाला संघर्षातून यश मिळेल. मोठ्या कर्जाची कामे सहज होतील. घरातील व कुटुंबातील वातावरण आनंदी राहील. तर शनिचे भ्रमण आपल्या सप्तम स्थानातून होत असून, आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. कायदेशीर कामात यश मिळेल. भागीदारीमध्ये नवीन व्यवयास सुरु करण्यास उत्तम काळ राहील. बराच काळ रखडलेले विवाह संपन्न होतील. अथवा जूळून येतील. जोडीदाराची साथ उत्तम राहील. आपणास स्वतंत्र व्यावसय केल्यास प्रगतीचा काळ राहील. जून्या घराचे नूतनीकरण / नवीन घर अशामध्ये पैसे खर्च होतील. पेन्शर / सेवानिवृत्त व्यक्तींना काळ शुभ आहे. मात्र एकटेपणाची जाणीव राहील. विद्यार्थी वर्गाला शेवटच्या क्षणी यश प्राप्त होईल. जुन्या आजाराचे प्रसंगाला तोंड द्यावे लागेल.

राशीच्या पंचम व लाभ स्थानातून राहू व केतूचे भ्रमण होत असून पुढील काळात कर्जाचा ताण कमी होईल. मोठे लाभ होतील. राजकीय व्यक्ती / सरकसरी व्यक्तीचे उत्तम सहकार्य मिळेल.शत्रुवर विजय मिळेल. खेळ / स्पर्धा / निवडणुका यामध्ये मोठे यश व आपला दबदबा निर्माण होईल. मोठी ईच्छा पूर्ण होईल. मात्र विद्यार्थी वर्गाला परीक्षेत अडथळे त्रास संभवतो. पालकास मूलांची चिंता दर्शविते. मूलांना शिक्षणासाठी दूर जावे लागेल. शेअर्स व्यवसायात फसवणूक अथवा नुकसान होईल.

हर्षलचे भ्रमण दशम / होत असून अचानक कामात बदल मोठा अधिकार दर्शवितो. प्रतिष्ठा मान सन्मान वाढेल. मात्र काही सामूहिक किंवा संघटनेतील कामात त्रास सहन करावा लागेल. एकंदरीत हे वर्ष नोकरी, व्यवसाय याच्या दृष्टीने प्रगतीचे व शिक्षण संततीच्या बाबत दक्षता व काळजी घेण्याचे राहिल.

**उपासना :** आपण शिवशंकर, गणपती उपासना केल्यास उत्तम राहील. घरात रुद्र अभिषेक व शिवपाठस्तोत्र केल्यास उत्तम.

**शुभ रंग :** पांढरा, आकाशी.

**शुभदिनांक :** कोणत्याही महिन्याच्या २,११,२९

**भाग्यकारक वर्षोवर्षे :** १२,१६,२१,३१,४८,५९,६६.

## सिंह : शत्रुवर विजय, प्रवासात लाभ

सिंह रास ही राशीचक्रातील पाचवी रास असून या राशीचे



चिन्ह सिंह असे आहे. ही अग्नी तत्वाची रास आहे. स्थिर स्वभावाची अल्प प्रसव राशी असून या राशीचा स्वामी रवि असून ही वंध्याराशी आहे. या राशीच्या व्यक्तीजळ प्रचंड आत्मविश्वास व स्वाभिमान असतो. तेजस्वीपणा, चमकदार, आकर्षकता व भव्यता ही आपल्या स्वभावाची वैशिष्ट्ये आहे. आपण स्वातंत्र्य प्रिय आहात. आपणास कोणाच्या हाताखाली काम करणे आवडत नाही. त्यामुळे इतर कोणाचे बोल अथवा हुकूमत आपण सहन करणार नाही. तर वेळ पडल्याच आपण आपले स्वत:चे विचार काही कल्पना असतात. तत्व व स्वत्व जपण्याकडे आपला कल जास्त असतो. आपल्या कुळाबद्दल व परिवारामधील व्यक्तीवर पूर्वजनावर व परंपरेवर आपणास अभिमान असतो. आपण घरातील व्यक्ती, मित्र परिवार सहकार्य असणारे व्यक्ती आपणास इतर व्यक्तीपेक्षा वेगळी वागणूक द्यावी मग आपण त्या व्यक्तीबद्दल दिलदार राहाल. कितीही अडचणी आल्या तर त्या व्यक्तीबद्दल दिलदार राहाल. कितीही अडचणी आल्या तर त्या व्यक्तीबद्दल ठाम राहाल. तर माझे व्यक्तीमत्व आपले मन विशाल व उदार असते. वेळ प्रसंगी नातेवाईक मित्रपरिवार व अडचणी असणाऱ्या व्यक्तींना आपण मुक्तपणे मदत करता. आपली स्तुती, वावा लोकांनी करावी असे मनोमन वाटते. आपली उत्सुकता, स्पष्टवक्तेपणा, बद्धीचा योग्य वापर करून आपण यश खेचून आणता व त्यामुळे आपण लोकप्रिय होऊ समाजात रुबाबदार व्यक्तीमत्व म्हणून गणला जाता. सिंहराशीमध्ये मधा, पूर्वा व उत्तरा ही तीन नक्षत्रे येतात. सिंह रास मघा नक्षत्र असणाऱ्या व्यक्तीचे गुण मान, उद्योगी, सेवासंपन्न, अत्याधुनिक उतावळे कोणत्याही गोष्टीची पटकन अनुमान, कर्तृतत्ववान, नोकरचाकर, खूप ठेवणाऱ्या धनवान, उद्योगशील, बलवान, गर्विष्ठ, विलक्षण साहसी, जगप्रसिद्ध असतात. यांचे शरीर मजबूत व हे लोक देशभक्त व पितृभक्त असतात. पूर्वा नक्षत्र असणारा मनुष्य दानशूर प्रिय भाषिणी, चपळ किर्तीमान, श्रद्धावान, राजसेवक, तालीमबाज व सत्वगुणी असतो. प्रवासाची आवड, नाट्यकलांची पैसे व ऐश्वर्याची आवड असते. ह्या नक्षत्रातील व्यक्ती धनाड्य व्यापारी आढळतात. तर उत्तरा नक्षत्र हे मानी व मेहनती ाहे. परिवार व वाहन याचे सौख्य मिळवणारो कला कौशल्य यामध्ये आवड असणारे असते. तर अशा सिह राशीचे चालू वर्ष कसे राहील ते पाहू.

सिह राशीच्या पष्ठ स्थानी गुरुचे भ्रमण ५ एप्रिल २०२० पर्यंत असून नंतर सफल स्थानी होणार आहे. या वर्षी आरोग्यासाठी जास्त खर्च करावा लागेल. शत्रूवर मोठा विजय प्राप्त होईल. कोर्टकचेरी वाद विवादामध्ये आपली सरशी होईल. तरूण

व्यक्तींना नवीन नोकरी व परदेशी काम मिळेल. मोठे कर्ज मिळेल. मात्र उत्पन्नात वाढ होणयसाठी नवीन योजना आमलात आणाल. राजकीय व सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा वाढेल. मान, सन्मान व मोठ्या पदाची प्राप्ती होईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. विवाह इच्छुकांचे विवाह एप्रिल २०२१ नंतर ठरतील अथवा होतील. मनासारख्या घटना घडतील. नातेवाईक छझेटे प्रवास यांच्यामधून लाभ संभवतो. कला/खेळ/स्पर्धा यामध्ये यश मिळेल. शनिचे भ्रमण सहाव्या स्थानातून होत असून ते स्वराशीतील असल्यामुळे आपणास कायदेशीर कामात यश, शत्रुवर विजय, निवडणुका / कोर्टकचेरीमध्ये मोठे यश मिळेल. नोकरीमध्ये चांगले स्थैर्य मिळेल. आरोग्याच्या समस्या कमी होतील. नोकर चाकर यांचे सहकार्य उत्तम राहील. जुन्या गोष्टीमधून फायदा होईल. प्रवास करताना दक्षता घ्यावी लागेल. अडथळे अथवा प्रवासात अडचणी येतील. राशीच्या दशम व चतुर्थ स्थानातून राहू केतूचे भ्रमण होत असल्यामुळे नोकरी व्यवसायात नवीन बदल कराल. काहीवेळा गोधळाची स्थिती निर्माण होईल. नोकरीत बदल व बदली घरापासून लांब अथवा दूर होईल. घरातील ज्येष्ठ व्यक्तीची काळजी घ्यावी लागेल. तसेच नवीन वर्षात अनपेक्षितपणे नवीन संधी उपलब्ध होतील. नाविण्यपूर्व शिक्षण होईल. संशोधनात्मक शिक्षणात यश मिळेल. अचानक तीर्थ यात्रा / प्रवास करावा लागेल. एकंदरीत वर्षाच्या उत्तरार्धानंतर शेअर व्यवसायात व आर्थिक दृष्टीने यशदायक राहील.

**उपासना :** सूर्य उपासना, मार्तंड भैरवची उपासना केल्यास उत्तम राहील. तर सफधान्य व बदाम यांचे दान केल्यास नोकरी व्यवसायातील अडचणी दूर होतील.

**शुभरंग :** नारंगी, सोनेरी

**भाग्यरत्न :** पवाळ व डायमंड

**शुभदिनांक :** कोणत्याही महिन्याच्या १,१०,१९,२८

**भाग्यकारक वयोवर्षे :** २५,३१,३५,३९,४५,५४

## कन्या : पदवी पुरस्कार प्राप्त होईल

राशीचक्रातील सहावी रास असून आपला राशी स्वामी बुध हा आहे. पृथ्वी चिकित्सक असतात. आपल्या कार्यक्षेत्रात



संपूर्ण विचार करून निर्णय घेता. कामाच्या ठिकाणी नियोजन करणे सुसुत्रता आणणे हे गुण आपणात असतात. चालणे, बोलणे, तोलून, मापून असते. विचारात बालिशपणा विचारांचा थांगपत्ता न लागणे, लाजाळू, भित्रा, आळसी, चिकित्सक, आत्मविश्वास कमी असणे, हेवा करणारी, भावनेच्या भरात वाहत जाणारी, आतल्या गाठची आपण अगोदर इतरांची मते जाणून घेता. मात्र आपल्या मनाचा थांगपत्ता आपण सहसा इतरांना लागू देत नाही. थोडीशी ही मुत्सद्दी पण गुण असलेली व्यक्ती या राशीत आढळतात. कोणत्याही राशीत आढळतात. कोणत्याही विषय आपल्याला अवघड नसतो कोणत्याही कामात भावनेच्या भरात झोकून देण्याचा आपला स्वभाव नाही. आपलयकडे हजर जबाबीपणा, वाक्य चातुर्य, दूर दर्शीपणा हे गुण निसर्गत आहेत. आपल्यालमध्ये धडाडी, शौर्य, पराक्रम व धाडस ह्या गोष्टीचा अभाव असतो. त्यामुळे आपण नेतृत्वपेक्षा पडद्यामागून काम करणे अधिक पसंत असते. आपले निरीक्षण चौफेर, व खोलवर असते. मात्र प्रत्येक गोष्टीचा सुक्ष्मपणे आपण विचार करता प्रत्येक गोष्टीचा सूक्ष्मपणे आपण विचार करता. इतरांना मार्गदर्शन करणे आपणास आवडते.आपल्यात कोमलपणा, विनयशिलता, नम्रता, संकोच, भावनावशता ही वैशिष्ट्ये असतात. कन्या राशीच्या व्यक्तीचे एक गुण म्हणजे एक गोष्अीतून दुसऱ्या गोष्टीकडे लगेच वळात. या राशीच्या व्यक्तीमध्ये संघर्ष कमी आढळतो. बुद्धीमत्ता हेच भांडवल शारिरीक कष्टाचा कंटाळा करणाऱ्या व्यक्ती म्हणजे कन्या राशीची होय. या राशीच्या लोकांच्या प्रतिकार शक्ती कमी असते. कन्या रास ही स्त्री वर्गाला फार अनुकूल असते. घरातील गोष्टी दुसरीकडे सांगणार नाहीत. ह्या राशीच्या स्त्रिया संयमी व विवेकी असतात. या राशीमध्ये उत्तरा हस्त व चित्रा ही नक्षत्रे येतात. तर कन्या रास उत्तरा नक्षत्र असणाऱ्या व्यक्तीची वैशिष्ट्ये तेजस्वी, स्वाभिमानी कलेच्या क्षेत्रामध्ये कुशल आत्मविश्वास व समानतेचे व्यवहार करणारी असतात. कन्या रास हस्त नक्षत्र अत्यंत उत्याही, गुढ शास्त्रज्ञची आवड असणारे, शांत प्रिय, विनम्र, विद्वान, धनिक, प्रभावशाली व्यक्तीमत्व असणारे संपदा कामी, सुंदर कपडे व दागिन्यांची हौस असते. चैनीसाठी हे लोक निर्लज्ञ होतील. तर चित्रा नक्षत्रामधील व्यक्तींना विविध वस्त्रे वापरण्याची आवड, फुलांची आवड. यांचे डोळे तजेलदार व बोलके असतात. व स्वभावात चतुरस्त्र भावाची असतात. तर अशा कन्या राशीच्या स्वभावाच्या व्यक्तीचे चालू वर्ष कसे जाईल ते पाहू.

राशीच्या पंचम व षष्ठ स्थानातून गुरुचे भ्रमण होणार असून या वर्षी नशीबाची साथ उत्तम राहील. विद्यार्थी वर्गाला यश मिळेल, संतती सौख्यात भर पडेल. मुलांच्या प्रगतीचा काळ उत्तम असल्यामुळे पालक वर्ग आनंदी राहील. शेअर्स व्यवसायात मोठा पैसा मिळेल. स्पर्धा, लॉटरी यामध्ये बक्षीस मिळेल. कमी श्रमातील पैशाचा लाभ होईल. वारसा हक्क वडीलोपार्जित प्रॉपर्टीमधून मोठा लाभ होईल. धार्मिक व मंगल कार्य संपन्न होतील. तिर्थयात्रा होतील. उच्च शिक्षणाची संधी मिळेल. मित्रांचे सहकार्य उत्तम राहील. सामाजिक कार्यात सहभाग राहील. राजकीय सामाजिक क्षेत्रात मानाचे पद मिळेल. नवीन उद्योग व्यवसाय करण्यासाठी मोठ्या कर्जाची कामे सहज होतील. तर शनिचे भ्रमण आपल्या पंचम स्थानातूनच जात आहे. शेअर्स व्यवसायामध्ये गुंतवणूक केल्यास फायदेशीर राहील. कोर्टकचेरीमध्ये मनासारखे निर्णय होतील. स्पर्धेमध्ये बक्षीस मिळेल. आरोग्यामध्ये चांगली सुधारणा होईल. एखाद्या चिवट किंवा दीर्घकाळ असलेल्या दुखण्यावर


mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

ईलाज मिळेल. नोकरीमध्ये स्थैर्य लाभेल. हाताखालच्या लोकांकडून सहकार्य उत्तम राहील. मात्र वैवाहिक काही प्रमाणात समाधानी राहला. आपल्या पत्रिकेत पंचम व सप्तमेश यांची युती पंचमस्थानात होत असल्यामुळे विवाह, प्रेमविवाह, प्रेमाचे रुपांतर विवाहत अशी घटना घडतील.

डोळ्यांचे अथवा दातांचे विकार या काळात डोके वर काढतील. तर राशीच्या नवम व तृतीय स्थानातून राहू व केतूचे भ्रमण होत असून या काळात गुरुजन व्यक्तीशी वादविवाद, मतभेद अशा घटना घडतील. छोटे प्रवास करताना दक्ष राहावे लागेल. चुकीचा पत्र व्यवहार अथवा कागद पत्रे गहाळ होतील. छोटे भाऊ बहिण यांच्याशी वादविवाद दर्शवितात. गायक, साहित्यिक, लेखक यांना दक्ष राहूल काम करावे लागेल.

तर अष्टमस्थानी असणारा हर्षल, षष्ठस्थानी नेपच्यून व पंचमस्थानी येणारा प्लूटो खर्चाचे प्रमाण वाढेल, एखादे रेंगाळत असलेले काम पूर्णत्वाकडे जाईल. एकंदरीत आपणास वर्षीचा पूर्वार्ध उत्तम राहून उत्तरार्ध मध्यम राहील.

**उपासना :** कृष्ण, विठ्ठल, रुक्मिणी उपासना शुभ राहील. दर मंगळवारी केळी दान केल्यास शुभ राहील.

**शुभ रंग :** पिवळा, पांढरा

**शुभरत्न :** पांढरा, पुष्कराज व पाचू या रत्नांचा वापर केल्यास योग्य राहील.

**शुभ दिनांक :** कोणत्याही महिन्याच्या ५,१४,२३.

**भाग्यकारक वयोवर्ष :** १५,२५,३६,४२,५१,६०.

## तूळ : जागेची कामे यशस्वी होतील

राशी चक्रातील ही सातवी राशी असून या राशीचा स्वामी शुक्र हा आहे. पुरुष स्वभावी चरवृत्ती, वायू तत्वाची रास



असून या राशीचे चिन्ह समान दोन तराजू आहे. या राशीच्या व्यक्ती उत्साही असून रूप, सौंदर्य व रसिकता यांचा आस्वाद घेणारी आहे. वागण्यात एकवाक्यता असते. आपल्या कार्यक्षेत्रात स्वत:चा तर्क–वितर्क लावून न्यायाने ते काम पूर्ण करतात. नाटक, सिनेमा, रंगभूमी, नृत्य, कयव्य हे तूळ राशीस आवडते क्षेत्र आहे. तूळ राशीत असणारे व्यक्ती म्हणजे मानवी जीवनाचे वैभव जीवन कसे जगावे हे तूळ राशीच्या कडून शिकावे. सर्वांच्याबरोबर मिळून मिसळून वाढणारा मधुर व्यक्तीमत्व न्याय विषयी आवड व सर्वाबरोबर मिळते जुळते घेण्याची वृत्ती असल्यामुळे ते सर्व नाच प्रिय ठरतात. निसर्गाचे खरे रसिक असतात. आपल्या सौंदर्याची अभिरूची ही अभिजित असते.

मूळात केवळ पैसा व संपत्ती हे आपले ध्येय असत नाही. जीवनातील निसर्गातील साहित्यातील, सौंदर्य आपण रसिकतेने टिपता. त्याचा खरा खुरा आनंद आस्वाद घेता. तरळ संवेदना व मनस्वी स्वभाव या गोष्टी आपणास जन्मजात घटनेत विचारात व प्रसंगात अटीतटीची भूमिका न घेणे दुराग्रही वृत्ती न ठेवणे. हा आपला स्वभावाचा मूळ गुण असतो. तर स्वातंत्र्य, समानता, समता, न्याय व बंधूभाव ही तत्वे आपल्यात भिनलेली असतात. लोकशाहीवृत्तीचे अनुकरण आदर, दुसऱ्या व्यक्तीची प्रतिष्ठा संभाळल्याबद्दल आपले सर्वत्र स्वागत होते. तर तूळराशीमध्ये चित्रा, स्वाती व विशाखा ही नक्षत्रे येतात. तूळ रास चित्रा नक्षत्रामधील व्यक्ती पराक्रमी,साहसी, बलवान व उत्साही, आर्थिक बाबतीत ज्येष्ठ, बलवान, गणित विषय हा चांगला असते. पारख चांगली असते.

गूढशास्त्राची आवड तर तूळरास स्वामी नक्षत्राची व्यक्ती शांत व्यापारी वृत्तीची, कृपाळू, मधूरवचनी शांतताप्रिय आनंदी, ईश्वरभक्त, संयमी, नितीमान, सत्यप्रिय असून आत्मसंयमी, विद्वान, चंचल व तडजोड करणारी असते. तर तूळरास विशाखा नक्षत्रातील व्यक्ती चिडखोर, रसिक काही प्रमाणात उधळ्या व्यवहाराची रुची, आकर्षक, प्रभावशाली व्यक्तीमत्व काहीवेळा असूरी वृत्ती, बोलण्यात अत्यंत चतूर अशी व्यक्ती असते.

**तर अशा तूळ राशीचे चालू वर्ष कसे राहील.**

राशीचे चतुर्थ व पंचम स्थानातून गुरुचे भ्रमण होणार असून घर/जागा/वाहन यांची खरेदी होईल. वास्तूमध्ये मोठे बदल होतील. घरात धार्मिक / मंगल कार्य होतील. घरातील वातावरण चांगले राहील. तरूण व्यक्ती हे वर्ष अनुकूल राहील. विवाह इच्छुकांचे विवाह एप्रिल २०२१ नंतर ठरतील. अथवा संपन्न होतील. कोर्टकचेरीमध्ये मनासारखे निर्णय होतील. नोकरीमध्ये प्रमोशन होईल. घराजवळ बदली अथवा त्यासाठी प्रयत्न कराल. राजकीय क्षेत्रात मोठे यश मिळेल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. वारसा हक्क/विमा/पेन्शनची कामे होतील. दूरवरचे प्रवास संभवतात. कर्जाची कामे सहज होतील. मात्र, विद्यार्थी वर्गाला कष्टातून यश मिळवावे लागेल.

तरुणांना चांगल्या नोकरीची संधी मिळेल. स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल. पाल्यांना आपल्या संततीचे कौतुक वाटेल. तर राशीच्या चतुर्थस्थानी शनिचे भ्रमण होत असून घर जागा, जुन्या घराचे पुननिर्माण होईल. जागा/घरावरून कोर्टकचेरी / अथवा कायदेशीर कटकटी निर्माण झाल्या तरी त्यात यश आपलेच आहे. राजकीय सामाजिक क्षेत्रात जरा जपून काम करावे. नोकरीमध्ये सहकार्याची मानहानी सहन करावी लागेल. घरातील वृद्ध व्यक्तींची दक्षता घ्यावी लागेल. दीर्घ मुदतीचे आजार या काळता दर्शवितात. दुखणे, मधुमेह

यासारखे आजारांची वाढ होईल.

तर राहू केतूचे भ्रमण हे अष्टम व द्वितीय स्थानातून होत असून आरोग्याची दक्षता घ्यावी. प्रवास जपून करावे. एकत्र कुटुंबाची वाटणी / विभक्त होण्याचे योग येतील. घरातील ज्येष्ठ व्यक्तीसाठी हा काळ प्रतिकूल आहे. कौटुंबिक अडचणी वाढतील. आर्थिक व्यवहार करताना जपून राहावे. दात, डोळे किंवा पायाची दुखणी संभवतात. नोकरी व्यवसायात खंड अथवा मन उदास होण्याची शक्यता राहील. तर हर्षल सप्तमस्थानी, पंचमस्थानी नेप्च्यून, चतुर्थ प्लूटो असून अचानक व अनपेक्षित गोष्टी या काळात संभवतात. मित्रावर अतिविश्वास धोकादायक राहील. जुनी येणी येण्यास विलंब दर्शवितो. तर खेळाडू / साहित्यिक यांना हे वर्ष अनुकूल राहील.

**उपासना :** आपण कुलदेवी उपासना, महालक्ष्मी उपासना उत्तम राहील. त्याचबरोबर काळे उडीद, सप्तधान्य दर शनिवारी दान केल्यास अनुकूल राहील.

**शुभरंग :** जांभळा / पांढरा

**भाग्यकारक रत्न :** आपण पाचू, तूरमळी, ओपल, डायमंडळचा वापर केल्यास उत्तम राहील.

**शुभ दिनांक :** कोणत्याही महिन्याच्या ६,१५,२४

**भाग्यकारक वयोवर्ष :** १६,२५,२८, ३२,४०,४७,६२.

## वृश्चिक : राजकीय सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा पद मिळेल



वृश्चिक रास ही राशी चक्रातील आठवी रास असून विंचू हे या राशीचे प्रतीक आहे. हि जल तत्वाची व स्थिर रास असून बहु प्रसव रास आहे. या राशीचा स्वामी मंगळ असून या राशीच्या व्यक्तीकडे असामान्य धैर्य, दृढ इच्छाशक्ती, विलक्षण मनोबल या गोष्टी असतात. काम पूर्ण करण्याची चिकाटी, जे सातत्य लागते ते आपणाकडे असते. आत्मसंयम, विवेक, निग्रह, निश्चयात्मकता निर्धार या गोष्टी यशासाठी लागतात त्या आपणाकडे आहेत.अखंडपणे अविरतपणे काम करण्यामुळे आपण यश मिळविता. एखाद्या गोष्टीत मन लावून काम करणे, ध्येय लक्ष ठेवून काम करणे. अत्यंत उत्साहाने आशावादीपणे तडफेने काम करणारी न डगमगणारी, हार न माननारी, कार्यक्षेत्रावर आपली चमक दाखविणारी, आपली रास आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी धाडसाची आत्मविश्वासाची कामे असतात त्या ठिकाणी आपण यशाच्या टोकापर्यंत जाणे, एखाद्या क्षेत्रात उच्चांक प्रस्थापित करणे.

यामध्ये वृश्चिक राशीचे व्यक्ती अधिक आढळतात. आत्मसंयम, मनोबल, विवेकशक्ती या गोष्टी आपणाकडे मोठ्या प्रमाणावर असतात. आपल्या कार्यशक्तीवर, बुद्धीमत्तेवर आपल्या अंगभूत गुणावर प्रचंड विश्वास असतो. चिकाटी, सातत्य आत्मविश्वासामुळे स्पर्धापरीक्षा यामध्ये वृश्चिक राशीचे व्यक्ती भरपूर आढळतात. तसेच सैन्य व पोलीस दलात वृश्चिक राशीची व्यक्ती विशेष कामगिरी करतील. मोठ्या कामात ते पुढे येवून जबाबदारी घेतील. वृश्चिक राशीस परिक्षण करणे हे थोडे अवघड असते. कारण या राशीमध्ये अत्यतं टोकाच्या चांगल्या व अत्यंत टोकाच्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती आढळतात. कारण या राशीचा स्वामी मंगळ तो कशाप्रकारे त्याच्या जन्मपत्रिकेत आहे त्यानुसार ठरते. तर वृश्चिक राशीत विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा ही नक्षत्रे येतात. तर वृश्चिक रास विशाखा नक्षत्र असणाऱ्या व्यक्ती अल्प क्रोधी लहान कारणावरून रागीटपणा करणारे, प्रवासाची आवड असणारी गुप्तकार्य हट्टी, सूडपणा वादविवादप्रिय तर वृश्चिक रास अनुराधा नक्षत्रामधील व्यक्ती सौंदर्याची आवड, कपडेलत्ते, दागिने, प्रवास यांची लालसा असते. धनवान, संसारिक वृत्तीच्या गोड बोलणाऱ्या दूर प्रवास करण्यात आनंद मानणाऱ्या तर वृश्चिक रास ज्येष्ठा नक्षत्र हे लोक संतोषी, घातकी, आप मतलबी धार्मिक उपद्रवी नेहमी संकटातून पळ काढणारी उत्तम स्मरणशक्ती असणारे व्यक्ती असतात.

तर अशा गुढी स्वभावाच्या वृश्चिक राशीचे चालू वर्ष कसे राहील. आपल्या राशीच्या तृतीय स्थानातून व चतुर्थ स्थानातून गुरुचे भ्रमण होणार असून मोठे करार होतील. सतत प्रवास होतील. भावंडाविषयी चांगल्या घटना घडतील. महत्वाची कागदपत्रे होतील. नाव लौकीक वाढेल, पदवी/पुरस्कार/प्रसिद्धी/मानसन्मान होईल. खेळ/कला/साहित्य/कर्मत्व पराक्रम घडेल.

मोठी कामे हातून होतील. शिक्षणासाठी प्रवास. घरात मंगल कार्य तरुणाचे विवाह अशा घटना घडतील. भागिदारीतील पूर्वार्ध यशकारक आहे. मनासारख्या घटऩा घडतील. मित्र, सहकारी यांची मोलाची मदत मिळेल. एप्रिल २०२१ पर्यंत सर्व कामे सुरळीत होतील. वारसा हक्क/विमा/प्रॉपर्टी विषयाची कामे एप्रिल २०२१ नंतर मार्गी लागतील. सेकंड होम/ जोडीदाराच्या नोकरी अथवा व्यवसायाची प्रगती दर्शविते. तर राशीच्या तृतीय स्थानी शनिचे भ्रमण होत असून कर्तृत्वाची नवीन संधी प्राप्त होईल. कला / खेळ/साहित्य क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना शुभकारक वर्षे आहे. जागा, घर, प्रॉपर्टी यांची कागदपत्रांची कामे पूर्ण होतील. शेअर्समध्ये दीर्घकाळासाठी गुंतवणूक करण्यास अनुकूल काळ राहील. प्रसिद्धी मिळेल, यात्रा मंगल कार्यमध्ये आपला सहभाग इतरांना चकीत करणारा राहील. मात्र विद्यार्थी वर्गाला नवीन ॲडमिशन किंवा प्रवेश संथ गतीने होईल. तर राशीच्या सप्तम स्थानातून व आपल्या राशीतून राहू केतूचे भ्रमण होणार असून द्विधा मनस्थिती राहील. जोडीदाराशी दुरावा स्वभावात मतभिन्नता मोठे निर्णय चुकण्याची शक्यता राहील. भागीदाराशी व्यवसायात कटकटी निर्माण होतील. डोक्याचे विकार/हितशत्रुंचा त्रास या

गोष्टीची दक्षता घ्यावी. मोठे खर्च करताना काळजी घ्या. एकंदरीत हे वर्ष कायदेशीर कामात यश/राजकीय सामाजिक क्षेत्रात मान सन्मान प्रतिष्ठा पद प्राप्ती यासाठी अनूकूल आहे.

**उपासना :** शिवशंकर उपासना अनुकूल राहील. सफधान्याचे दान, रुद्राभिषेक केल्यास येणाऱ्या अडचणी कमी होतील.

**शुभरंग :** गुलाबी, लालसर, मरून

**भाग्यकारक रत्न :** आपण, पुष्कराज व माणिक रत्नाचा वापर करावा.

**शुभदिनांक :** कोणत्याही महिन्याच्या १८,२१,२७

**भाग्यकारक वयोवर्ष :** २०,२४,३८,४२,४७,५६.

## धनु : धनसंचय उत्तम / प्रसिद्धी वाढेल



राशीचक्रातील ही नववी रास असून अग्नि तत्वाची द्विस्वभावी पुरुष राशी असून या राशीचा स्वामी गुरु आहे. अत्यंत संवेदनशील, सात्विक, न्यायप्रिय, परोपकारी अंत:करणातील कोश सुफ अवस्थेत असणारी जीवनाबद्दल श्रद्धा न्यायदेवताच्या निर्णयाप्रमाणे कर्म करणारी परोपकारी अधिकारांची हौस असणारी न्यायी व धार्मिकता जपणारी मूलासाठी अथवा कुटुंबासाठी सदैव खर्च करणारी, वास्तू व वाहन सौख्याची आवड असणारी, हसतमुख व समाधानी धार्मिकतेची आवड, साधूसंत ऋषिमुनी सत्पुरुष, आचार्य महानयोगी या राशीवर जन्म घेणाऱ्या व्यक्ती असतात. त्याचबरोबर प्रामाणिकपणा, सुसंस्कृतपणा, सभ्यता, परोपकारी करणारी वृत्ती या राशीमध्ये असते.

अनेक मोठमोठ्या धार्मिक व अध्यात्मिक संस्थेवर ट्रस्टअीवर सदस्य म्हणून काम करताना या राशीचे व्यक्ती आढळतात. समाजाचे आधारस्तंभ, दीपस्तंभ, मार्गदर्शक या दृष्टीने आपणाकडे, पाहिले जाते. गरीब व दिनदुबळ्या लोकांबद्दल सहानुभूती, करूणा असते. लोकहिताचे निर्णयाला आपण प्राधान्य देत असल्यामुळे सामाजिक संस्था, हॉस्पिटल, धार्मिक संस्था प्राण्यांसाठी गोशाळा अशा प्रकारच्या संस्था, धार्मिक मठ, याठिकाणी धनू राशीचे लोक हमखास सापडतील. नवीन कल्पना, मूलगामी विचार परंपरा, इतिहास, रुढी, संस्कृती या विषयी धनू व्यक्तीच्या मनात आदर असते. क्रीडा क्षेत्रातही या राशीचे लोक चमकतात.

काही धनू राशीचे व्यक्ती कायदा सुव्यवस्था यामध्ये काम करताना न्याय व शिस्त यांचा ताळमेळ घालून तो कार्यभाग साधतात. त्यामुळे ते समाजप्रिय होतात. धनू राशीमध्ये मूळ पूर्वाषाठा उत्तराषा ही नक्षत्रे येतात. तर धनूरास मूळ नक्षत्राची व्यक्ती सशक्त,दणकट, बलवान, धाडसी काही प्रमाणात चंचल स्वभावाची व एकांतप्रिय असतात. यांना मूळात श्रेष्ठत्व गाजविण्यास आवडते. इतर धनूरास पूर्वाषाढा नक्षत्राच्या व्यक्ती गर्विष्ठ, मैत्री कायम टिकवणाऱ्या, बलवान, धनवान, सामान्य बुद्धीमताचा, पैशांचा, लोभ अशा असतात. यांना आनंदी व सुस्वभाव यांची प्राप्ती होते. नोकरीची आवड असणारा तर लबाडीच्या व्यवहारात फसगत होणार असतो. तर धनुरास उत्तराषढा नक्षत्र असणाऱ्या व्यक्तीचा स्वभाव आशावादी, महत्वकांक्षी, शिक्षणाची आवड असणारे तीव्र इच्छा शक्ती, शांत स्वभावाचे धार्मिक व नम्र असतात. तर धार्मिकता जपणारी व विचारांचा ताळमेळ साधून समाजात वावरणारा धनु राशीच्या व्यक्तीचे चालू वर्ष कसे राहील ते पाहू...

आपल्या राशीच्या धनूस्थानी गुरुचे भ्रमण होत असून कौटुंबिक व आर्थिक स्थिती उत्तम राहील. उत्पन्नात वाढ होईल. कमी श्रमात पैसे मिळतील. नोकरीमध्ये प्रमोशन मिळेल वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. निवडणुकांमध्ये यश, लोकप्रियता वाढेल. बदल/बदली होईल. शेअरमार्केटसाठी नवे वर्ष चांगले राहील. आर्थिक गुंतवणूक चांगली होणार असून वडीलोपार्जित इस्टेटीतून आर्थिक लाभ होईल.

एप्रिल २०२१ नंतर राशीच्या तृतीयस्थानी गुरुचे भ्रमण होणार असून जवळचे प्रवास घडतील. मित्रमंडळींपासून मदत/फायदा होईल. इच्छुकांचे विवाह ठरतील. तिर्थयात्रा, उच्च शिक्षणासाठी अनुकूल काळ. सामाजिक, धार्मिक संस्थेवर सदस्य म्हणून निवड होईल. पुण्य कर्म, उपासना कराल. साधू संत यांचे दर्शन व भेटी होतील. तर शनिचे भ्रमण आपल्या धनस्थानातून होत असून साडेसातीचा शेवटचा टप्पा चालू आहे. त्यामुळे आरोग्यामध्ये सुधारणा होईल. एकटेपणा दूर होईल.

विवाह समस्या दूर होतील. गुंतवणूकीवर भर राहील. काही जुनी येणी वसूल होतील. कुटुंबातील ज्येष्ठ व वृद्ध व्यक्तींकडून फायदा होईल. भावंडे/नातेवाईक यांना दिलेले पैसे परत मिळतील. जुने शास्त्र, गुढविद्या, साहित्य यातून आर्थिक प्राप्ती होईल. राजकी, सरकारी कामातून फायदा होईल.

पराक्रम कर्तृत्वाला संधी मिळेल. या काळात समाजावर आपली प्रतिमा लोकप्रिय होण्यास हे वर्ष अनुकूल राहील. तर राशीच्या षष्ठ व व्यय स्थानातून राहूचे व केतूचे भ्रमण होत असून नोकरीमध्ये गोंधळ निर्माण होऊ शकतो.

दूर बदली, आरोग्याच्या दृष्टीने निदान लवकर न होणे, हाताखालच्या लोकांकडून फसवणूक, मोठे प्रवास रद्द होतील. चुकीच्या औषधांचा त्रास, एखाद्या खाण्यापिण्यातून इन्फेक्शन होण्याची शक्यता राहील. तर पंचम स्थानातील हर्षल अनपेक्षित लाभ करून देणारा राहील. मित्राचा लहरीपणा सहन करावा लागेल. तृतीय नेपच्यून व धनस्थानी प्लूटो दृढ गुढशास्त्र अध्यात्म यामध्ये यश देणारा राहील. एकंदरीत धनसंचय वाढेल. तीर्थयात्रा होतील. मित्राकडून लाभ होतील.

**उपासना :** श्री दत्त, शिवशंकर ची उपसना केल्यास उत्तम राहील. त्याचबरोबर महामृत्यूंजय जप केल्यास उत्तम राहील. दर शनिवारी तेल/लोखंड/उडीद शनिमंदिरात दान करावे.



mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

**शुभ रंग :** चमकदार पिवळा, लाल, डाळींबी.

**भाग्यरत्न :** अपण माणिक रत्नाचा वापर केल्यास उत्तम राहील. त्याचबरोबर टोपाझ या रत्नाचा वापर जरूर करवा.

**शुभदिनांक :** कोणत्याही महिन्याच्या ३,१२,२१,३०.

**भाग्यकारक वयोवर्ष :** १८,२२,३४,४३,५४,६३.

## मकर : व्यक्तीमत्वामध्ये सकारात्मक बदल

मकर राशी चक्रातील ही दहावी रास असून स्त्री स्वभावी चर वृत्तीची ही रास आहे. या राशीचा स्वामी शनि असून ही



अर्थ स्तवाची राशी असून बहुप्रसवी रास आहे. तसेच ही चर स्थिर रास आहे. मकर राशीचे स्वामीत्व शनि या ग्रहाकडे असल्यामुळे शनिचे मुख्य गुण जबाबदारी व कर्तव्याची जाणीव, अव्याहतपणे चिकाटीने व अखंडपणे काम करणे ही आपली खासियत असते.

शनिचा मुख्य गुणधर्म म्हणजे कायद्याचे पालन करणे कायदा व न्याय या संदर्भात आपण विशेष करून जागरूक असता. या राशीच्या व्यक्ती अत्यंत काटकसरी हिशेबी व व्यवहारी असल्यामुळे त्या संसारी जीवनात अत्यंत अग्रेसर असतात. न्याय व अन्याय या बाबतीत तडजोड न करण्याची कडक व शिस्त सहनशीलता विवेक आचार या व्यक्तीकडे भरपूर असते. आत्मसंयम जीवनात यशस्वी होण्यासाठी लागणारे स्वयंशासन हे आपल्याकडे असते. विचारपूर्वक प्रत्येक विषयाचा साधक बाधक विचार करून आपण आपला कार्यभाग साधता. आपल्याकडे प्रामाणिकपणा न्यायीपणा, कोणत्याही कार्याची अथवा संस्थेची जबाबदारी उचलण्याची आपली मानसिक तयारी असते. ध्यान धारणा, चिंतन, मनन, व्रत वैकल्य कोणतेही कष्ट करण्याची तयारी, चिकाटीने काम करण्याची सवय ही मकर राशीच्या व्यक्तीमध्ये आढळते. मोठमोठ्या संस्थेमध्ये गुप्तपणे काम करणे, किंवा ज्या संस्थेमध्ये गोपनीयता पाळण्याची मानसिकता लागते ती त्या राशीच्या व्यक्तीकडे असते. भावने बरोबर वाहून जाणे, आपल्या मनोविश्वात रमणे, काल्पनिक जगात वावरणे हे आपल्या स्वभावात बसत नाही.

भूतकाळात कल्पना राज्यात स्वप्नात रमणारी प्रवृत्ती आपली नसल्यामुळे व्यवहारात संसारात, व आर्थिक क्षेत्रात यशस्वी होतात. मकर राशीमध्ये उत्तराषाढा श्रवण व धनिष्ठा ही नक्षत्रे असतात. मकर रास उत्तराषाढा नक्षत्र या मध्ये जन्म झालेल्या व्यक्तीची वैशिष्ट्ये तेजस्वी, अभिमानी सर्वप्रिय, कार्यसफल मिळवणारी, चांगल्या कर्यात पुढे येऊन काम करणारी, पशुंची आवड यांचे शरीर स्थूल व मजबूत असते. तर मकरराशी श्रवण नक्षत्र सदाचार संपन्न, ईश्वरभक्त, विद्वान, कर्तृत्ववान, विद्याशास्त्राचा व धार्मिक ग्रंथाचा अभ्यास करणारी असते. लोकप्रसिद्धी मिळते. तर मकर रास धनिष्ठा नक्षत्र या नक्षत्राचे वैशिष्ट्य निर्लज्ज, धनाढ्य पराक्रमीपणा गर्विष्ठ, गायन प्रिय, साहसी, धर्मावर प्रेम करणारी असते. तर अशा स्वभावगुण संपन्न असणाऱ्या मकर राशीच्या व्यक्तीचे चालू वर्ष कसे राहील ते पाहू.

मकर राशीतूनची गुरुचे भ्रमण असून आपल्या वैयक्तिक बाबतीत चकीत करणारे योग येतील. आयुष्यात लक्षात राहणाऱ्या गोष्टी घडतील. विवाह, नोकरी, चांगल्या प्रकारे यश संपादन कराल. मोठ्या पदांवर काम करण्याची संधी मिळेल, विवाह समस्या यावर तोडगा मिळेल. शिक्षणात आवड निर्माण होईल. नवीन शिकण्याची इच्छा निर्माण होईल. धार्मिक कार्य/मंगल कार्य / तीर्थ यात्रा या वर्षी नको होतील. तरुणांचे विवाह संपन्न होतील. कोर्टकचेरीमध्ये यश मिळेल. भागीदारी व्यवसायात यश मिळेल.

विद्यार्थी वर्गाला परीक्षेत यश मिळेल. शेअर्स व्यवसायात फायदा होईल. मुलांची प्रगती ह्या वर्षात चांगली राहील. खेळ/स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल. प्रसिद्धी / पुरस्कार मिळतील. शैक्षणिक व धार्मिक संस्थे नवीन संस्था किंवा एखाद्या संस्थेवर विश्वस्त म्हणून निवड होईल. एप्रिल २०२१ नंतर आपल्या राशीच्या द्वितीय स्थानातून गुरुचे भ्रमण होणार असून कुटुंबात चांगल्या घटना घडतील. सेव्हींग वाढेल. वारसा हक्क / पेन्शनर लोकांची रखडलेली कामे मार्गी लागतील. कमी श्रमातून आर्थिक लाभ मिळतील. लोकप्रियता वाढेल. वरिष्ठांचे उत्तम सहकार्य मिळेल. मात्र, आरोग्याची दक्षता घ्यावी. उष्णतेचे विकार वाढू शकतील. तर शनिचे भ्रमण हे आपल्याच राशीतून होत असून या काळात गेलेला आत्मविश्वास पुन्हा मिळेल. या काळात जबाबदारी वाढणार आहे. केलेल्या कामाचे चीज होईल. कदाचित आपणास एकस्थानी कष्ट करावे लागतील. मकरराशीसाठी या वर्षी ''दुसऱ्यावर विसंबला तो संपल'' हे ब्रीदवाक्य लक्षात ठेवावे.

मानसिक ताणाव राहीला तरी काम केल्याचा आनंद निश्चित पणे मिळेल. कुटुंबाची जबाबदारी वाढेल. या काळात दीर्घकाळाची गुंतवणूक उत्तम राहील. वातविकार, तत्वविकार, सांधेदुखी, सर्दी अशा आजारांची शक्यता राहील. वृद्ध व अनाथ व्यक्तीची मदत व हाताखालील नोकरवर्गाला खूष ठेवण्यास उत्तम राहील. तर राहू केतूचे भ्रमण पंचम व लाभ स्थानातून होत असून तरुणांना प्रेम प्रकरणात मनस्ताप होईल.

या काळात मित्रांशी दुरावा होईल. महत्वाच्या कामात अर्धवट यश मिळेल. पायाची दुखणे त्रासदायक राहील. काहीवेळा मुलांना चुकीचे मार्गदर्शन अथवा ॲडमिशन घेताना द्विधा मनावस्था होईल. मे २०२१ ते जुलै २०२१ ह्या काळात विशेष दक्षता घ्यावी लागेल. गोयर राहू ही पंचम स्थानी असून या वर्षी तो शनिशी नवपंचम योग करत असल्यामुळे लाभ होतील पण मानसिक दृष्ट्या संयमी राहणाऱ्यासाठी प्रयत्न करावे लागेल. वाहन जपून चालवावे. वृद्ध व घरातील ज्येष्ठ व्यक्तीशी मतभेद



mpc news.in राहा एकदम अपडेट. कधीही, कुठेही!

होणार नाहीत यांची काळजी घ्यावी लागेल. तर हे वर्ष मानसिक कष्टाचे असले तरी यश नोकरी व्यवसायात सौख्य वाढविणारे स्पर्धा/निवडणुकामध्ये आपली राशी व कोर्टकचेरीच्या कामात मनासारखे यश मिळेल.

**उपासना :** आपण विष्णू, हनुमान उपासना केल्यास उत्तम राहील. त्याचबरोबर दर शनिवारी लोखंडाच्या वस्तू/उडीद, काळे कापड अशा वस्तू गरीब व्यक्ती अथवा मंदिरात दान केल्यास उत्तम राहील.

**शुभ रंग :** हलगा ग्रे, पांढरा, आकाशी निळा.

**भाग्य रत्न :** पाचू व डायमंड या रत्नांचा वापर केलयास उत्तम राहील. त्याचबरोबर या वर्षासाठी आपण पांढरा स्फटीक व टोपाझ ही धारण करू शकता.

**शुभदिनांक :** कोणत्याही महिन्याच्या ७,१७,२६.

**भाग्यकारक वयोवर्ष :** १४,२३,३१,४१,५०,५२,६९

## कुंभ : यश हे निश्चित पण संघर्षातूनच

कुंभ राशीचक्रातील ही अकरावी रास असून स्थिर तत्वाची वायू राशी आहे. पुरुष स्वभावी या राशीचे चिन्हा खांद्यावर कुंभ घेतलेले घडा घेऊन निघालेला पुरुष असा आहे. या राशीचा स्वामी शनि असून उच्च प्रकाराची ज्ञान लालसा, सत्याची आवड, कोणतीही गोष्ट मनास असून व तळमळीने करणे प्रत्येक गोष्टीचा खोलवर विचार करणे इ. या राशीच्या व्यक्तीचे गुणवैशिष्ट्य आहे. आपल्यावर उच्च ध्येयाचे, थोर विचारांचे व तत्वज्ञानाचे संस्कार झालेले आहेत. संशोधन कार्यात शास्त्रीय संशोधनात कुंभ व्यक्ती विशेष करून आढळतात. आपल्या राशीत प्रामाणिकपणा आहे. कोणतेही काम मनापासून करणे, ही आपली वृत्ती आहे. ईश्वरावर श्रद्धा तर आहेच. पण विज्ञानाची पण कास रणारी आहे.



संशोधनाची आवड एका बाजूला आपण श्रद्धावान आहात तर दुसऱ्या बाजूला प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करून आपण निर्णय घेत असता. मानव धर्मावार आपल्या वर व देशावर निष्ठा ठेवून काम करणारी आपल रास आहे. आपल्या राशीमधील व्यक्ती मैत्रीला अत्यंत चांगली आहे. प्रामाणिकपणा सुस्वभाव आपले अंत:करण उदार, दिलदार, कोणालाही संकटात मदत करण्याची आपली प्रवृत्ती असते.

आपल्याकडे संयम, विवेक आहे. प्राध्यापक, लेखक, शास्त्रज्ञ, संशोधक, पत्रकार, डॉक्टर्स, समीक्षक अशा विविध क्षेत्रात म्हणजे जिथे बुद्धी व ज्ञानाचा संबंध येतो अशा सर्व क्षेत्रात कुंभ राशीचे लोक आढळतात. तसेच कुंभ राशीच्या व्यक्तींना संपत्ती, पैसा या गोष्टीपेक्षा बौद्धीक गोष्टींना जास्त प्राधान्य देतील. संकुचितपणा, स्वार्थीपणाय या गोष्टी कुंभ राशीच्या व्यक्तीकडे कमी असतात. आपली मते इतर व्यक्तीवर न लादता लोकशाही वादीने समजावून सांगण्याचा कल आपणाकडे असतो. कुंभ राशीमध्ये धनिष्ठा शततारका व पूर्वाभाद्रपद ही तीन नक्षत्रे येत आहेत.

कुंभ धनिष्ठा नक्षत्रचा व्यक्ती अनेक मार्गाने अर्थप्राप्ती होऊन सौख्य संपादन करेल. महत्वाकांशी, साहसी, संगीताची आवड, वाक्यचतूर, हजर जबाबी, बुद्धीमत्ता प्रचंड तर कुंभ रास शततारका नक्षत्र असणाऱ्या व्यक्ती कल्पक, धूर्त, व्यसनी विषयसुक्त असतात व लोभाला बळी पडणारे असतात. हे मद्य, मांस, पशु, पक्षी यांचा व्यापार करणारे असतात. तर कुंभ रास पूर्वा भाद्रपद नक्षत्र असणारे व्यक्ती विद्याव्यासंगी, संशोधक स्त्रीवश, धूर्त काहीवेळा कठोर अंतकरणाचे असतात. तर अशा बुद्धीमान कुंभ राशीच्या व्यक्तीचे चालू वर्ष कसे राहील ते पाहू...

कुंभ राशीच्या व्यय स्थानातून गुरुचे भ्रमण होत असून एप्रिल २०२१ मध्ये आपल्याच राशीच भ्रमण होणार आहे. आपले कर्जाची कामे सहज होतील. आपल्या या वर्षी लाभ व व्ययस्थानाचा स्वामीची यूती ही होत असल्यामुळे निचभंग राजयोग होत आहे. परदेशामधील व्यवहार शीघ्र व शुभदायक राहतील.

घरातील सुख सुविधा वाढेल. यासाठी खर्च होईल. वाहन, वास्तू अथवा जमीन खरेदी व्यवहार होतील. या वर्षी संस्था, अनाथालय किंवा एखाद्या सहकारी संस्थेवर आपली मुख्य सचिवपदी वर्णी लागेल. नोकरीमध्ये चांगले बदल होतील. परंतू संघर्षातूनच वारसाहक्क वडिलोपार्जित जमीन अशी महत्वाची कामे मार्गी लागतील. हितशत्रूवर आपला वचक बसेल. जुन्या आजारांवर आपल्याला प्रभावी औषध मिळेल. संतती इच्छुकांना एप्रिल २०२१ नंतर योग आहेत. शिक्षणासाठी दूरचे प्रवास होतील. खेळ/कला/मनोरंजन माध्यमातून आर्थिक प्राप्ती दर्शविते.

शनिचे भ्रमण आपल्या व्यय स्थानातून होत आहे. साडेसातीचा पहिला टप्पा चालू आहे. परंतू शनिचे भ्रमण हे स्वराशीतून होत असल्यामुळे विशेष त्रासदायक राहणार नाही. काही प्रमाणात कर्ज मिळवण्यासाठी मानसिक त्रास, कागदपत्रे जुळवा जुळव करणे अथवा योग्य कागदपत्राची पुर्तता अशा गोष्टींसाठी धावपळ होणे किंवा कागदपत्र लवकर उपलब्ध न होणे अशा गोष्टी परदेशी व्यवसाय फायदेशीर ठरतील. दूरवरचे प्रवास घडतील. विशेष करून घरातील खर्च वाढवणारा काळ राहील.

या काळात घराती व्यक्ती आपणावर खुश असतील. कायदेशीर व कोर्ट केचरीच्या कामात खर्च वाढेल. नोकरदार व्यक्तींना कदलीचे प्रसंगास सामोरे जावे लागेल. या वर्षी संघर्ष राहील. तरी यश आपलेच असणार आहे. विद्यार्थी वर्गाला यश मिळवण्यासाठी मोठे श्रम करावे लागतील. शिक्षक मार्गदर्शक, सल्लागार यांची मदत घ्यावी लागेल.

राहूचे भ्रमण चतुर्थ, केतूचे भ्रमण दशम स्थानातून होत असून पुढील काळात आपणास घरगुती वातावरण चांगले


mpc news.in
राहा एकदम अपडेट. कधीही. कुठेही!

ठेवण्यासाठी योग्य दक्षता घ्यावी लागेल. मित्रांशी दुरावा वाढेल. नोकरी व्यवसायात बदल घडेल. घरातील ज्येष्ठ व्यक्तीची काळजी घ्या. घरातील पाळीव प्राणी, शेतीविषयक कामे बाग बगीचा यांच्यासाठी खर्च वाढेल, कराल. सामाजिक प्रतिष्ठा, मान, सन्मान, अधिकार या गोष्टी विरोधकांवर मात करून मिळवाल. खेळाडू, राजकीय व्यक्तींना अनपेक्षित यश मिळेल. अचानक प्रवास होईल. नातेवाईकांचा विक्षिप्तपणा सहन करावा लागेल.

एकंदरीत या वर्षी आपणास योग / आध्यात्म/कला या क्षेत्रात प्रगती उत्तम राहील.

**उपासना :** कुलदेवतेची उपासना केल्यास उत्तम त्याचबरोबर महादेवाच्या पिंडीवर काळे तीळ व दूध यांचे मिश्रण कश्रण करून अभिषेक केल्यास उत्तम राहील.

**शुभरंग :** निळा, आकाशी, पांढरा

**भाग्यरत्न :** आपण डायमंड व पांढरा पुष्कराज या रत्नांचा वापर केल्यास उत्तम राहील.

**शुभदिनांक :** ८,१७,२६

**भाग्यकारक वयोवर्ष :** १५, २४, २५, ३२, ४२, ५१, ६०, ६४, ७१.

## मीन : प्रगती व प्रतिष्ठा वाढवणारे वर्ष

मीन राशी चक्रातील ही शेवटची रास असून जल तत्वाची द्विस्वभावी स्त्री राशी असून या राशीचा स्वामी गुरु आहे. या राशीचे



चिन्ह विरूद्ध दिशेला तोंड असणारे दोन मासे आहेत. भावना प्रधान, मनाच्या हळव्या, यशाची उलटी सुलटी प्राप्ती होणारी अनाथ लोकांची मदत, गोरगरीबाची जाणीव असणारी या राशीच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर सात्विकतेचे तेज असते. प्रसन्नपणा असतो. शांतपणा चेहऱ्यावर असतो. भव्यतेची झाक असते. दयाळू, मायाळू व ममता आहेत.

भांडण तंटा न करता सर्वांशी जूळवून घेऊन गोडी गुलाबीने राहण्याचा आपला स्वभाव असतो. आपण येणाऱ्या प्रश्नाचा विचार भावनेने करता, नाजूकपणा, कोमलपणा, आपणाकडे अधिक आहे. आपल्या राशीत असणाऱ्या व्यक्तीमध्ये नम्रता आहे. दया, क्षमा, शांती यांची प्राप्ती आपल्या स्वभावात असते.

मीन राशीचे व्यक्ती जास्तकरून संत, आचार्य, तपस्वी, ऋषीमुनी यांच्या शोधात असतात. मीन राशीत पूर्वाभाद्रपद, उत्तर भाद्रपदा व रेवती ही नक्षत्रे येतात. मीन रास पूर्वा भाद्रपदा नक्षत्राचे व्यक्ती हुशार, धनी, धार्मिक मधुर भाषा बोलणारी, सौम्य व सात्विक व्यवहार असणारी. तर मीन रास उत्तरा भाद्रपदा नक्षत्र असणारी व्यक्ती न्यायप्रिय मेहनती, त्यागी, महत्वाकांक्षी,ध्यान व योगात या गोष्टीत आवड असणारी श्रद्धाळू, तर्कशुद्ध बोलणारे योग्यता संपन्न, परोपकारी व श्रद्धावान असतात. तर मीन रास रेवती नक्षत्रामधील व्यक्ती उत्तम स्मरणशक्ती, उंचीने कमी, हुशार, नि:स्वार्थी कायदे पंडीत असतात. यांना मित्र पुष्कळ असतात ही माणसे लोकप्रिय असतात. ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मी काम करतात. तर अशा धर्मावर श्रद्धा व विश्वास असणाऱ्या मीन राशीच्या व्यक्तीचे चालू वर्ष कसे राहील ते पाहू.

मीन राशीच्या लाभ व व्यय स्थानातून गुरुचे भ्रमण होणार असून हे वर्ष आपणास लाभदायक राहील. मोठी इच्छा पूर्ण होईल. मोठे लाभ होतील. उत्पन्नात वाढ होईल व उंची वस्तू/अलंकार यांची प्राप्ती होईल. विद्यार्थी वर्गाला शिक्षणात यश मिळेल. नवदाम्पत्यांना संतती प्राप्ती होईल. तरुणांना विवाह काळ उत्तम आहे. शेअर्समध्ये दीर्घकाळासाठी गुंतवणूक ठि राहील. नवीन मित्र भेटतील, मित्रची मदत होईल. यावर्षी मूलाची चांगली प्रगती होईल. भागीदारीच्या कामात यश मिळेल. भावंडाचे सौख्य मिळेल. कला/खेळ/ साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना यश व प्रसिद्धी मिळेल. एप्रिल २०२१ नंतर गुरुचे भ्रमण व्ययस्थानातून होणार असून हितशत्रूचे प्राभल्य वाढून मानसिक त्रास होईल. सूचक स्वप्ने पडतील, द्यार्थी वर्गाला स्पर्धा व कला क्षेत्रामध्ये जास्त कष्ट घ्यावे लागतील. मात्र यावर्षी आपला नाव लौकीक वाढेल हे निश्चीत. कौटुंबिक व आर्थिक सौख्यासाठी हे वर्ष अनुकूल राहिल. राशीच्या लाभातूनच शनिचे भ्रमण होत असून कोर्टकचेरीच्या कामाध्ये मनासारखे निर्णय होतील. निवडणुकीमध्ये विजय मिळेल. दीर्घ काळाची इच्छा पूर्ण होईल. मोठे कर्ज सहज मिळेल. शेअर्समध्ये गुंतवणूक लाभदायक राहिल. अधून मधून पायाचे दुखणे, सांधेदुखणे यामुळे त्रास दर्शवितो. प्रवास जपून करावा. विझझ पेन्शन या कामात दिरंगाई होईल. तर राहू केतूचे भ्रमण तृतीय व भाग्यस्थानातून होत असून मानसिकता चांगली राहील. मोठे धाडसी निर्णय घ्याल.

नोकरीमधील अस्थैर्य कमी होईल. शत्रुवर विजय मिळेल. मोठे प्रवास होतील. मात्र भावंडे व नातेवाईक यांच्याशी मतभेद टाळावे. मोठ्या संधी मिळतील पण दिरंगाई नंतरच मोठ्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना अडचणी वाढण्याची शक्यता राहील. उपानेमध्ये खंड पडेल. एकूण मीन राशीला या वर्षाचा पूर्वार्ध लाभदायक व प्रगतीचा प्रतिष्ठा वाढविणारा राहील. उद्योग व्यवसायामध्ये उत्तम यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील, कोर्टकचेरीत व निवडणुकीत विजय प्राप्ती राहील.


**उपासना :** आपण लक्ष्मी नारायण व गणपती उपासना केल्यास लाभदायक राहील. तसेच दर शनिवारी, मंगळवारी गणपती मंदिरामध्ये लाल पदार्थ, कापड दान केल्यास (सफरचंद, गूळ) अन्नदान केल्यास उत्तम राहील.

**शुभरंग :** गुलाबी, निळसर, पोपटी.

**शुभरत्न :** प्रवाळ व पुष्कराज रत्नाचा वापर केल्यास उत्तम.

**शुभदिनांक :** कोणत्याही महिन्याच्या ३,१२,२१,३०.

भाग्यकारक वयोवर्ष : ९,१८,२६,३६,४४,४५.


॥ दीपज्योती नमोस्तुते ॥
पिकवावे धन । ज्याची आस करी जन ॥
पुरोनि उरे खातां देतां । नव्हे खंडण मवितां ॥
खाली पडे ओली बीज । तरीच हाती लागे निज ।
तुका म्हणे धणी । विठ्ठल अक्षरे या तिन्ही ॥
बापू भेगडे
उपाध्यक्ष : श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखाना
नगरसेवक : तळेगाव दाभाडे
सागर (भैय्या) बोडके मित्र परिवार




LOKMANYA
ORTHOPEDICS Hi-Tech. Human.

**रोबोच्या सहाय्याने नी रिप्लेसमेंट सर्जरी होणारे**
**देशातील अग्रगण्य हॉस्पिटल**

| | | |
|---|---|---|
| 18,000 हून अधिक सांधेरोपण शस्त्रक्रिया | 5,000 हून अधिक रोबोच्या सहाय्याने गुडघेरोपण शस्त्रक्रिया | आधुनिक तंत्रज्ञान, प्रख्यात तज्ज्ञ |

**निगडी - चिंचवड - मित्रमंडळ चौक**

**संपर्क : लोकमान्य हॉस्पिटल फॉर स्पेशालिटी सर्जरी**
**सेनापती बापट रोड, गोखले नगर, पुणे.**
**फोन नं.: ०२०-६६६६७७७७/९५२७०९४३९५**
www.lokmanyahospitals.in